सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
लातूर | शुक्रवार, ४ सप्टेंबर २०२६ । वर्ष ४ थे अंक १७५ । पाने १२ । किंमत रु. ८/-
RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com










# जिवंत सापडण्याची आशा मावळली

● नेपाळमधील विनाशकारी पुराने आप्तेष्टांची ताटातूट ● मृतकांचा आकडा पाच हजारांच्या वर जाण्याची शक्यता

**काठमांडू, ३ सप्टेंबर**

नेपाळमधील विनाशकारी पुराला आठवडा झाला तरी, अनेक लोकांचा शोध सुरूच आहे. बेपत्ता असलेले नागरिक जिवंत सापडण्याची आशा मावळली असताना, आता लोक मंदिर, मठात जाऊन प्रियजन सुखरूप परतावे यासाठी प्रार्थना करत आहेत. काही लोकांनी आप्तेष्ट जिवंत परत येण्याची आशा सोडली आणि त्यांच्याकडून आत्म्यांच्या शांतीसाठी धार्मिक विधी केले जात आहेत. नैसर्गिक आपत्तीत मृतकांचा आकडा पाच हजारांवर जाण्याची शक्यता बचाव पथकातील एका अधिकाऱ्याने व्यक्त केली. दुसरीकडे लाखो लोकांवर गाव, शहर सोडून स्थलांतरित होण्याची वेळ आली आहे.


नेपाळमधील काठमांडू येथील त्रिभुवन विद्यापीठाबाहेर पुरानंतर बेपत्ता झालेल्या लोकांची छायाचित्र लावण्यात आली

नेपाळच्या आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने गुरुवारी सांगितले की, आतापर्यंत १,२५२ मृतदेह सापडले असून, ४,८०० लोक अजूनही बेपत्ता आहेत. बेपत्ता असलेले लोक जिवंत मिळण्याची शक्यता कमी असल्याने मृतकांचा आकडा पाच हजारपेक्षा अधिक असू शकतो. बचावपथकांकडून शोधमोहीम युद्धपातळीवर सुरू असली तरी, हवामान प्रतिकूल असल्याने अडथळे येत आहे. सात दिवसांपासून आपल्या प्रियजनांची काहीच बातमी नसल्याने, कुटुंबीय आणि स्थानिक लोक त्यांच्या सुरक्षिततेसाठी मंदिर आणि बौद्ध मठात प्रार्थना करत आहेत. काही कुटुंबांनी तर आपल्या बेपत्ता आत्म्यांच्या शांतीसाठी धार्मिक विधीदेखील करण्यास सुरुवात केली. पुराच्या पाण्यात वाहून गेलेल्यांसाठी प्रार्थना करण्यासाठी मोठ्या संख्येने लोक मठात येत आहेत.

**बौद्ध मठात सामुदायिक प्रार्थना**

रसुवा येथील रहिवासी तिशुंग घाले यांनी वृत्तसंस्थेशी बोलताना सांगितले की, अनेक लोक पुराच्या पाण्यात घरांसहित वाहून गेले आणि आठवडाभरानंतरही त्यांचा कोणताही मागमूस लागलेला नाही. सात दिवसांपासून सतत संपर्क होत नसल्याने, ते कदाचित जिवंत नसतील अशी भीती त्यांना वाटत आहे. त्यांच्या परिसरातील ४०० हून अधिक लोक बेपत्ता आहेत.

**एकाच दिवशी आढळले ३५५ मृतदेह**

बचावपथकाला चितवन जिल्ह्यात गुरुवारी एकाच दिवशी ३५५ मृतदेह मिळाले. ओळख पटवणे अशक्य असल्याने मृतदेहावर अंतिम संस्कार करण्यात येणार असल्याचे नेपाळ पोलिसांच्या एका अधिकाऱ्याने सांगितले. अपघाताच्या सातव्या दिवशी, नेपाळ लष्कराच्या नेतृत्वाखालील संयुक्त बचाव पथके बाधित भागांमध्ये शोध आणि मदत कार्य करत आहेत. माहितीनुसार ४,८७५ लोक बेपत्ता आहेत.

**कैलाश मानसरोवर यात्रेकरूंचे कुटुंबीय हतबल**

कैलाश मानसरोवर यात्रेवर गेलेले अनेक भारतीय यात्रेकरू अद्याप बेपत्ता आहेत. या कठीण परिस्थितीत, बेपत्ता यात्रेकरूंच्या कुटुंबीयांनी सरकारला एक भावनिक आवाहन करणारे पत्र जारी केले आहे. (वृत्तसंस्था)

# मंदिराच्या तोडफोडीचा भारताकडून निषेध

## पाकिस्तानकडे चौकशी, दोषींना शिक्षा करण्याची मागणी

**नवी दिल्ली, ३ सप्टेंबर**

पाकिस्तानातील नारोवाल परिसरात एका १०० वर्षांहून अधिक जुन्या ऐतिहासिक हिंदू मंदिराची तोडफोड करण्याच्या कृत्याचा भारताने तीव्र शब्दांत निषेध केला. पाकिस्तान सरकारने या प्रकरणाची तत्काळ आणि पारदर्शक चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी ठाम मागणी भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने केली आहे.

परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी या घटनेबाबत भारताची भूमिका स्पष्ट करताना म्हटले की, पाकिस्तानमधील नारोवाल जिल्ह्यातील सिरोज गावात एका ऐतिहासिक हिंदू मंदिराची तोडफोड झाल्याची बातमी अत्यंत चिंताजनक आहे. अल्पसंख्याकांच्या एका शतक जुन्या प्रार्थनास्थळाची विटंबना आणि तोडफोड करणाऱ्या या घृणास्पद कृत्याचा भारत तीव्र निषेध करतो. स्थानिक प्रशासनाच्या निष्क्रियतेवर बोट ठेवताना ते पुढे म्हणाले, एका १०० वर्षे जुन्या मंदिराचे रक्षण करण्यात आलेले अपयश आणि तेथील प्रशासनाची उदासीनता अत्यंत गंभीर आणि चिंताजनक आहे. पाकिस्तानात अल्पसंख्याक समाज आजही किती असुरक्षित आहे, हेच या घटनेवरून पुन्हा एकदा उघड झाले आहे.


पाकिस्तानात तोडण्यात आलेले हिंदू मंदिर

**नैतिक जबाबदाऱ्यांची आठवण करून दिली**

भारताने पाकिस्तान सरकारला त्यांच्या वैधानिक आणि नैतिक जबाबदाऱ्यांची आठवण करून दिली आहे. पाकिस्तानने त्वरित चौकशी करून गुन्हेगारांना शिक्षा करावी. त्याचबरोबर, विटंबना झालेल्या या ऐतिहासिक मंदिराची त्वरित डागडुजी करून ते पूर्ववत करावे, अशी आक्रमक मागणी भारताने केली आहे. देशातील अल्पसंख्याक नागरिकांचे जीवन, त्यांची सुरक्षा करणे सरकारची प्राथमिक जबाबदारी आहे, असे जयस्वाल म्हणाले. (वृत्तसंस्था)

# अय्यप्पा देवस्थानच्या माजी अध्यक्षांना जामीन

सबरीमाला सोने गहाळ प्रकरण

**कोल्लम, ३ सप्टेंबर**

सबरीमाला येथील भगवान अय्यप्पा मंदिरातील सोने कथितरीत्या गहाळ झाल्याप्रकरणी अटक करण्यात आलेल्या त्रावणकोर देवस्वम बोर्डाचे (टीडीबी) माजी अध्यक्ष पी. एस. प्रशांत यांना येथील दक्षता न्यायालयाने गुरुवारी वैद्यकीय कारणास्तव जामीन मंजूर केला.

कोल्लम दक्षता न्यायालयाचे न्यायाधीश मोहित सी. एस. यांनी प्रशांत यांची वैद्यकीय स्थिती विचारात घेऊन त्यांना जामीन दिला. मेंदूतील रक्तस्त्रावाचा त्रास जाणवल्याने प्रशांत यांना गत महिन्यात तुरुंगातून तिरुवनंतपुरममधील रुग्णालयात हलवण्यात आले होते. यापूर्वी न्यायालयाने त्यांचा जामीन अर्ज फेटाळला होता. नवीन अर्ज दाखल केल्यानंतर, प्रशांत यांच्या वकिलांनी त्यांना प्रगत वैद्यकीय उपचारांची गरज असल्याचे सांगत जामिनाची विनंती केली. त्यांचे वैद्यकीय अहवाल तपासल्यानंतर न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर केला. सबरीमाला मंदिरातील 'द्वारपालक' मूर्तींमधील सोने गहाळ झाल्याच्या प्रकरणात प्रशांत हे १७ वे आरोपी आहेत. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### विदेशातही प्रदर्शित होणार 'हनुमान अंश'

**मुंबई :** 'हनुमान अंश' या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर जोरदार कमाई केली आहे. ही कमाई ६० कोटी रुपयांच्या पुढे गेली आहे. चित्रपटाला मिळालेल्या सकारात्मक प्रतिसादामुळे, यश-अभिनीतच्या निर्मिती संस्थेने तो विदेशात प्रदर्शित करण्याचा निर्णय घेतला आहे. होंबाळे फिल्म्सने या चित्रपटाच्या विदेशी प्रदर्शनाची जबाबदारी सांभाळली आहे. या चित्रपटाच्या माध्यमातून जगभरातील प्रेक्षकांना 'नीम करोली बाबां'च्या जीवनाचा अनुभव घेता येणार आहे. होंबाळे फिल्म्सने इन्स्टाग्रामवर एक पोस्ट शेअर करून चित्रपटाच्या जगभरातील प्रदर्शनाची घोषणा केली. हा चित्रपट ११ सप्टेंबर २०२६ रोजी जगभरात प्रदर्शित होईल. श्रद्धेवर आधारित एक कथा. सीमापारचा एक प्रवास. होंबाळे ओव्हरसीजच्या माध्यमातून हा चित्रपट आंतरराष्ट्रीय प्रेक्षकांपर्यंत पोहोचवताना आम्हाला अभिमान वाटतो, असे पोस्टसोबत दिलेल्या कॅप्शनमध्ये लिहिले आहे.




### या वीकेंडला ओटीटीवर मनोरंजनाची रेलचेल

**मुंबई :** सप्टेंबरचा पहिला आठवडा ओटीटी प्लॅटफॉर्मवर मनोरंजनाची रेलचेल असणार आहे. या आठवड्यात लोकप्रिय रिॲलिटी कार्यक्रम 'बिग बॉस २०' येणार आहे. सलमान खान पुन्हा एकदा या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करणार आहे. हा कार्यक्रम ६ सप्टेंबर रोजी जिओ हॉटस्टारवर प्रदर्शित होईल. 'द कोर्ट' ही एक तमिळ मालिका आहे. यात तोतरेपणाची समस्या असलेल्या याझिनी नावाच्या एका तरुण वकिलाची कथा सांगितली आहे. ही मालिका ४ सप्टेंबरपासून जिओ हॉटस्टारवर प्रदर्शित होईल. अजय देवगण अभिनीत 'धमाल ४' हा चित्रपट ४ सप्टेंबरला नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होईल. तापसी पन्नूचा 'गांधारी' हा चित्रपट गुरुवारी नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झाला. देवाशीष मखिजा दिग्दर्शित आहे. वामिका गब्बी आणि लोकेश कनगराज यांची प्रमुख भूमिका असलेला 'डीसी' हा ॲक्शन थ्रिलर चित्रपट आहे. तो ४ सप्टेंबरला सनएनएक्सटीवर स्ट्रीम होईल.

### राजा कृष्ण मेननचे तमिळ चित्रपटसृष्टीत पदार्पण

**मुंबई :** दिग्दर्शक राजा कृष्ण मेनन लवकरच नवी कलाकृती प्रेक्षकांच्या भेटीला घेऊन येणार आहेत. तमिळ चित्रपटसृष्टीत पदार्पण करून मेनन यांनी पॅनोरमा स्टूडियो आणि लोकोमोटिव ग्लोबल यांच्या सहयोगाने निर्मित अद्याप शीर्षक निश्चित न झालेल्या मानसशास्त्रीय भयपट नाट्यचित्रपटाच्या मुख्य चित्रीकरणाला लंडनमध्ये अधिकृतपणे सुरुवात केली आहे. या चित्रपटात कलाकारांची दमदार ट्रियो असून इंडस्ट्री आयकॉन त्रिशा कृष्णन, ज्येष्ठ अभिनेत्री राधिका सरथकुमार, आणि राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या अपर्णा बालमुरली यात मुख्य भूमिकेत दिसणार आहेत. हा दक्षिण भारतीय वाटचालीचा भाग म्हणून त्यांचा पहिला तमिळ उपक्रमही आहे. याची निर्मिती कुमार मंगत पाठक, अभिषेक पाठक, सुंदर आरोन, विकास शर्मा, आणि अमित दलमिया यांच्या सहकार्याने केली जात आहे.



## हरयाणात एका व्यक्तीची गोळ्या झाडून हत्या

**यमुनानगर :** हरयाणातील यमुनानगरमध्ये गुरुवारी अज्ञात हल्लेखोरांनी एका ६२ वर्षीय व्यक्तीची जिमबाहेर गोळ्या झाडून हत्या केली, अशी माहिती पोलिसांनी दिली. आर्थिक पुरवठादार असलेले हरभजन सिंग (रा. प्रेम नगर) हे 'मॉडेल टाऊन' भागातील जिममधून बाहेर पडत असताना त्यांच्यावर अज्ञात हल्लेखोरांनी गोळ्या झाडल्या व तेथून पळ काढला, हरभजन सिंग यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले, असे अतिरिक्त पोलिस अधीक्षक आशिष चौधरी यांनी सांगितले.

## तिबेटमध्ये ५.० तीव्रतेचा भूकंप

**ल्हासा :** तिबेटमध्ये गुरुवारी दुपारी भूकंपाचे धक्के जाणवले. भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ५.० इतकी मोजण्यात आली. दुपारी सुमारे १:४६ वाजता भूकंपाचे धक्के नोंदवले गेले. भूकंपाचे केंद्र ३१.४७९ अंश उत्तर अक्षांश आणि ८०.३७० अंश पूर्व रेखांश येथे होते. त्याची खोली जमिनीखाली अंदाजे १४ किलोमीटर असल्याचे सांगण्यात येत आहे. हा भूकंप तिबेट प्रदेशात नोंदवला गेला. सध्या, कोणतीही जीवितहानी किंवा मालमत्तेचे नुकसान झाल्याचे वृत्त नाही.

# जन्माने नागरिकत्वावर बंदी घालणाऱ्या आदेशाला स्थगिती

## ट्रम्प यांना फेडरल न्यायालयाचा दणका; संविधानाचे उल्लंघन अमान्य



न्यायालयाच्या निर्णयानंतर जल्लोष करताना अमेरिकेतील स्थलांतरित नागरिक

**वॉशिंग्टन, ३ सप्टेंबर**

मुलांना संविधानानुसार जन्माने मिळालेले अमेरिकन नागरिकत्व सरकार हिरावून घेऊ शकत नाही असे स्पष्ट करत फेडरल न्यायालयाने राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या नव्या आदेशाला स्थगिती दिली. यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने दिलेला आदेश कायम राहील असेही आदेशात म्हटले आहे.

राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी जन्माने नागरिकत्वावर बंदी घालणारा कायदा बेकायदेशीर असल्याचा आदेश फेडरल न्यायालयाने दिल्यामुळे अमेरिकेत 'बर्थ राईट सिटिझनशिप' अर्थात् जन्माने नागरिकत्व मिळण्याचा कायदा कायम राहणार आहे.

स्थलांतरित कुटुंबीय आणि मानवी हक्क गटांनी प्रशासनाच्या आदेशाना आव्हान देणाऱ्या याचिकांवर न्यायाधीश डेबोरा बोर्डमन यांनी सुनावणी घेतली. त्यांनी आदेशात म्हटले की, मुलांना संविधानानुसार जन्माने मिळालेले अमेरिकन नागरिकत्व सरकार कायदा करून हिरावून घेऊ शकत नाही. ट्रम्प प्रशासनाचा नवा कार्यकारी आदेश संविधानाने नागरिकांना दिलेल्या अधिकाराचे उल्लंघन आहे.

**सरकारने निर्णयाला विरोध**

न्यायालयात बाजू मांडताना ट्रम्प प्रशासनाने म्हटले की, न्यायालयाने याप्रकरणात घाईघाईने हस्तक्षेप केला आहे. आदेश लागू करण्याचे नियम आणि मार्गदर्शक तत्त्वे अजून तयार झाली नव्हती. मात्र, न्यायाधीशांनी सांगितले की, या प्रकरणात न्यायालयाचा तातडीचा हस्तक्षेप आवश्यक आहे. राष्ट्राध्यक्षकांकडून नागरिकत्वाचा अधिकार मर्यादित करण्याच्या प्रयत्नाची न्यायालयात समीक्षा होऊ शकते. (वृत्तसंस्था)

### यापूर्वीही ट्रम्प यांना धक्का

जन्माने मिळणाऱ्या नागरिकत्वाबाबत ट्रम्प प्रशासनाच्या प्रयत्नांवर सर्वोच्च न्यायालयाने ३० जून रोजी निर्णय दिला आहे. न्यायालयाने प्रशासनाच्या त्या प्रयत्नांना थांबवले होते, ज्यात काही मुलांचे जन्मसिद्ध नागरिकत्व रद्द करण्याची मागणी करण्यात आली होती. आता फेडरल न्यायाधीशांच्या निर्णयामुळे ट्रम्प प्रशासनाच्या जन्मसिद्ध नागरिकत्व मर्यादित करण्याच्या प्रयत्नांना आणखी एक धक्का बसला आहे.

### सरकारी पक्षाचा आक्षेप काय?

अमेरिकेत दरवर्षी जन्माला येणाऱ्या मुलांमध्ये 'बर्थ टुरिझम'शी संबंधित प्रकरणांची संख्या वाढत आहे. नागरिकत्व मिळवण्यासाठी महिला प्रसूतीसाठी अमेरिकेत येतात. त्यामुळे त्यांच्या मुलांना अमेरिकेचे नागरिकत्व मिळते. दरवर्षी २२ हजार ते २६ हजार लोक आपल्या मुलांना अमेरिकन नागरिकत्व मिळवून देण्याच्या उद्देशाने अमेरिकेत येतात. याला आळा घालण्यासाठी जन्माने नागरिकत्व मिळवण्यावर बंदी घालण्याची तरतूद कायद्यात करण्यात आल्याचे सरकारी पक्षाने म्हटले आहे.

## वनमंत्री कोंडा सुरेखा यांना हटवले

**हैदराबाद, ३ सप्टेंबर**

तेलंगणाचे मुख्यमंत्री ए. रेवंत रेड्डी यांनी वनमंत्री कोंडा सुरेखा यांना मंत्रिमंडळातून हटवले आहे. सुरेखा यांची मुलगी कोंडा सुष्मिताने केलेल्या वक्तव्यावरून निर्माण झालेल्या वादाच्या पृष्ठभूमीवर ही कारवाई करण्यात आली. सत्ताधारी काँग्रेसच्या आमदारांनी सुरेखा यांच्याकडे माफीची मागणी केली होती. त्यानंतर त्यांनी पक्षासमोर आपली बाजू मांडली. राज्य काँग्रेस शिस्तपालन समितीने सुरेखा यांच्यावर कठोर कारवाईची शिफारस केल्यानंतर ही घडामोड घडली. कोंडा सुरेखा यांच्यावरील ही कारवाई दिल्लीत काँग्रेसच्या वरिष्ठ नेतृत्वासोबत झालेल्या बैठकीनंतर करण्यात आली आहे. टीपीसीसी शिस्तपालन समितीने २५ ऑगस्टला आपला अहवाल प्रदेश काँग्रेस अध्यक्षांना सादर केला. समितीने सुरेखा यांना मंत्रिमंडळातून काढून टाकण्याची शिफारस केली आहे. सुरेखा यांच्या मुलीने केलेल्या वक्तव्यांमुळे त्यांच्यावर कारवाई करण्याची शिफारस करण्यात आली. मुलीचे वक्तव्ये पक्ष आणि पक्षाच्या नेतृत्वासाठी हानिकारक मानली गेली.



शिस्तपालन समितीने आपल्या अहवालात म्हटले की, सुरेखा यांनी त्यांची मुलगी कोंडा सुष्मिताने मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांच्या विरोधात केलेल्या वक्तव्यांचा जाहीरपणे निषेध करायला हवा होता. (वृत्तसंस्था)

# तापमानातील सूक्ष्म बदल ओळखणे शक्य



**नवी दिल्ली, ३ सप्टेंबर**

भारतातील शास्त्रज्ञांनी तापमानातील अगदी कमी फरकापासून असामान्यपणे उच्च व्होल्टेज विद्युत निर्माण करण्याची पद्धत शोधून काढली आहे. या संशोधनामुळे घन पदार्थांच्या गुणधर्मांविषयीच्या समजुतीला मागील शतकाहून अधिक काळापासून दिशा देणाऱ्या एका मर्यादेलाच आव्हान मिळाले आहे. या संशोधनामुळे उष्णता आणि तापमानातील सूक्ष्म बदल ओळखू शकणारी उपकरणे विकसित करणे शक्य होऊ शकते.

या महत्त्वपूर्ण प्रगतीमध्ये 'स्कँडियम नायट्राइड'पासून बनवलेल्या एका विशेषरित्या विकसित सेमीकंडक्टरचा समावेश आहे. हा पदार्थ स्फटिकीय घन पदार्थांमध्ये पूर्वी शक्य मानल्या गेलेल्या मर्यादेपलीकडे 'थर्मोइलेक्ट्रिक व्होल्टेज' निर्माण करू शकतो, असे जवाहरलाल नेहरू सेंटर फॉर ॲडव्हान्स्ड सायंटिफिक रिसर्च, सिडनी विद्यापीठ आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स येथील संशोधकांना आढळून आले. हा शोध 'सीबेक इफेक्ट'वर आधारित आहे. सोप्या भाषेत सांगायचे तर, एखाद्या पदार्थाची एक बाजू दुसऱ्या बाजूच्या तुलनेत अधिक उष्ण असते, तेव्हा त्यातील गतिमान 'विद्युतभार वाहक कण' (चार्ज कॅरियर्स) व्होल्टेज निर्माण करू शकतात. तापमान मोजणारी उपकरणे आणि वाया जाणारी उष्णता विजेमध्ये रूपांतरित करणाऱ्या प्रणालींसारख्या उपकरणांमध्ये या परिणामाचा वापर आधीपासूनच केला जातो.

स्फटिकीय घन पदार्थांमध्ये तापमानातील फरकामुळे किती प्रमाणात व्होल्टेज निर्माण होऊ शकते, याला एक व्यावहारिक मर्यादा असते, असे शास्त्रज्ञांचे अनेक दशकांपासून मानणे होते. नवीन संशोधन या गृहितकालाच आव्हान देते. संघाने 'स्कँडियम नायट्राइड'चे पातळ थर तयार केले आणि त्या पदार्थात जाणीवपूर्वक मॅग्नेशियम मिसळले. यामुळे स्फटिकामधून विद्युत प्रभाराच्या प्रवाहात बदल झाला आणि संशोधकांच्या मते एक अत्यधिक डोप म्हणजेच सेमीकंडक्टरमध्ये विद्युत वाहकता वाढवण्यासाठी रासायनिक अशुद्धी मिसळण्याची प्रक्रिया यामुळे 'कंपन्सेटेड सेमीकंडक्टर' तयार झाला. जेव्हा एकाच सेमीकंडक्टरमध्ये दाता आणि स्वीकर्ता या दोन्ही प्रकारच्या अशुद्धता एकाच वेळी मिसळल्या जातात, तेव्हा त्याला 'कंपन्सेटेड सेमीकंडक्टर' म्हणतात. यात दोन्ही अशुद्धता एकमेकांचे विद्युत प्रभाव नष्ट किंवा संतुलित करतात. (वृत्तसंस्था)

### कमाल मर्यादेपेक्षा १०० पट अधिक उष्ण

संशोधकांनी एका पातळ थरामध्ये (फिल्म) खोलीच्या तापमानाजवळ उणे १२४.६ मिलिव्होल्ट्स प्रति केल्विनपेक्षा अधिक 'सीबेक गुणांक' मोजला. हे प्रमाण स्फटिकमय स्थायू पदार्थांसाठी यापूर्वी नोंदवलेल्या कमाल मर्यादेपेक्षा जवळपास १०० पट अधिक आहे. फिल्म्स अधिक पातळ केल्यामुळे हा परिणाम आणखी तीव्र होतो. या संशोधनामुळे कालांतराने उष्णता आणि तापमानातील सूक्ष्म बदल ओळखू शकणारी अधिक संवेदनशील उपकरणे विकसित होऊ शकतात.

## लॉरेन्सची मुलाखत घेणाऱ्या उपअधीक्षकांची बडतर्फी रद्द

**चंदीगड, ३ सप्टेंबर**

गॅंगस्टर गुंड लॉरेन्स बिश्नोईच्या पोलिस कोठडीतील वादग्रस्त मुलाखतीवरून पंजाब पोलिसांनी उपअधीक्षक गुरशेर सिंग संधू यांना बडतर्फ केले होते.या आदेशाला संधू यांनी पंजाब-हरयाणा उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. या प्रकरणात न्यायमूर्ती नमित कुमार यांनी निकाल दिला. निकालात म्हटले की, नियमित विभागीय चौकशी टाळण्यासारखी परिस्थिती राज्य सरकार सिद्ध करू शकले नाही.त्यामुळे पंजाब सरकारने संधू यांना सर्व परिणामकारक लाभांसह पुन्हा सेवेत रुजू करावे, असे आदेश दिले.

संधू यांची रिट याचिका मंजूर करताना न्यायालयाने घटनेच्या कलम ३११(२)(ब) अंतर्गत त्यांना सेवेतून बडतर्फ करणारा पंजाब सरकारचा २ जानेवारी २०२५ चा आदेश रद्द केला. न्यायालयाने म्हटले की, ज्या आदेशानुसार याचिकाकर्त्याला नियमित विभागीय चौकशी टाळून सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे, तो आदेश रद्द करण्यास पात्र आहे. तथापि, बडतर्फीचा आदेश रद्द करणे आणि पुनर्नियुक्ती करणे हे, संधू आणि इतर पोलिस अधिकाऱ्यांविरुद्ध चौकशी अधिकाऱ्यासमोर आधीच प्रलंबित असलेली विभागीय चौकशी सुरू ठेवण्याच्या शासनाच्या अधिकारावर कोणताही परिणाम करणार नाही, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

**बाजू मांडण्याची संधी नाकारली**

सरकारने नियमित विभागीय चौकशी टाळण्यासाठी अनुच्छेद ३११(२)(ब)चा चुकीचा वापर केला. मला आपली बाजू मांडण्याची संधी नाकारली. तसेच बिश्नोई कोठडीत असताना त्याच्या वास्तव्यावर देखरेख ठेवण्यात माझी कोणतीही भूमिका नव्हती, असा युक्तीवाद त्यांनी केला. (वृत्तसंस्था)

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित






| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



समाजातील सर्व व्यक्ती परस्परांच्या हितांची जपणूक करण्यासाठी सामाजिक बंधने स्वीकारतात. ह्याच बंधनांचे अधिक उदात्त स्वरूप म्हणजे धर्म. सामान्य माणसाला समजू शकणारी हीच धर्माची कल्पना आपल्या थोर पुरुषांनी सांगितली आहे.

**- स्व. एकनाथ रानडे**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह, संस्थापक विवेकानंद शिला स्मारक व विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी

## आज कृष्णजन्माष्टमी




# आईने तीन मुलांसह मारली किल्ल्यावरुन उडी

- नळदुर्ग येथील घटना
- मायलेकाचा मृत्यू
- दोन मुलींची मृत्यूशी झुंज

**तभा वृत्तसेवा। विलास येडगे**
**नळदुर्ग, दि. ३ सप्टेंबर-**

धाराशिव जिल्ह्यातील नळदुर्ग येथे अत्यंत धक्कादायक घटना घडली आहे. एका आईने आपल्या तीन लहान मुलांसह नळदुर्ग किल्ल्याच्या उंच तटबंदीवरुन उडी घेतली. या घटनेत आई आणि तिच्या एका मुलाचा मृत्यू झाला असून, दोन मुली गंभीर जखमी आहेत.



अंबुलगा (ता.निलंगा, जि.लातूर) येथील रहिवासी अश्विनी मनोहर पौळ (वय-३०) ह्या गुरुवार, दि.३ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास आपल्या तीन लहान मुलांसह नळदुर्ग किल्ला येथे येवून उंच तटबंदीवरुन मुलांसह खाली उडी घेतल्याची माहिती समोर आली आहे.

### किल्ल्याच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर

युनिटी मल्टीकॉन्स कंपनीकडे किल्ल्याची जबाबदारी असताना उपली बुरुजासह धोकादायक ठिकाणी सुरक्षा रक्षक तैनात करण्यात आले होते. आजच्या या घटनेनंतर नळदुर्गच्या ऐतिहासिक किल्ल्यातील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

### घटनेमागचे कारण अस्पष्ट

महिलेने आपल्या तीन लहान मुलांसह एवढे टोकाचे पाऊल नेमके कोणत्या कारणामुळे उचलले? हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. यामागे कौटुंबिक वाद, मानसिक तणाव किंवा अन्य काही कारण आहे का? याचा तपास करण्यात येत असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

किल्ल्यावरुन खाली पडल्यानंतर झालेल्या गंभीर दुखापतीमुळे अश्विनी पौळ आणि साडेपाच वर्षाचा अजिंक्य पौळ याचा मृत्यू झाला. तर वीरा पौळ व क्रांती पौळ या दोन लहान मुली गंभीर जखमी झाल्या आहेत. त्यांना तातडीने नळदुर्ग येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले.

तेथे प्राथमिक उपचार केल्यानंतर त्यांची प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी धाराशिव येथील शासकीय सर्वोपचार रुग्णालयात

### पतीच्या सांगण्यावरुन दिला होता राजीनामा

यातील मृत अश्विनी पौळ ह्या मुंबई येथे 'एमएसएफ'मध्ये नोकरीला होत्या. पती मनोहर पौळ यांच्या सांगण्यावरुन त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला होता. मागील तीन महिन्यांपासून त्या तीन मुलांसह माहेरी, व्हंताळ (ता.उमरगा) येथे राहत होत्या.

हलवण्यात आले आहे. सध्या दोन्ही मुलींवर अतिदक्षता विभागात उपचार सुरु असून, त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे.

घटनेची माहिती मिळताच किल्ल्याचे इन्चार्ज नागनाथ गवळी यांनी पोलिसांना कळविले. नळदुर्ग पोलिस ठाण्याचे निरीक्षक रविंद्र गायकवाड, पोलिस उपनिरीक्षक अख्तर सय्यद आणि बीट अंमलदार खलील शेख यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. नळदुर्ग पोलिस पुढील तपास करीत आहेत.

# प्रसूतीमुळे महिलेच्या करिअरचे नुकसान नाही

## दिल्ली उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

**नवी दिल्ली, ३ सप्टेंबर**

प्रसूती रजेवरून परतणाऱ्या महिला कर्मचाऱ्याला तिच्या पूर्वीच्या पदावरून काढून कमी महत्त्वाच्या जबाबदाऱ्या देणे आता सोपे राहणार नाही. गर्भधारणा किंवा प्रसूतीमुळे महिलेच्या करिअरला हानी पोहोचू शकत नाही, असे दिल्ली उच्च न्यायालयाने स्पष्ट केले.




प्रसूती रजेवर जाण्यापूर्वी महिलेकडे जे पद आणि जबाबदाऱ्या होत्या, त्याच पदावर तिला पुन्हा रुजू करून घेतले पाहिजे. जर हे शक्य नसेल, तर तिला समान वेतन, पद, ज्येष्ठता, जबाबदारी आणि करिअरच्या संधींसह समकक्ष पद दिले पाहिजे. निकालात न्या. सचिन दत्ता यांनी एका महिला कर्मचाऱ्याला प्रसूती रजेनंतर व्यावसायिक हानी पोहोचवल्याच्या आरोपाखाली १० लाख रुपयांची नुकसान भरपाई आणि खटल्याच्या खर्चापोटी १.५ लाख रुपये देण्याचा आदेश दिला.

**१४ वर्षांचा अनुभव, २०२२ मध्ये बनली व्यवस्थापक**

याचिकाकर्ती एक चार्टर्ड अकाउंटंट असून, तिला अंदाजे १४ वर्षांचा व्यावसायिक अनुभव आहे. २०२२ मध्ये तिची एका कंपनीत मॅनेजर-अकाउंटिंग म्हणून नियुक्ती झाली. त्यावेळी तिचा मासिक पगार अंदाजे २.६ लाख रुपये होता. मे २०२३ मध्ये तिने कंपनीला गरोदरपणाबद्दल कळवले. त्यानंतर तिची दुसऱ्या टीममध्ये बदली करण्यात आली. डिसेंबर २०२३ मध्ये तिने प्रसूती रजा घेतली आणि जुलै २०२४ मध्ये कामावर परतली.

### कामावर परतल्यावर बदलल्या जबाबदाऱ्या

प्रसूती रजेवरून परतल्यानंतर तिला तिच्या पूर्वीच्या पदावर आणि जबाबदाऱ्यांवर पुन्हा रुजू करून घेण्यात आले नाही. त्याऐवजी, तिची ट्रेझरी विभागात बदली करण्यात आली. या पदावर तिच्या हाताखाली कोणीही कर्मचारी नव्हते. तिला बऱ्याच काळासाठी व्यवस्थापकांच्या बैठकीतून वगळले होते. तिच्या पुरुष सहकाऱ्यांना वरिष्ठ व्यवस्थापक पदावर बढती देण्यात आली.परंतु तिला तिच्या पूर्वीच्या पदावर पुन्हा रुजू करून घेण्यात आले नाही, असा आरोप याचिकाकर्तीने केला.

**प्रसूती लाभ केवळ रजेपुरते मर्यादित नाहीत**

प्रसूती लाभ कायदा-१९६१ च्या कलम १२ चे संरक्षण हे प्रसूती रजेदरम्यान बडतर्फीपासूनच्या संरक्षणापलीकडे विस्तारलेले आहे. ही तरतूद एखाद्या महिलेला गर्भधारणा किंवा प्रसूती रजेमुळे तिच्या सेवाशर्तींमध्ये होणाऱ्या प्रतिकूल बदलांपासून देखील संरक्षण देते. यामध्ये पदावनती, व्यवस्थापकीय किंवा पर्यवेक्षकीय अधिकारात कपात, कमी महत्त्वाच्या पदावर बदली, पदोन्नतीच्या संधी नाकारणे आणि प्रमुख जबाबदाऱ्या काढून घेणे यांचा समावेश असू शकतो, असे निरीक्षण मत उच्च न्यायालयाने नोंदवले. (वृत्तसंस्था)

# टोल नाक्यांवर सीसीटीव्ही का बसवले जाऊ शकत नाहीत?

## सर्वोच्च न्यायालयाचा सवाल; महामार्गांवरील अतिक्रमणांवर व्यक्त केली चिंता

**नवी दिल्ली, ३ सप्टेंबर**

महामार्गांवरील अतिक्रमणे आणि त्यावर उभ्या असलेल्या वाहनांबाबत सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी चिंता व्यक्त केली. या समस्येचा सामना करण्यासाठी टोल नाक्यांवर सीसीटीव्ही कॅमेरे आणि देखरेख कक्ष का उभारले जाऊ शकत नाहीत, असा प्रश्न भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला (एनएचएआय) विचारला.



महामार्गांवरील अतिक्रमणे आणि तिथे उभी असलेली वाहने या दोन प्रमुख समस्या आहेत, असे राजस्थानमधील फलोदी भागात १५ जणांचा बळी घेणाऱ्या अपघाताची स्वतःहून दखल घेतलेल्या प्रकरणावर सुनावणी करताना न्या. विक्रम नाथ आणि न्या. संदीप मेहता यांच्या न्यायासनाने सांगितले. महामार्गांवरील अनधिकृत पार्किंग तपासण्यासाठी नियमित पाहणी आणि गस्त घालण्याबाबत परिपत्रके जारी केली आहेत, असे एनएचएआयच्या वतीने युक्तिवाद करणाऱ्या वकिलाने सांगितले. तुम्ही कॅमेरा पाळत ठेवण्याच्या प्रणालीचा विचार का करत नाही? सर्व टोल नाक्यांवर तुम्ही देखरेख कक्ष उभारू शकता, असे न्यायासनाने सांगितले.

महामार्गांवरील वाहनांचे बेकायदेशीर पार्किंग प्रमुख समस्या आहे. या मुळे रस्ते अपघात होतात, असे न्यायालयीन मित्र वरिष्ठ विधिज्ञ ए.एन.एस. नाडकर्णी यांनी सांगितले. रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय, गृह मंत्रालयाने या प्रकरणात अद्याप आपली अनुपालन शपथपत्रे दाखल केलेली नाहीत, असे न्यायासनाने स्पष्ट केले. शपथपत्रे दाखल करण्यासाठी न्यायालयाने दोन्ही मंत्रालयांना दोन आठवड्यांचा कालावधी दिला. न्यायालयाने या प्रकरणाची सुनावणी ६ ऑक्टोबर रोजी निश्चित केली.

कोणतेही अवजड किंवा व्यावसायिक वाहन नियुक्त केलेल्या बे, ले-बाय किंवा मार्गावरील सुविधांव्यतिरिक्त इतर कोणत्याही राष्ट्रीय महामार्गाच्या कॅरेज-वेवर किंवा पक्क्या कडेला पार्क करू नये किंवा थांबवू नये, असा अंतरिम निर्देश न्यायालयाने १३ एप्रिल रोजी दिला होता. कोणत्याही राष्ट्रीय महामार्गाच्या 'राईट ऑफ वे' (रस्त्यासाठी राखीव असलेल्या जागेच्या) क्षेत्रात नवीन 'ढाबा', खानावळ किंवा व्यावसायिक बांधकामास अथवा त्यांच्या संचालनासही मनाई करण्यात आली होती. (वृत्तसंस्था)

### फलोदीत नोव्हेंबरमध्ये झाला अपघात


फलोदी येथे मागील वर्षी २ नोव्हेंबर रोजी झालेल्या एका रस्ते अपघाताची न्यायालयाने स्वतःहून दखल घेतली; या अपघातात एका 'टेम्पो ट्रॅव्हलर'ने उभ्या असलेल्या ट्रेलर ट्रकला धडक दिली होती. ही घटना भारतमाला महामार्गावरील माटोडा गावाजवळ घडली. त्यावेळी 'टेम्पो ट्रॅव्हलर' बिकानेरच्या कोलायत मंदिराकडून जोधपूरच्या दिशेने जात होती.

# सर्व राज्यांनी बाईक टॅक्सीला मंजुरी द्यावी

## आठ कोटी रोजगारांची निर्मिती होईल : गडकरी

**मुंबई, ३ सप्टेंबर**

खाजगी बाईक आणि स्कूटरने प्रवाशांना घेऊन जाण्याच्या सुविधेमुळे, विशेषतः ग्रामीण भागात रोजगाराच्या मोठ्या संधी निर्माण होतील. यामुळे सुमारे आठ कोटी लोकांना रोजगार मिळू शकतो, असा विश्वास व्यक्त करत केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांनी सर्व राज्य सरकारांना बाईक टॅक्सीला मंजुरी देण्याचे आवाहन केले.



गडकरी पुढे म्हणाले, केंद्राने बाईक टॅक्सीला परवानगी दिली आहे. परंतु वाहतूक हा राज्याचा विषय असल्याने काही राज्यांमध्ये अजूनही याला मंजुरी मिळालेली नाही. राज्यांनी यास मंजुरी दिल्यास लोकांना उत्पन्नाचे नवीन साधन मिळू शकेल, असा दावाही त्यांनी केला. सरकार वारंवार वाहतूक नियम मोडणाऱ्या वाहनचालकांवर कठोर कारवाई करेल. यासाठी मोटार वाहन कायद्यात बदल करून चालकांसाठी निगेटिव्ह पॉइंट सिस्टम लागू करण्याचा प्रस्ताव आहे, असेही ते म्हणाले.

**अवजड वाहन चालकांना प्रशिक्षण आवश्यक**

अवजड वाहन आणि बांधकाम उपकरणे चालवणाऱ्या चालकांना अनिवार्य प्रशिक्षण आवश्यक असल्याचे सांगत ते म्हणाले, सध्या अशी कोणतीही आवश्यक व्यवस्था नाही. त्यामुळे जेसीबी इंडियासारख्या कंपन्यांनी उपकरणे देण्यापूर्वी चालकांना प्रशिक्षण द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले. रकारने 'सुरक्षा' पायलट कार्यक्रम सुरू केला. या अंतर्गत महामार्ग, खाणकाम आणि बांधकाम यांसारख्या जोखमीच्या कामांशी संबंधित सुमारे १० लाख चालक आणि कर्मचाऱ्यांची मोफत वैद्यकीय तपासणी आणि समुपदेशन केले जाईल. पहिल्या टप्प्यात नागपूर-कामठी येथील एनएच-४४ आणि चंद्रपूरच्या खाणकाम क्षेत्रात सुमारे १० हजार लोकांची तपासणी करण्याचे उद्दिष्ट आहे, असेही त्यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### सत्येंद्र जैन यांना जामीन



**नवी दिल्ली :** दिल्ली जल बोर्ड घोटाळा प्रकरणात राउस ॲव्हेन्यू न्यायालयाने दिल्लीचे माजी मंत्री सत्येंद्र जैन यांना जामीन मंजूर केला आहे. याच प्रकरणात लाचलुचपत प्रतिबंधक शाखेने (एसीबी) त्यांना अटक केली होती. जैन यांना २ लाख रुपयांच्या जामीनपत्रावर आणि तेवढ्याच रकमेच्या दोन जामीनदारांच्या अटीवर जामीन मंजूर करण्यात आला. लाचलुचपत प्रतिबंधक शाखेने १८ ऑगस्ट दिल्ली जल बोर्डाच्या सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाच्या निविदेतील कथित अनियमितता आणि भ्रष्टाचाराप्रकरणी माजी मंत्री सत्येंद्र जैन यांच्यासह सहा आरोपींना अटक केली होती. यात तत्कालीन डीजेबीचे सीईओ आणि आयएएस अधिकारी उदित प्रकाश राय, मंडळाचे माजी कंत्राट सल्लागार अंकित श्रीवास्तव, एएन एंटरप्रायझेसचे मालक नागेंद्र यादव, युरोटेक एन्व्हायर्नमेंट प्रायव्हेट लिमिटेडचे मालक राजा कुमार कुर्रा आणि सृजनहारचे मालक पंकज वर्मा यांचा समावेश होता.

# इराणसोबत करार केल्यास भारतावर निर्बंध

## अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री रुबियो यांचा इशारा

**वॉशिंग्टन, ३ सप्टेंबर**

एससीओ परिषदेत पंतप्रधान मोदी यांनी इराणचे राष्ट्रपती पेझेश्कियान यांनी भेट घेतली, यावेळी दोन्ही नेत्यांमध्ये करारासंदर्भात चर्चा झाल्याचे वृत्त अमेरिकन माध्यमांमध्ये प्रसिद्ध झाले. यावर परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांना माध्यमांनी प्रश्न विचारला असता ते म्हणाले, मला वाटत नाही की भारत आणि इराण यांच्यात कोणताही व्यापार करार होईल. भारताने इराणसोबत कोणताही करार केल्यास त्यांच्यावरही आम्ही निर्बंध घालू. इराणला मदत करणाऱ्या कोणत्याही राष्ट्राला किंमत चुकवावी लागेल.

मोदी आणि इराणचे राष्ट्रपती मसूद पेझेश्कियान यांच्या भेटीबद्दल पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर बोलताना रुबियो म्हणाले, जर कोणताही देश इराणला अमेरिकेच्या निर्बंधांपासून वाचण्यास मदत करेल, तर अमेरिका त्या देशावरही निर्बंध लादेल. जर एखादा देश या क्षेत्रांमध्ये इराणसोबत असा व्यवसाय करत असेल, ज्यामुळे त्याला पैसे किंवा आर्थिक फायदा मिळत असेल, तर अमेरिका त्या देशावरही कठोर कारवाई करेल. (वृत्तसंस्था)

# राम मंदिर ट्रस्टमध्ये लवकरच 'डेप्युटी सीईओ'ची नियुक्ती

## नवीन सरचिटणीस गोविंददेव गिरी यांची माहिती

**अयोध्या, ३ सप्टेंबर**

अयोध्या येथील श्री राम मंदिर ट्रस्टच्या पहिल्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी (सीईओ) एअर मार्शल (निवृत्त) जितेंद्र मिश्रा यांच्या नियुक्तीनंतर आता लवकरच उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची (डेप्युटी सीईओ) नियुक्ती केली जाणार असल्याची माहिती ट्रस्टचे नवनियुक्त सरचिटणीस महंत गोविंददेव गिरी यांनी दिली.

शोध समितीने पारदर्शक प्रक्रियेद्वारे उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या निवडीचा मार्ग मोकळा केला. उपलब्ध पॅनेलमधून या पदावर नियुक्ती केली जाईल. ट्रस्टच्या अधिकृत प्रवक्त्यासाठी योग्य व्यक्तीचा शोध अद्याप सुरू असल्याने ही नियुक्ती सध्या स्थगित ठेवण्यात आली आहे. (वृत्तसंस्था)

### शेअर बाजारात सलग चौथ्या दिवशी घसरण

**मुंबई :** मीडिया, रिॲल्टी आणि बँकिंग क्षेत्रातील समभागांमधील खरेदीनंतरही ऑटो, आयटी आणि फार्मा शेअर्समधील विक्रीच्या दबावामुळे गुरुवारी सलग चौथ्या सत्रात भारतीय शेअर बाजारात घसरण पाहायला मिळाली. सकारात्मक जागतिक संकेत आणि कच्च्या तेलाच्या घसरलेल्या किमतींमुळे बाजाराची सुरुवात तेजीने झाली होती. सत्राच्या सुरुवातीला निफ्टीने २४,००० चा टप्पा पुन्हा पार केला होता. मात्र, ही तेजी टिकू शकली नाही.

# 'वंदे भारत'मधील फिरती आसन व्यवस्था बदलणार

## रेल्वे अभियंत्यांनी मांडली नवीन कल्पना

**नवी दिल्ली, ३ सप्टेंबर**

वंदे भारत ट्रेनच्या एक्झिक्युटिव्ह क्लासमधील फिरत्या आसनांची व्यवस्था बदलण्याचा आणि परिचालन कार्यक्षमता सुधारण्यासाठी आसने अधिक मजबूत करण्याचा प्रस्ताव वरिष्ठ रेल्वे अभियंत्यांनी दिला आहे. ही व्यवस्था ट्रेनचे चर्चेत असलेले प्रमुख वैशिष्ट्य आहे. त्यांच्या मते, या सुविधेसाठी अधिक जागेची आवश्यकता असते.त्यामुळे भागांची झीज होण्याची शक्यता वाढते, परिणामी वारंवार देखभालीची गरज भासते.

हा प्रस्ताव नुकत्याच झालेल्या 'प्रिन्सिपल चीफ मेकॅनिकल इंजिनिअर्स' परिषदेत चर्चेला आला. परिषदेत डबे उत्पादन युनिट्सनी या डब्यांमधील फिरत्या आसनांची सोय काढून टाकून पारंपरिक शताब्दी आणि इतर गाड्यांप्रमाणे आसने स्थिर करण्याची कल्पना मांडली. वरिष्ठ अभियंत्यांनी असेही सुचवले की, आसने स्थिर केल्याने ती फिरवण्यासाठी आवश्यक असलेली जागा मोकळी होईल.त्यामुळे डब्यात आसनांची एक अतिरिक्त रांग जोडणे शक्य होईल.

### गुंतागुंतीची यंत्रणा

एका वरिष्ठ रेल्वे अधिकाऱ्यानुसार, सध्याच्या वंदे भारत एक्झिक्युटिव्ह क्लासमध्ये, प्रवासी आसनांमध्ये फिरण्याची आणि मागे झुकण्याची दोन्ही यंत्रणा आहे. यामुळे प्रवाशांना ट्रेनच्या गतीनुसार आसनाची दिशा खिडकीकडे, प्रवासाच्या दिशेकडे किंवा विरुद्ध दिशेकडे समायोजित करता येते.सध्याच्या फिरणाऱ्या वैशिष्ट्यासाठी आसनाच्या आजूबाजूला अतिरिक्त यांत्रिक घटक, मोकळी जागा आणि जागेची आवश्यकता असते.त्यामुळे हे घटक झिजण्याची, सैल होण्याची आणि निकामी होण्याची शक्यता वाढते.परिणामी वारंवार देखभालीची आवश्यकता भासते. ही एक गुंतागुंतीची यंत्रणा आहे, असे तज्ज्ञांचे मत आहे.

**डब्यांमध्ये आसनांची संख्या वाढेल**

रेल्वे बोर्डानुसार, वंदे भारतच्या एक्झिक्युटिव्ह क्लासच्या डब्यांमधील फिरत्या आसनांची सोय काढून टाकून आसने अधिक मजबूत केली जाऊ शकतात. त्यामुळे आसनांच्या रांगांमधील अंतर कमी करता येत असल्याने एक्झिक्युटिव्ह क्लासच्या डब्यांमध्ये आसनांची आणखी एक रांग वाढवता येईल या सूचनेवर कार्यवाही सुरू करण्यासाठी चेन्नई येथील इंटिग्रल कोच फॅक्टरीच्या प्रधान मुख्य यांत्रिक अभियंत्यांना नियुक्त केले आहे. सध्या, वंदे भारत चेअर कार ट्रेनच्या एक्झिक्युटिव्ह क्लासच्या डब्यांमध्ये १८०-अंश फिरणारी आसने आहेत.ते वंदे भारत एक्झिक्युटिव्ह क्लासला इतर वर्गांपेक्षा तसेच आसनव्यवस्था असलेल्या इतर गाड्यांपेक्षा वेगळे ठरवणारे एक वैशिष्ट्य आहे. (वृत्तसंस्था)

# ...तर पाकिस्तान जगाच्या नकाशात दिसणार नाही

## मोदींचा फोटो क्रॉप केल्याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा संताप

**मुंबई, ३ सप्टेंबर**

किर्गिझस्तानची राजधानी बिश्केक येथे झालेल्या शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर परिषदेनंतर जागतिक नेत्यांनी एकत्र येत छायाचित्र काढले. मात्र, पाकिस्तानने संबंधित छायाचित्रे समाज माध्यमावर प्रसिद्ध करताना पंतप्रधान मोदींचा फोटो कापून आपली पातळी दाखवून दिली. पण मोदी यांनी मनात आणले तर, ते पाकिस्तानला जगाच्या नकाशावरून हटवू शकतात, असा संताप उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.

पाकिस्तानच्या पंतप्रधान कार्यालयाने परिषदेत उपस्थित राहिलेल्या जागतिक नेत्यांचा फोटो समाज माध्यमांवर पोस्ट करताना त्यातील पंतप्रधान नरेंद्र मोदींचा फोटो क्रॉप केला होता. त्यावरून शिंदे यांनी संताप व्यक्त केला. वृत्तसंस्थेशी बोलत ते म्हणाले, पाकिस्तानचे कृत्य दुर्दैवी आहे. पाकिस्तानकडून अशा प्रकारची कृत्ये अनेकदा झाली. त्यांनी फक्त फोटो हटवला. पण, पंतप्रधान मोदींनी मनात आणले तर ते जगाच्या नकाशावरून पाकिस्तानला हटवू शकतात. 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये पाकिस्तानला हात टेकण्यास पंतप्रधान मोदी आणि भारतीय सैन्याने भाग पाडले. यामुळे पाकिस्तानने आमच्याशी आगळीक करण्याचा कधीही प्रयत्न करू नये. फोटो हटविण्यासारखे हीन कृत्य केले तरी देशातील १४० कोटी जनतेच्या मनातून ते पंतप्रधान मोदींना काढू शकत नाहीत. पाकिस्तानने फोटो क्रॉप करण्याचे कृत्य करून स्वतःवर नामुष्की ओढवून घेतली आहे, असे ते म्हणाले. (वृत्तसंस्था)



## अग्रलेख

# न्यायाने दाखविलेली 'नवी दिशा'!

गेल्या सुमारे सहा वर्षांपासून महाराष्ट्राच्या राजकारणाला, समाजमनाला आणि प्रसारमाध्यमांना अक्षरशः झपाटून टाकणाऱ्या दिशा सालियन मृत्यू प्रकरणाचा तपास केंद्रीय अन्वेषण विभागाकडे सोपविण्याचा आदेश देताना मुंबई उच्च न्यायालयाने नोंदविलेली काही निरीक्षणे या संपूर्ण प्रकरणाच्या पलीकडे जाऊन न्यायाच्या एका मूलभूत तत्त्वावर बोट ठेवणारी ठरणार आहेत. केवळ आरोप झाला म्हणून कोणाला आरोपी मानता येत नाही. तपासातून पुरेसे साहित्य आणि वाजवी संशय निर्माण झाला तरच त्या दिशेने पुढे जाता येईल, असा निर्वाळा न्यायालयाने दिल्याने, वर्षानुवर्षे साधी वाटणारी न्यायालयाची ही भूमिका फौजदारी न्यायव्यवस्थेच्या दृष्टीने महत्त्वाची ठरणार आहे. दिशा सालियनचा मृत्यू ८ जून २०२० रोजी मुंबईतील मालाड परिसरातील एका उंच इमारतीवरून पडल्याने झाला. सुरुवातीचा पोलिस तपास, आत्महत्या किंवा अपघाती मृत्यूची दिशा, त्यानंतर उपस्थित झालेले प्रश्न आणि व्यक्त होणारे वेगवेगळे संशय, कुटुंबीयांनी केलेले आरोप आणि या प्रकरणाला मिळालेले प्रचंड राजकीय परिमाण यामुळे हे प्रकरण सतत चर्चेत राहिले, पण आरोप-प्रत्यारोप, संशय, शंका-कुशंका, राजकीय हितसंबंध, तपास यंत्रणांवरील प्रश्नचिन्हे आणि त्यातून निर्माण झालेला जनमताचा गदारोळ यामुळे एका तरुणीच्या मृत्यूचे सत्य शोधण्याचा मूळ प्रश्न मात्र, राजकीय आखाड्यातच काहीसा हरवून गेला. अखेर दिशाचे वडील सतीश सालियन यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली. त्यांच्या याचिकेत तपासावर गंभीर आक्षेप घेण्यात आले आणि नव्याने चौकशीची मागणी करण्यात आली. या प्रकरणी प्राथमिक चौकशी अहवाल नोंदवून सखोल तपास करण्याचे निर्देश उच्च न्यायालयाने बुधवारी, २ सप्टेंबर रोजी सीबीआयला दिल्याने, गेल्या सहा वर्षांपासून न्यायाच्या प्रतीक्षेत केवळ लोंबकळत राहिलेल्या या प्रकरणास निकालाच्या दृष्टीने एक नेमकी दिशा मिळाली, असे म्हणता येईल.

सीबीआय चौकशीच्या आदेशाबरोबरच, 'आरोपी' या शब्दाभोवती न्यायालयाने आखून दिलेली मर्यादा ही या निर्देशांसोबतची आणखी एक महत्त्वाची बाबदेखील या मुंबई उच्च न्यायालयाच्या या आदेशातून स्पष्ट झाली आहे, आणि कदाचित, हादेखील या आदेशाचा एक महत्त्वाचा भाग ठरतो. प्राथमिक चौकशी अहवाल (एफआयआर) नोंदविण्याचा आदेश म्हणजे कोणत्याही व्यक्तीच्या दोषी असण्याचा निष्कर्ष नाही, त्यामुळे तपास यंत्रणांना आरोप ठेवण्याइतपत पुरेसे पुरावे हाती आल्याखेरीज कोणासही आरोपी म्हणून वागवले जाऊ नये, तसेच कोणाही निरपराध व्यक्तीस त्रास होणार नाही आणि गुन्हेगार आढळल्यास त्याला न्यायालयीन प्रक्रियेस सामोरे जावेच लागेल या दोन्ही बाबींमध्ये संतुलन राखण्याची सूचनाही न्यायालयाने केली आहे. असे संतुलन हेच फौजदारी न्यायव्यवस्थेचे प्राणतत्त्व आहे. भारतीय दंडसंहितेचे रूपांतर न्याय संहितेत झाले, तेव्हा न्यायाच्या या मूलभूत संकल्पनेचा नेमका मापदंड या प्रकरणातील न्यायालयाच्या स्पष्ट भूमिकेमुळे अधोरेखित झाला असून, प्राथमिक चौकशी अहवाल म्हणजे दोषसिद्धी हा गैरसमज पुसून टाकणारा ठरला आहे. कारण आपल्या सार्वजनिक चर्चेत याच मुद्द्यावरून सर्वाधिक गोंधळ होत असतो. माध्यमांमध्ये 'आरोपी' हा शब्द आला, की त्याचा सामाजिक न्यायनिवाडा आणि सामाजिक शिक्षादेखील सुरू होते. म्हणजे, अशा प्रकरणांतील न्यायालयीन खटला सुरू होण्याआधीच सार्वजनिक न्यायालयात त्याचा निकालदेखील लागलेला असतो. दिशा सालियन प्रकरणातील न्यायालयाच्या निर्देशांनुसार नेमके याच धोक्याकडे लक्ष वेधले गेले आहे, असे दिसते. वस्तुतः, एफआयआर हा तपासाच्या अखेरचा टप्पा नसून ती सुरुवात असते. तक्रार म्हणजे सत्याचा अंतिम पुरावा नसतो, संशय म्हणजे गुन्हा सिद्ध होणे नसते, चौकशीतील संशयित व्यक्ती म्हणजे आरोपी नसतो आणि आरोपी म्हणजे दोषी-गुन्हेगार तर मुळीच नसतो, ही जाणीव सार्वजनिक चर्चेत सहसा जाणवत नाही. केवळ गुन्हेगारास शिक्षा देणे हा न्यायव्यवस्थेचा उद्देश नसतो, तर कोणाही निरपराधी व्यक्तीस शिक्षा होऊ नये याची काळजी घेणे हा या व्यवस्थेचा त्याहून मोठा उद्देश असतो. म्हणूनच दिशा सालियन प्रकरणातील न्यायालयाच्या भूमिकेकडे राजकीय चष्म्यातून पाहण्याऐवजी, न्यायव्यवस्थेच्या व्यापक तत्त्वांच्या संदर्भात पाहावयास हवे. कारण या प्रकरणाचा दुसरा महत्त्वाचा धडा तपास यंत्रणांच्या कार्यपद्धतीशीदेखील संबंधित आहे. आत्महत्या, अपघात किंवा संशयास्पद मृत्यू असा एखाद्या मृत्यूचा प्राथमिक अंदाज असेल, तर तपास यंत्रणेला उपलब्ध प्रत्येक शक्यता तपासावी लागते. सुरुवातीच्या निष्कर्षांना चिकटून राहून नंतर समोर आलेल्या विसंगतींकडे दुर्लक्ष करणे धोकादायक ठरू शकते. आधीच्या तपासात विसंगती असल्याचे नमूद करून उच्च न्यायालयाने याच कारणामुळे आधीच्या तपासाबाबत प्रश्न उपस्थित केले आहेत.

कोणासही गोवले जात असल्याच्या किंवा कोणासही वाचविले जात असल्याच्या संशयापासून कोणताही तपास स्वतंत्र आणि मुक्त असला पाहिजे, त्यातून केवळ सत्य सिद्ध झाले पाहिजे हीच न्यायाची पहिली अट असते. हे तत्त्व स्वीकारले, तर देशातील अनेक तुरुंगांमध्ये गुन्हा सिद्ध होऊन शिक्षा भोगणाऱ्या कैद्यांपेक्षा, न्यायालयीन खटला सुरू असलेल्या 'अंडरट्रायल' कैद्यांचा मुद्दा ऐरणीवर येऊ शकतो. काही माहिती स्रोतांच्या आकडेवारीनुसार, देशातील सुमारे ७० टक्के कैदी केवळ 'अंडरट्रायल' म्हणून विविध तुरुंगांत न्यायाच्या प्रतीक्षेत दिवस ढकलत आहेत. महाराष्ट्रातही परिस्थिती याहून फारशी वेगळी नाही. एखादा माणूस दोषी ठरलेला नाही, पण तो तुरुंगात आहे, त्याचा खटला सुरू आहे. सुनावणी पुढे ढकलली जाते. साक्षीदार येत नाही. सरकारी वकील बदलतो. कागदपत्रे उपलब्ध होत नाहीत. जामिनासाठी हमीदार मिळत नाही. आर्थिक परिस्थिती कमकुवत असल्यामुळे चांगला वकील मिळत नाही आणि वर्षे सरतात. एखाद्या व्यक्तीचा गुन्हा सिद्ध होऊन त्यास शिक्षा ठोठावली गेली नाही, तरीदेखील अशा प्रकारे शिक्षा भोगावी लागत असेल, अशा व्यवस्थेखाली न्यायालयाच्या या आदेशाने एक दिशा दिली आहे. अर्थात, या आदेशामुळे सर्व अंडरट्रायल कैदी मुक्त होतील असे नाही, पण या आदेशातून निर्माण होणारे न्यायिक तत्त्व महत्त्वाचे आहे. केवळ आरोपाच्या किंवा संशयाच्या आधारावर एखाद्यास सामाजिकदृष्ट्या दोषी मानणे चुकीचे असेल, तर केवळ संशयाच्या आधारावर दीर्घकाळ एखाद्याचे स्वातंत्र्य हिरावून घेणाऱ्या प्रक्रियेच्या कठोर न्यायिक तपासणीची गरजदेखील या निमित्ताने अधोरेखित होणार आहे. त्यामुळे, दिशा सालियन प्रकरणातील न्यायालयाचा आरोपीच्या संदर्भ संबंधित आदेश हा अचानक निर्माण झालेला नवा सिद्धांत नसून भारतीय फौजदारी न्यायव्यवस्थेत आधीपासून असलेल्या न्यायाच्या व्यापक तत्त्वाला अधिक अधोरेखित करणारा आहे, असे म्हणता येईल. एखाद्या सामान्य, गरीब आरोपीला जामीन मिळाला तरी जामिनदारांची रक्कम, हमीदार, कागदपत्रे किंवा कायदेशीर मदत यांचा प्रश्न उभा राहतो. काही प्रकरणांमध्ये तपास लांबतो. काही प्रकरणांमध्ये आरोपपत्र दाखल होण्यास विलंब होतो. आरोप निश्चित होण्यास वेळ जातो. त्यानंतर साक्षी, उलटतपासणी, न्यायालयीन तारखा आणि न्यायाची दीर्घकाळ प्रतीक्षा करत तुरुंगात रखडणारी व्यक्ती आपले कुटुंब, रोजगार, शिक्षण, प्रतिष्ठा आणि मानसिक स्थैर्य गमावत असते. गुन्हा सिद्ध होईपर्यंत कोणीही कायद्याच्या दृष्टीने दोषी नसतो, तरीही अंडरट्रायल अवस्थेत अशा व्यक्ती शिक्षा भोगतच असतात. ही विसंगती दूर करण्यासाठी न्यायालयीन निर्देश पुरेसे नाहीत. न्यायप्रक्रियेतील यंत्रणांना या त्रुटी दूर करण्याची जबाबदारी स्वीकारावी लागेल. दिशा सालियन प्रकरणी निर्देशांतील ही एक सार्वत्रिक दिलासादायक बाब ठरणार असेल, तर एकूणच यंत्रणांच्या कार्यपद्धतीस नवी दिशा मिळेल आणि ते व्यापक हिताचे ठरेल, यात शंका नाही. ■

## अर्थविशेष

# मालमत्ता व्यवहारातील एक महत्त्वाचा प्रश्न

**ॲड. हितेश पारसे**

**रेडी रेकनरपेक्षा कमी किमतीत मालमत्ता खरेदी-विक्री केली तर आयकराचा काय परिणाम होतो?**

घर, सदनिका, भूखंड, दुकान किंवा कार्यालय खरेदी-विक्री करताना सर्वप्रथम एकच गोष्ट ठरते-मालमत्तेची किंमत किती? खरेदीदाराला मालमत्ता योग्य आणि शक्य तितक्या कमी किमतीत मिळावी असे वाटते, तर विक्रेत्याला आपल्या मालमत्तेची योग्य किंमत मिळावी अशी अपेक्षा असते. किंमत निश्चित झाल्यानंतर मुद्रांक शुल्क भरले जाते, खरेदी-विक्रीचा दस्तावेज तयार केला जातो आणि मालमत्तेची नोंदणी केली जाते. परंतु अनेकांना माहिती नसते की मालमत्तेच्या व्यवहारात खरेदीदार आणि विक्रेता यांनी परस्पर संमतीने ठरविलेली किंमत ही आयकराच्या दृष्टीने प्रत्येक वेळी अंतिम किंमत असेलच असे नाही. येथे महत्त्वाची भूमिका बजावते ती शासनाने निश्चित केलेल्या रेडी रेकनर दराची, म्हणजेच मुद्रांक शुल्कासाठी निश्चित करण्यात आलेल्या मालमत्तेच्या मूल्याची. जर मालमत्तेची प्रत्यक्ष खरेदी-विक्री किंमत आणि रेडी रेकनरनुसार निश्चित मूल्य यामध्ये मोठा फरक असेल, तर त्याचा परिणाम केवळ विक्रेत्याच्या करावरच नव्हे, तर काही परिस्थितींमध्ये खरेदीदाराच्या करावरही होऊ शकतो.

म्हणून मालमत्तेचा व्यवहार करण्यापूर्वी प्रत्येकाने स्वतःला एक प्रश्न विचारणे आवश्यक आहे- मी ज्या किमतीत मालमत्ता विकत आहे किंवा खरेदी करीत आहे, त्या व्यवहाराचा माझ्या आयकरावर काय परिणाम होईल?

रेडी रेकनर दर म्हणजे काय? महाराष्ट्र शासनाकडून मालमत्तेच्या नोंदणीसाठी आणि मुद्रांक शुल्क निश्चित करण्यासाठी विविध भागांतील मालमत्तेचे मूल्य ठरविले जाते. यालाच सर्वसाधारणपणे रेडी रेकनर दर म्हटले जाते. मालमत्तेचा प्रत्यक्ष बाजारभाव आणि रेडी रेकनरनुसार ठरविलेले मूल्य हे नेहमी समान असेलच असे नाही. उदाहरणार्थ, एखाद्या परिसरातील सदनिकेची प्रत्यक्ष बाजारातील किंमत ८० लाख रुपये असू शकते, तर रेडी रेकनरनुसार त्याचे मूल्य ९० लाख रुपये असू शकते. मुद्रांक शुल्क आणि नोंदणीसाठी रेडी रेकनर मूल्य महत्त्वाचे असते. परंतु या मूल्याचा आयकराच्या गणनेवरही परिणाम होऊ शकतो, ही बाब अनेक नागरिकांच्या लक्षात येत नाही.

**एकच व्यवहार आणि दोघांवरही कराचा परिणाम :** समजा, एखादी मालमत्ता १ कोटी रुपयाला विकली जाते. मात्र, त्या मालमत्तेचे रेडी रेकनरनुसार मूल्य १ कोटी २५ लाख रुपये आहे. म्हणजे विक्रेत्याला प्रत्यक्षात १ कोटी रुपये मिळत आहेत आणि खरेदीदारही प्रत्यक्षात १ कोटी रुपये देत आहे. परंतु आयकराच्या दृष्टीने प्रश्न निर्माण होतो- या दोन्ही रकमांमधील २५ लाख रुपयांच्या फरकाचे काय? हा फरक काही परिस्थितींमध्ये विक्रेता आणि खरेदीदार या दोघांसाठीही महत्त्वाचा ठरू शकतो. विक्रेत्याच्या बाबतीत आयकर कायद्यातील कलम ५०सी महत्त्वाचे ठरते, तर खरेदीदाराच्या बाबतीत कलम ५६(२)(एक्स) विचारात घेतले जाऊ शकते.

**विक्रेत्याला प्रत्यक्ष मिळालेल्या रकमेपेक्षा जास्त रकमेवर कर लागू शकतो का?**

अनेकांना हे आश्चर्यकारक वाटेल, परंतु काही परिस्थितींमध्ये असे होऊ शकते. मालमत्ता विक्रेत्याच्या दृष्टीने भांडवली मालमत्ता असल्यास, तिच्या विक्रीतून होणार्‍या भांडवली नफ्याच्या गणनेवर आयकर कायद्यातील कलम ५०सीचा परिणाम होऊ शकतो.

समजा- प्रत्यक्ष विक्री किंमत - ८० लाख रुपये; रेडी रेकनरनुसार मूल्य - १ कोटी रुपये

विक्रेत्याच्या बँक खात्यात प्रत्यक्षात ८० लाख रुपये जमा झाले आहेत. तरीही, काही परिस्थितींमध्ये आयकरासाठी विक्री मूल्य ८० लाख रुपये न मानता १ कोटी रुपये विचारात घेतले जाऊ शकते. याचा थेट परिणाम विक्रेत्याच्या भांडवली नफ्याच्या गणनेवर होतो.

हे एका उदाहरणातून समजून घेऊया : समजा, एखाद्या व्यक्तीने काही वर्षांपूर्वी मालमत्ता खरेदी केली होती आणि आता ती विकण्याचा निर्णय घेतला आहे. त्या मालमत्तेची प्रत्यक्ष विक्री किंमत ८० लाख रुपये असून रेडी रेकनरनुसार मूल्य १ कोटी रुपये आहे. जर संबंधित कायदेशीर तरतुदी लागू झाल्या आणि सुरक्षित मर्यादेचा लाभ उपलब्ध नसला, तर भांडवली नफ्याची गणना ८० लाख रुपयांऐवजी 1 कोटी रुपये हे विक्री मूल्य मानून होण्याची शक्यता असते. म्हणजेच, प्रत्यक्षात ८० लाख रुपये मिळाले असले, तरी कराच्या गणनेत १ कोटी रुपये विचारात घेतले जाऊ शकतात. परिणामी विक्रेत्याचा करपात्र भांडवली नफा वाढू शकतो. मग विक्रेत्याला किती कर भरावा लागू शकतो? याचे एकच निश्चित उत्तर देता येत नाही कारण भांडवली नफ्याची गणना अनेक बाबींवर अवलंबून असते.

**उदाहरणार्थ-** मालमत्ता किती वर्षांपासून मालकीची आहे?

- अल्पकालीन किंवा दीर्घकालीन भांडवली नफा लागू होतो का?
- मालमत्तेची मूळ खरेदी किंमत किती होती?
- कायद्यानुसार किंमत निर्देशांकाशी संबंधित लाभ उपलब्ध आहे का?
- मालमत्तेच्या खरेदी किंवा विक्रीसाठी झालेला खर्च किती आहे?
- नवीन घरात गुंतवणूक केल्यास उपलब्ध असलेल्या करसवलती लागू होतात का?

म्हणून प्रत्येक मालमत्ता व्यवहाराची स्वतंत्र करगणना करणे आवश्यक आहे. परंतु एक गोष्ट निश्चित आहे-रेडी रेकनरनुसार मूल्य जास्त असल्यास विक्रेत्याचा करपात्र भांडवली नफा वाढण्याची शक्यता असते.

आता खरेदीदाराच्या दृष्टीने पाहू या. सामान्यतः एखादी मालमत्ता कमी किमतीत मिळाली तर खरेदीदाराला वाटते की त्याने चांगला व्यवहार केला. परंतु आयकराच्या दृष्टीने प्रश्न निर्माण होतो- रेडी रेकनर मूल्यापेक्षा खूप कमी किमतीत मालमत्ता खरेदी केल्यास त्या फरकावर कर लागू होऊ शकतो का? काही परिस्थितींमध्ये उत्तर होय आहे.

**खरेदीदारासाठी आयकराचा परिणाम :**

समजा- खरेदी किंमत - ७० लाख रुपये

रेडी रेकनरनुसार मूल्य - ९० लाख रुपये

दोन्ही रकमांमधील फरक २० लाख रुपये आहे. जर हा फरक आयकर कायद्यातील निर्धारित मर्यादेपेक्षा जास्त असेल, तर काही परिस्थितींमध्ये ही रक्कम खरेदीदाराच्या करपात्र उत्पन्नात समाविष्ट होऊ शकते. या प्रकारच्या उत्पन्नाचा विचार इतर स्रोतांमधून मिळालेले उत्पन्न या प्रकारात केला जाऊ शकतो. म्हणजेच, खरेदीदाराने मालमत्ता ७० लाख रुपयांना खरेदी केली असली तरी, २० लाख रुपयांचा मूल्यफरक त्याच्या उत्पन्नावर परिणाम करू शकतो. ■

(पूर्वार्ध)

## डिजिटल जनजागृती

# मुलांची माहिती आणि पालकांची जबाबदारी

**सीए अभय सगदेव**

एका आईने आपल्या दहा वर्षांच्या मुलासाठी शैक्षणिक अ‍ॅप डाऊनलोड केले. अ‍ॅपने मुलाचे नाव, वय, शाळेचे नाव, छायाचित्र, लोकेशन अ‍ॅक्सेस आणि नोटिफिकेशन पाठविण्याची परवानगी मागितली. काही दिवसांनी त्या मुलाला गेम्स आणि व्हिडीओ यांची जाहिरात दिसू लागली. त्या आईच्या मनात प्रश्न निर्माण झाला : माझ्या मुलाची माहिती कोण वापरत आहे, कोणत्या उद्देशासाठी वापरत आहे आणि ही माहिती सुरक्षित आहे का?

हा प्रश्न आज अधिकाधिक महत्त्वाचा होत आहे. मुले ऑनलाईन लर्निंग प्लॅटफॉर्म्स, गेमिंग ॲप्स, स्कूल पोर्टल्स, हेल्थ ॲप्स, डिजिटल लायब्ररीज, ॲक्टिव्हिटी क्लासेस, स्मार्ट डिव्हाईसेस आणि सोशल मीडियासारख्या सेवांचा वापर करतात. त्यांच्या वैयक्तिक माहितीमध्ये नाव, छायाचित्र, शाळेची माहिती, लर्निंग रेकॉर्ड्स, आरोग्यविषयक माहिती, लोकेशन डिटेल्स, ॲप ॲक्टिव्हिटी आणि कधीकधी बायोमेट्रिक किंवा इतर संवेदनशील स्वरूपाची माहितीही असू शकते.

डिजिटल वैयक्तिक माहिती संरक्षण कायदा, २०२३ अर्थात डीपीडीपी ॲक्ट मुलाला डेटा प्रिंसिपलच्या विशेष गटात पाहतो. डेटा प्रिंसिपल म्हणजे ज्या व्यक्तीशी वैयक्तिक माहिती संबंधित आहे ती व्यक्ती. या कायद्यानुसार चाईल्ड म्हणजे अठरा वर्षे पूर्ण न केलेली व्यक्ती. त्यामुळे शाळा, दवाखाना, ॲप, गेमिंग प्लॅटफॉर्म किंवा ऑनलाईन स्व्हिहस मुलाची माहिती प्रक्रिया करत असेल, तर ती माहिती विशेष काळजीने हाताळली जाणे आवश्यक आहे.

कायद्याला हे मान्य आहे की मूल डिजिटल माहिती प्रक्रियेबाबत पूर्णपणे माहितीपूर्ण निर्णय घेऊ शकत नाही. म्हणूनच, मुलाची वैयक्तिक माहिती प्रक्रिया करण्यापूर्वी डेटा फिड्युशिअरीने पॅरेंट किंवा लॉ फुल गार्डियनची व्हेरिफायेबल कन्सेंट घेणे आवश्यक आहे. डेटा फिड्युशिअरी म्हणजे वैयक्तिक माहिती कोणत्या उद्देशासाठी आणि कशा प्रकारे प्रक्रिया करायची हे ठरवणारी व्यक्ती किंवा संस्था. व्हेरिफायेबल कन्सेंट म्हणजे अशी संमती जी खरोखर पॅरेंट किंवा लॉ फुल गार्डियनकडून मिळाली आहे हे दाखवता आणि पडताळता येईल.



डीपीडीपी रुल्स, २०२५ हे अधिक स्पष्ट करतात. डेटा फिड्युशिअरीने मुलाची वैयक्तिक माहिती प्रक्रिया करण्यापूर्वी पॅरेंटची व्हेरिफायेबल कन्सेंट मिळावी यासाठी योग्य टेक्निकल आणि ऑर्गनायझेशनल मेझर्स करणे आवश्यक आहे. तसेच, स्वतःला पॅरेंट म्हणून ओळखणारी व्यक्ती खरोखर प्रौढ आहे आणि गरज पडल्यास उपलब्ध अधिकृत माहिती किंवा आयडेन्टीफिकेशन डिटेल्स यांच्या आधारे पडताळता येण्याजोगी आहे, याबाबतही ड्यू डिलिजेन्स करणे आवश्यक आहे.

याचा अर्थ असा नाही की प्रत्येक पॅरेंटला अनावश्यकपणे क्लिष्ट प्रक्रियेतून जावे लागेल. परंतु याचा अर्थ असा नक्कीच आहे की डेटा फिड्युशिअरीने मुलाने केलेला एक साधा टिक मार्क हा पॅरेंटल कन्सेंट म्हणून आंधळेपणाने स्वीकारू नये. कन्सेंट प्रक्रिया स्पष्ट, व्यवहार्य आणि गरज पडल्यास सिद्ध करता येण्याजोगी असावी. मुलांची माहिती कशी वापरली जाऊ शकते यावर कायदा कठोर मर्यादा घालतो. डेटा फिड्युशिअरीने मुलाच्या कल्याणावर प्रतिकूल परिणाम होईल अशा प्रकारे मुलाची वैयक्तिक माहिती प्रक्रिया करू नये. तसेच मुलांचे ट्रॅकिंग किंवा बिहेविअरल मॉनिटरिंग करू नये आणि मुलांना उद्देशून टार्गेटेड ॲडव्हर्टायझिंग करू नये.

एक साधे उदाहरण पाहू. शाळेला शिक्षणाशी संबंधित उद्देशांसाठी मुलाचे नाव, वर्ग, पालकांचा संपर्क क्रमांक आणि शैक्षणिक नोंदी आवश्यक असू शकतात. बालरोगतज्ज्ञाला उपचारासाठी आरोग्य नोंदी आवश्यक असू शकतात. शाळेच्या प्रवासात सुरक्षिततेसाठी ट्रान्सपोर्ट स्व्हिहसला मर्यादित लोकेशन इन्फॉर्मेशन आवश्यक असू शकते. हे उद्देश समजण्याजोगे आहेत. मात्र, याच माहितीचा वापर जाहिराती, प्रोफायलिंग किंवा अनावश्यक मॉनिटरिंगसाठी करणे वेगळा आणि धोकादायक विषय ठरू शकतो.

रुल्स मुलांच्या हितासाठी काही मर्यादित प्रोसेसिंग आवश्यक असू शकते हेही मान्य करतात. उदाहरणार्थ, हेल्थकेअर एस्टॅब्लिशमेंट आणि हेल्थकेअर प्रोफेशनल्स मुलाला आरोग्यसेवा देण्यासाठी आवश्यक असलेली माहिती प्रक्रिया करू शकतात. एज्युकेशनल इस्टिटट्युशन्स आणि चाईल्ड केअर सेंटर्स मुलाच्या सेफ्टी, अटेंडन्स, एज्युकेशन किंवा रिलेटेड ॲक्टिव्हिटीसाठी आवश्यक असलेली माहिती प्रक्रिया करू शकतात. बालकाच्या संरक्षण, वेलफेअर किंवा सेफ्टीशी संबंधित काही परिस्थितींमध्येही माहिती प्रक्रिया आवश्यक ठरू शकते.

अशा प्रकरणांमध्ये कन्सेंट आवश्यक नसू शकते; परंतु तरीही नोटीस आणि डेटा प्रोटेक्शनसंबंधी इतर सेफगार्ड्स राखणे आवश्यक असते. म्हणून पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. कन्सेंट देण्यापूर्वी त्यांनी विचारले पाहिजे : कोणती माहिती गोळा केली जात आहे? ती का आवश्यक आहे? ती कोणासोबत शेअर केली जाणार आहे का? मुलाचे ट्रॅकिंग होणार आहे का? मुलाला जाहिराती दाखवल्या जाणार आहेत का? कन्सेंट कशी मागे घेता येईल? मुलाची माहिती दुरुस्त किंवा हटविण्यासाठी काय प्रक्रिया आहे?

शाळा, दवाखाने, ॲप डेव्हलपर्स आणि सर्व्हिस प्रोव्हायडर्स यांनीही हे लक्षात ठेवले पाहिजे की पॅरेंटची कन्सेंट म्हणजे मुलाच्या माहितीचा अमर्यादित वापर करण्याचा परवाना नाही. उद्देश विशिष्ट असावा, गोळा केलेली माहिती आवश्यक मर्यादेत असावी आणि मुलाची सुरक्षा व कल्याण हा केंद्रबिंदू राहिला पाहिजे. मुलांच्या माहितीचे संरक्षण ही केवळ कायदेशीर बाब नाही. ती विश्वासाची बाब आहे. मुलाच्या नावाने तयार होणाऱ्या डिजिटल फूटप्रिंटचे सर्व परिणाम मूल स्वतः समजू शकत नाही. त्यामुळे ॲडल्ट्स- पॅरेंट्स, स्कूल्स, डॉक्टर्स, प्लॅटफॉर्म्स आणि रेग्युलेटर्स यांनी अधिक जबाबदारीने वागले पाहिजे. मुलांच्या माहितीचे संरक्षण करणे म्हणजे त्यांच्या भविष्याचे संरक्षण करण्याचा एक भाग आहे.

दैनंदिन जीवनातील डीपीडीपी : शाळा पालकांना मुलाचे छायाचित्र, जन्म प्रमाणपत्र आणि वैद्यकीय माहिती ऑनलाईन पोर्टलवर अपलोड करण्यास सांगते. प्रवेश, सुरक्षा आणि प्रशासनासाठी यातील काही माहिती आवश्यक असू शकते. तरीही पालकांना प्रत्येक माहिती का आवश्यक आहे, ती कोण पाहू शकते, ती किती काळ जतन केली जाईल आणि तिचे संरक्षण कसे केले जाईल हे समजले पाहिजे. ■

९०९६३३२३५३

(लेखक कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार आहेत.)

## वेध

**रेवती जोशी-अंधारे**

# पारबती... पारबती!

जेन-झी सोबत संवाद साधण्यासाठी सध्या विविध क्लृप्त्या लढविल्या जात आहेत. या संवादासोबतच त्यांच्यावर चांगले संस्कार व्हावेत आणि एक जबाबदार पिढी घडावी, यासाठीही विचारमंथन सुरू आहे. या सगळ्या घडामोडींमध्ये भारतीय चित्रपटसृष्टीतही बरीच धामधूम सुरू आहे. कमी बजेटचे पण जास्त कमाई करणारे, देशप्रेमाने भारलेले, अध्यात्माला मोठ्या पडद्यावर आणणारे चित्रपट जेन-झीच्या प्रेक्षकांना मल्टिप्लेक्सेसकडे खेचत आहेत. 'हनुमान अंश' नावाच्या लो बजेट चित्रपटाने कमाईचे नवीन विक्रम स्थापित केले आहेत. पण, त्यातील एका गाण्याला युवा पिढीने उचलून धरलंय. अवघ्या दोन आठवड्यांत या गाण्याला ५ मिलियन लोकांनी पाहिलं-ऐकलं. त्यापेक्षा जास्त लोकांनी हे गाणं डाऊनलोड केलं. लोकप्रियतेचे नवे उच्चांक गाठत असलेल्या या गाण्याचा वेध घेऊया!

ही पिढी पाश्चात्त्यांचे अंधानुकरण करणारी नाही. प्रत्येक गोष्ट स्वतःच्या कसोटीवर तपासून बघणार्‍या या पिढीला सगळं ऑथेंटिक, स्थेटिक आवडतं. मग ते सिनेमे असतील, कपडे किंवा संगीत! लोकगीतं, एतद्देशीय वाद्यं, थेट बोलीभाषांमधील गाणी त्यांना लगेच अपील करतात. याचाच परिपाक म्हणजे पारबती...पारबती हे गाणं! सध्या श्रावण महिना सुरू आहे आणि महादेव-पार्वती यांच्या विविध रूपांचे गुणगानही! बुंदेलखंडी हिंदीतील हे एक भजन आहे. मंत्रमुग्ध करणारी खास लोकगीताची लय, सोपे शब्द आणि एखाद्या गावात संध्याकाळी मंदिरातील आरतीत वाजणारी वाद्यं ही या गाण्याची विशेषता म्हणावी लागेल. साधू तिवारीने लिहिलेल्या, गायिलेल्या आणि संगीतबद्ध केलेल्या या गीत-भजनाने लोकांच्या विशेषतः नव्या पिढीच्या प्लेलिस्टमध्ये जागा पटकावली आहे.

'हनुमान अंश' हा चित्रपट निम करौली बाबांच्या जीवनावर आधारित असून, त्यातील विवाहप्रसंगी हे गीत-भजन आहे. महादेवाला वरण्यासाठी उपवास करून, घोर तपस्या करणार्‍या पार्वतीची गोष्ट या गाण्यात आहे. तिचे तप आणि हट्ट बघून सप्तर्षी मिळून तिला समजावतात. महादेवाशी विवाहाचा हट्ट सोडून दे, तप-उपवास सोडून दे असे विनवतात. तिला महादेवाशी विवाह न करण्यासाठी अनेक तर्क देतात, असे सगळे वर्णन या गाण्यात आहे. 'काहे जिद कर रही, काहे को मर रही...' असे म्हणून सप्तर्षी पार्वतीला महादेवाला वरण्यापासून परावृत्त करतात. बुंदेलखंड म्हणजे मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेशातील काही भाग! बुंदेली हिंदीवर दोन्ही प्रांतांतील बोलींचा प्रभाव असल्यामुळे वेगळाच गोडवा असलेली ही भाषा आहे. बुंदेली विवाहगीतं हा एक समृद्ध मौखिक वारसा आहे. समारंभांमध्ये बहार आणणार्‍या या गाण्यांमध्ये दैनंदिन जीवनातील खेळकरपणा आणि थट्टामस्करीचा छान मिलाफ असतो. बुंदेली विवाहगीतांचा पायाच शिव-पार्वती असून या गीतांमध्ये त्यांना मंदिराच्या गाभार्‍यातून थेट घराच्या अंगणात आणले जाते. महादेव म्हणजे अवलिया, अंगाला भस्मलेप, नंदीवर बसून आणि विचित्र वरात घेऊन आलेला वर बघून, विवाहाचा पुनर्विचार कर, अशी पार्वतीची म्हणजे वधूची थट्टा केली जाते.

बुंदेली विवाहगीतांचे दादरे-सोहरे (सुखी वैवाहिक जीवनाचा आशीर्वाद देणारी) बन्ना-बन्नी (वर-वधू पक्षाची खिल्ली उडविणारी) आणि गारी असे प्रकार आहेत. यापैकी गारी गीतांमध्ये, सामाजिक नियमांना छेद देऊन हलकीफुलकी बंडखोरी केली जाते. पारबती... हे या प्रकारात मोडणारे गीत-भजन आहे. या गाण्यांची शब्दरचना जशी सोपी तशीच त्यांच्यासोबत वाजणारी वाद्यंही सुटसुटीत! डफली, खंजेरी, नगडीया ही तालवाद्ये आणि चिकारा-एकतार्‍यासारखी तंतुवाद्ये या गीतांना खणखणीत नादमय बनवितात. एकूणच सामाजिक स्थिती बघता, सामान्य कुटुंबातील मुलींचे विवाह हा चिंतेचा विषय! त्यात, सोहळा पार पडण्याची काळजी वगैरे दूर करून काही क्षण गमतीत रमविणारी ही बुंदेली विवाहगीतं! साधू तिवारीने या गीतांचा, वाद्यांचा अचूक वापर करून 'पारबती...पारबती'ला जेन- झीच्या स्मार्टफोनमध्ये उतरवलं आहे. हे गीत-भजन अगदी ग्रामीण वातावरणात चित्रित केल्याचं जाणवतं. वाद्यांचा गोंगाट नाही तसे भडक अंगविक्षेपही नाहीत. पण, गीताचे बोल आणि वाद्यांचा ठेका मात्र मोहक! इतका की हे गीत-भजन लूपमध्ये टाकून ऐकावं. आपण आपली संस्कृती, भाषा, संगीत-वाद्यांची अशी नव्याने ओळख झाली तर जेन-झी सोबतच पुढच्या अल्फा आणि बीटा पिढ्यांनाही हा समृद्ध वारसा आपोआप मिळेल. सुदींग म्युझिकच्या नावाखाली एआय निर्मित संगीत ऐकण्यापेक्षा लोकगीतांची भुरळ नव्या पिढ्यांना पडावी. भजन क्लबिंगच्या ट्रेंडने याची सुरुवात झाली आहेच. 'आपलं तेच सोनं' हा विश्वास युवा पिढीत निर्माण झाला की, मैदान फत्ते! ■

९२२३७००२७७

## वाचक पत्रे

### या धर्मद्रोह्यांना थांबवा!

आजपर्यंतच्या इतिहासात कुठल्याही पिढीने इतका बेजबाबदार विरोधी पक्षनेता पाहिला नसेल. भारताच्या राजकारणात आपले महत्त्वाचे स्थान असताना अर्धवट ज्ञानाने वक्तव्य करणे याला काय म्हणायचे? या धर्मद्रोह्याने मनुस्मृतीमधील दोन ओळी उचलायच्या आणि त्यावर टीकाटिप्पणी करायची, त्याद्वारे लोकांना भ्रमित करायचे, त्यांचा बुद्धिभेद करण्याचा प्रयत्न करायचा. हिंदू धर्मामध्ये इतक्या चांगल्या चालीरीती, प्रथा, परंपरा असताना सोबतच त्याचासुद्धा उल्लेख करावा असे त्यांना वाटले नाही. इतर धर्मांच्या चुकीच्या चालीरीती बाबतीत अ‍ॅ बोलण्याची हिंमत आपल्यात आहे का की तिथे आपण मूग गिळून बसता? हिंदू धर्मामध्ये म्हटले आहे जिथे नारीची पूजा होते तिथे देवतेचा वास असतो. भारतात दोन्ही नवरात्रांमध्ये मुलींची पूजा करतात हे माहिती नसणारे अज्ञानी असे वक्तव्य करू शकतात. निवडणुकीच्या काळात हिंदू म्हणून मिरवणारे आणि इतर वेळेस अहिंदू असणाऱ्या व्यक्तीला कसे कळेल? इतर धर्मीयांच्या तीन तलाक, हलाला याच्याविषयी आपण बोलून दाखवावे. वक्तव्य करताना त्या त्या धर्माचा सखोल अभ्यास करावा, एवढेही न कळणारे राजकारणी भारताची जागतिक प्रतिमा डागाळत आहेत. माझी विरोधी पक्षनेत्यांना विनंती आहे की आपला नेता हा त्या पदाकरिता योग्य असायला हवा. परिवारवादाचा पुतळा नको.

**डॉ. भारती अनिल हेडाऊ**/यवतमाळ

■■

### सोशल मीडिया आणि विद्यार्थी...

आजच्या आधुनिक युगात सोशल मीडिया हा विद्यार्थ्यांच्या जीवनाचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे. फेसबुक, इन्स्टाग्राम, युट्युब, व्हॉट्सॲप यासारख्या माध्यमांमुळे माहिती मिळवणे आणि इतरांशी संवाद साधणे सोपे झाले आहे. मात्र, सोशल मीडियाचा योग्य वापर केला तर तो उपयुक्त ठरतो, तर अति वापरामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर आणि वेळेच्या नियोजनावर परिणाम होऊ शकतो. पूर्वी विद्यार्थ्यांना माहिती मिळवण्यासाठी पुस्तके, वर्तमानपत्रे, ग्रंथालये आणि शिक्षक यांच्यावर अवलंबून राहावे लागत असे. आज समाजमाध्यमांमुळे जगभरातील माहिती काही क्षणांत उपलब्ध होते. विविध शैक्षणिक व्हिडीओ, अभ्याससाहित्य, ऑनलाईन व्याख्याने आणि ज्ञानवर्धक कार्यक्रम यांमुळे विद्यार्थ्यांना शिकण्याच्या अनेक नवीन संधी प्राप्त झाल्या आहेत.

सोशल मीडियाचे विद्यार्थ्यांसाठी अनेक फायदे आहेत. त्याद्वारे नवीन विषयांची माहिती मिळते, शैक्षणिक व्हिडीओ पाहता येतात आणि मित्र-शिक्षकांशी अभ्यासासंबंधी संवाद साधता येतो. परंतु सोशल मीडियाचा अतिरेक टाळणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी समाजमाध्यमांचा उपयोग ज्ञान, शिक्षण आणि व्यक्तिमत्त्वविकासासाठी करावा. हे विद्यार्थ्यांसाठी ज्ञानाचे आणि संवादाचे प्रभावी माध्यम आहे. त्याचा योग्य वापर केल्यास शिक्षण अधिक मनोरंजक आणि सोपे होऊ शकते. मात्र, त्याचा अति वापर टाळून अभ्यासाला आणि दैनंदिन जीवनाला योग्य प्राधान्य देणे गरजेचे आहे. सोशल मीडिया चांगला किंवा वाईट नसून त्याचा वापर आपण कसा करतो हे महत्त्वाचे आहे.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

■■

### लोकमान्य टिळकांना अभिप्रेत गणेशोत्सव साजरा व्हावा

लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांना अभिप्रेत असलेला गणेशोत्सव हा केवळ धार्मिक कर्मकांड किंवा मनोरंजन म्हणून नाही तर समाज प्रबोधन, देशभक्ती आणि सामाजिक ऐक्याचा एक प्रभावी उत्सव होता, मंच होता. ब्रिटिश सरकारच्या काळात भारतीय एकत्र येऊ नयेत म्हणून राजकीय सभांवर बंदी होती. अशावेळी लोकांना एकत्र आणून त्यांच्यात राष्ट्रप्रेम व राजकीय जाणिवा जागृत करण्याचे साधन सार्वजनिक गणेशोत्सवाची मुहूर्तमेढ रोवली.

या गणेशोत्सवाच्या माध्यमातून सर्व घटकांना सामावून घेत सामाजिक एकात्मतेचा संदेश तसेच केवळ पूजाअर्चा न करता देशभक्तिपर गीते, पोवाडे, व्याख्याने आणि राष्ट्रीय विषयांवर चर्चा आयोजित केल्या जात असत, तसेच तरुणांमध्ये स्वाभिमान व स्वातंत्र्याची प्रेरणा निर्माणचे कार्य उत्सावातून होत असे आणि गणेशोत्सवात धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक शिस्त पाळली जात होती. परंतु आजच्या गणेशोत्सवात मनोरंजनासोबत देखावा, जाहिराती, समाजकारण फक्त नावापुरते मर्यादित राहून व्यावसायिक बाबी वाढल्या आहेत. हे सर्व थांबविण्याकरिता पर्यावरणपूरक मूर्तीचा वापर, कर्णकर्कश आवाजावर नियंत्रण, वेळेचे भान, मर्यादा आणि समाजप्रबोधनाचे कार्यक्रम, सामाजिक उपक्रम यासारख्या सकारात्मक बदल आजच्या पिढीने घडवून आणल्यास आणि भक्ती, श्रद्धा, राष्ट्रप्रेम, समानता, बंधुत्व, समाजानुकूल कार्य, उपक्रमांसोबत पर्यावरणपूरक कार्यक्रम असलेला गणेशोत्सव बघायला मिळाला तरच लोकमान्यांना अभिप्रेत गणेशोत्सवाचे पावित्र्य टिकून राहील. ■

**संजय श्रौती**/९८६०४५१८४०

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९४२२६१२२४५/८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**

● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# पानगल व नॅशनल उर्दू प्राथमिक शाळेस आदर्श शाळा पुरस्कार जाहीर

## अ.भा.उर्दू साहित्य संमेलन समितीचे उत्कृष्ठ मुख्याध्यापक, शिक्षक व आदर्श शाळा पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ सप्टेंबर-**
अ.भा. उर्दू साहित्य संमेलन समितीचे आदर्श शाळा पुरस्कार एम.ए.पानगल ऍंग्लो उर्दू हायस्कुल व नॅशनल उर्दू प्राथमिक शाळा यांना जाहीर करण्यात आले आहेत.

समितीच्या वतीने शिक्षक दिनानिमित्त उल्लेखनिय कार्य केलेल्या शहर व जिल्ह्यातील उर्दू प्राथमिक व माध्यमिक शाळेतील कार्यरत शिक्षक तसेच मुख्याध्यापकांचा उत्कृष्ठ मुख्याध्यापक व शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. याचे वितरण शनिवार ५ सप्टेंबर रोजी सायं. ७.00 वाजता कॉ.बेरीया शैक्षणिक संकुल नवीन हॉल लष्कर येथे होईल. माजी आमदार दिलीप माने, सोलापूर महानगपालिकेचे प्रशासनाधिकारी मल्हारी माने यांच्या हस्ते त्यांना गौरविण्यात येणार आहे. स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र, भेटवस्तु, शाल व श्रीफल असे या पुरस्काराचे स्वारुप आहे. यंदाच्या वर्षी प्राथमिक व माध्यमिक शाळेतील ८ शिक्षक, प्राथमिक व माध्यमिक शाळेतील ४ मुख्याध्यापक, उच्च माध्यमिक विभागातील १ व क्रीडा 1 विभागातील १ अश्या १४ गुरुजनांचा समावेश आहे.

**पुरस्कार प्राप्त असे :**
**मुख्याध्यापक :** शाहीदाबेगम जावेदअहमद लालकोट (ख्वाजा बंदानवाज उर्दू हायस्कुल), तबस्सुम बानो सलीम सय्यद (म.न.पा. कुर्बान हुसेन मुलांची शाळा), सॉलेहा फजल खान(एस.एस.ए. उर्दू प्रा. शाळा, विडी घरकुल), शहनाज म.शफीक करजगीकर जि.प. उर्दू शाळा विडी घरकुल).

**शिक्षक :** सादेका आईने हयात बारागझी (दि प्रोग्रेसिव्ह उर्दू हायस्कुल), रिजवानअहमद अ.जलील शेख (एस. एस.ए. उर्दू हाय.ऍंड ज्यु. कॉलेज), तलत तेहसीन नबीलाल मुजावर (म.न.पा. मुलांची केंद्र शाळा), अजीम अन्वरसाब शेख म.न.पा. मुलांची शाळा गरीबी हटाव), नुजहत परवीन अबुलकलाम शेख बीबी हयात उर्दू प्रा.शाळा). अशरफ लायकअली पटेल चाँदतारा उर्दू प्रायमरी शाळा, रईसा महेमुद अमलीचंगे(जि.प. उर्दू प्रा.शाळा, शिरुर, अक्कलकोट). म.सबील म.उस्मान नाईक (जि.प. प्राथमिक शाळा विडी घरकुल), जैनोद्दीन अब्बासअली पटेल (सोशल आर्टस ऍंड कॉमर्स कॉलेज), वसीमबारी अ.गनी शेख (सोशल उर्द हायस्कुल बिडी घरकुल, क्रीडा शिक्षक).

# लोकमंगल शिक्षकरत्न पुरस्कार वितरण सोहळा रविवारी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ सप्टेंबर-**
लोकमंगल फाऊंडेशन व लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर यांच्या वतीने देण्यात येणाऱ्या लोकमंगल शिक्षकरत्न पुरस्कार-२०२६ची घोषणा करण्यात आली आहे. विविध शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ९ शिक्षकांसह जिल्हा परिषदेच्या दोन आदर्श शाळांचा रविवारी दि. ६ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या किर्लोस्कर सभागृहात सन्मान करण्यात येणार आहे, अशी माहिती पुरस्कार योजनेचे प्रमुख डॉ. ह. ना. जगताप यांनी पत्रकार परिषदेत दिली.

नामवंत लेखक व विचारवंत राजन गवस यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण होणार असून, लोकमंगलचे प्रणेते आमदार सुभाष देशमुख कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहणार आहेत. प्राथमिक गटातून हणमंत बनसोडे व डॉ. गौरीशंकर खोबरे, माध्यमिक गटातून श्रुती बागेवाडी व संजय भस्मे, कनिष्ठ महाविद्यालय गटातून प्रसन्न नाझरे व डॉ. गणेश मुडेगावकर, तर वरिष्ठ महाविद्यालय गटातून डॉ. श्रीनिवास मेतन व प्रा.बाळकृष्ण लोखंडे यांचा गौरव होणार आहे.

आदर्श जि.प. शाळा म्हणून शेळकेवाडी-शिवणे व कारकल येथील शाळांचा सन्मान करण्यात येईल. तसेच 'झिंक जेल बॅटरी' उद्योगातून सोलापूरचे नाव जागतिक स्तरावर नेणाऱ्या तेजस कुसूरकर यांना प्रेरणा देणारे ज्ञानप्रबोधिनीचे ज्येष्ठ शिक्षक कौस्तुभ गोडबोले यांना 'डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम पुरस्कार' देण्यात येणार आहे. आतापर्यंत एकूण १९0 शिक्षकांचा सन्मान करण्यात आला असून एकूण १४ शाळांना गौरविण्यात आले आहेत. पाच हजार रुपयांची पुस्तके, सन्मान चिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. यावेळी डॉ.आशालता जगताप, अरविंद जोशी, निर्मला कुंभार, मारुती तोडकर, दिपाली कोठारी उपस्थित होते.



# पार्क चौपाटी परिसरातील अनधिकृत विक्रेत्यांवर आजपासून कारवाई

**सोलापूर, दि.३ सप्टेंबर-**
शहरातील पार्क चौपाटी परिसरातील वाढलेल्या अनधिकृत विक्रेत्यांवर शुक्रवारपासून सोलापूर महानगरपालिका कारवाई करणार आहे. पार्क स्टेडियमसमोरील परिसरात घोडे-उंट सफारी, टॅटू डिझाईन तसेच विविध प्रकारच्या हातगाड्यांद्वारे अनधिकृत व्यवसाय केला जात असल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे, अशी माहिती अतिरिक्त आयुक्त तथा भूमी व मालमत्ता विभागाच्या नियंत्रण अधिकारी वीणा पवार यांनी दिली.

पार्क चौपाटी परिसरात केवळ १७ मूळ गाडीधारकांना सोडून इतरांवर कारवाई करण्यात येणार आहे. अनेक अनधिकृत विक्रेत्यांनी परिसरात व्यवसाय सुरू केला आहे. काहींनी पत्रकार कक्षासमोरील जागेवरही अतिक्रमण केल्याचे निदर्शनास आले आहे.महापालिकेने गुरुवारी सायंकाळी संबंधित विक्रेत्यांना कडक सूचना देऊन या ठिकाणी कोणतीही गाडी, हातगाडा अथवा विक्रीचे साहित्य न लावण्याचे आदेश दिले. यापुढे अनधिकृत विक्रेते आढळल्यास त्यांच्यावर कारवाई करून साहित्य जप्त करण्यात येणार आहे.

हा परिसर 'नो पार्किंग झोन' असल्याने नागरिकांनीही येथे वाहने उभी करू नयेत, असे आवाहन करण्यात आले आहे. वाहन पार्किंगची व्यवस्था पत्रकार भवनासमोरील बाजूस करण्यात आली असल्याचे पवार यांनी सांगितले. नागरिकांनी वाहतूक व्यवस्थेला सहकार्य करावे आणि अनधिकृत विक्रेत्यांनी परिसरात व्यवसाय करू नये, अन्यथा कठोर कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशाराही त्यांनी दिला.

# सारथी स्पोकन इंग्लिशची पुरोहितांसाठी इंग्लिश स्पीकिंगची विशेष बॅच सुरू

**सोलापूर, दि. ३ सप्टेंबर-**
पूजा-विधी, विवाहसोहळे, गृहप्रवेश, उपनयन, सत्यनारायण पूजा तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांमध्ये संस्कार, परंपरा आणि विधी यांचे प्रभावीपणे इंग्लिशमधून वर्णन करता यावे, यासाठी सारथी स्पोकन इंग्लिश, सोलापूर यांच्या वतीने पुरोहितांसाठी विशेष इंग्लिश फॉर प्रीस्टस स्पोकन इंग्लिश प्रशिक्षण बॅच नुकतीच सुरू करण्यात आली आहे. अधिक माहितीसाठी सारथी स्पोकन इंग्लिश, कन्ना चौक, सोलापूर (मो. ९८९०९२५९९६) येथे संपर्क साधावा.


## दाखला हरविले / गहाळ झालेबाबतची जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः जिल्हा सोलापूर, शहर बार्शी व आसपासचे लोकांना आमचे अशिल यांच्यातर्फे त्यांनी माहिती दिलेवरून व या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल महमदइकबाल महमदहनिफ पटेल, रा. अलिपूर रोड, बार्शी यांचे इयत्ता १२वी चे बि.पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शीचे शाळा सोडल्याचा दाखला (एल.सी./टी.सी.) हा दि. ३१/0८/२०२६ रोजी दुपारी १:३0 चे सुमारास पांडे चौक, बार्शी परिसरात प्रवासादरम्यान कोठेतरी पडून गहाळ / हरविलेला आहे. तो दाखला कोणास मिळाल्यास वर नमुद पत्त्यावर आणून द्यावे आणि सदर दस्ताचा कोणीही कसलाही गैरवापर करू नये म्हणून सदरची जाहीर नोटीस दिली आहे, याची सर्वांनी नोंद घ्यावी ही जाहीर नोटीस दिली ता. 0३/0९/२०२६

सही/-
**ॲड. सरफराज मुस्ताक मुजावर**
बी.ए. एलएल.बी.
बनाळे बिल्डींग, आशा टॉकिजसमोर,
ता बार्शी, जि. सोलापूर
मो.नं. ९८८१०८७८६७

## सिलिंग जमीन भोगवटदार वर्ग-२ वरुन भोगवटदार वर्ग-१ करिता जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, अक्कलकोट (ग्रामीण), ता. अक्कलकोट, जि. सोलापूर येथील गट नं.५/५ यांसी क्षेत्र 0 हेक्टर ८६ आर आकार ३ रुपये ३५ पैसे यांसी चतुःसिमा :- पुर्वेस - गट नं.५ पैकी उर्वरीत शेतजमीन, पश्चिमेस - हसापूर रस्ता, दक्षिणेस - गट नं. ५/४, उत्तरेस - गट नं.५/६ येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत ही ममता सिद्राम शिंदे व इतर यांच्या मालकीची असून, सदरची शेतजमीन भोगवटदार वर्ग-२ ची असल्याने, सदर जमीनीची भोगवटदार वर्ग-१ कडून मिळणेकरिता आमच्या अशिलांनी मा. अप्पर जिल्हाधिकारी सोलापूर (कुळ कायदा शाखा) या कार्यालयास अर्ज सादर केलेला आहे.

तरी उक्त नमुद शेतजमीनीबाबत व त्यामध्ये झालेल्या व्यवहाराबाबत किंवा इतर कुठल्याही प्रकारचे व्यवहारांबाबत किंवा उक्त जमीनीबाबत कोणताही करार, लिज, भाडेपट्टा, पोटगी हक्क, वारसा हक्क, बोजा, गहाण, दान, कोर्ट केसेस, मृत्यूपत्र, खरेदी-विक्री, साठेखत, सावकारी देणे-घेणे इत्यादीबाबत हक्क, हितसंबंध अधिकार, तक्रार, हरकत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून 0७ (सात) दिवसांच्या आत मा. अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर (कुळ कायदा) शाखा सात रस्ता, सोलापूर या पत्यावर आपल्या हरकती नोंदवावी. सदर कालावधीत कोणाचेही हरकत प्राप्त न झाल्यास कोणाचेही हरकत नाही असे समजून उक्त शेतजमीनीचा भोगवटदार वर्ग-२ वरुन भोगवटदार वर्ग-१ करणेकामी पुढील कार्यवाही करणेत येईल, याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली तारीख 0३/0९/२०२६

सही/-
**व्ही.बी. पाटील**
ॲडव्होकेट ॲन्ड नोटरी भारत सरकार
रा. उत्कर्ष नगर, अक्कलकोट, जि. सोलापूर
मो.नं.:- ७५८८0४७५६२

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि. अर्ज नं. १३/२०२६
नि.५

### बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन सो. यांचे कोर्टात

१) **रोहिणी संताजी कोळी,**
वय - ४३ वर्षे, धंदा - घरकाम,
रा. दत्त मंदीरजवळ, टोणगे गल्ली, कोरफळे, ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **अनिकेत संताजी कोळी,**
वय - २४ वर्षे, धंदा - शिक्षण, रा. सदर
३) **प्राची संताजी कोळी,**
वय - २२ वर्षे, धंदा - शिक्षण, रा. सदर
— अर्जदार

विरूध्द
**कोणी नाही** - सा.वाला

ज्याअर्थी, यातील अर्जदार नं. १ चे पती व २ व ३ यांचे वडिल संताजी भालचंद्र कोळी हे दि. २६/१०/२०२५ रोजी बार्शी येथे मयत झालेले आहे. मयत संताजी भालचंद्र कोळी यांचे पश्चात यातील अर्जदार नं. १ ते ३ हेच जवळचे व कायदेशीर वारस आहेत. यातील अर्जदारांशिवाय मयत संताजी भालचंद्र कोळी यांना अन्य कोणीही जवळचे वारस नव्हते व नाहीत. मयत संताजी भालचंद्र कोळी हे विजयसिंह पाटील माध्यमिक विद्यालय, चिंचपूर (बु), ता. परंडा, जि. उस्मानाबाद येथे सहशिक्षक म्हणून नोकरीस होते. नोकरीत असताना ते दि. २६/१०/२०२५ रोजी मयत झालेले आहेत. त्यामुळे त्यांना त्यांच्या नोकरीत मिळणारे भविष्यामध्ये ग्रॅच्युटी, फंड, मृत्यु उपदान रक्कम तसेच मयत संताजी यांच्या मृत्युनंतर त्यांची पत्नी अर्जदार नं. १ रोहिणी कोळी यांना मिळणारी दरमहा पेन्शनची रक्कम हे सर्व लाभ मिळणेसाठी अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र (Succession Certificate) मिळणेसाठी सदरचा अर्ज केला आहे.

त्याअर्थी, सदर अर्जदार यांचे व्यतिरीक्त मयत संताजी भालचंद्र कोळी यांचे पश्चात इतर कोणाचा वारसा हक्क हितसंबंध असलेस त्यांनी सदर जाहीर प्रसिध्दीकरणापासून ३0 दिवसांचे आत किंवा नेमली ता. १३/१0/२०२६ रोजी सदरकामी हजर राहून आपले म्हणणे वा हरकत लेखी स्वरूपात पुराव्यानिशी दाखल करावी. मुदतीत कोणाची हरकत वा म्हणणे आले नाही. तर कोणाचे काही म्हणणे नाही असे समजून यातील अर्जदारांना अर्जाप्रमाणे वारस दाखला देणेत येईल.

कळावे हे प्रसिध्दीकरण मे. कोर्टाचे सही शिक्क्यानिशी दिले असे. ता. 0३/0९/२०२६

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहाय्यक अधिक्षक
मा. दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, बार्शी

## खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन : डि।। व सब डि।। सोलापूर पैकी, तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर शहर महानगरपालिका हद्दवाढ भागातील मौजे मजरेवाडी येथील जुना सर्व्हे नंबर ३0१/१/२ यासी नवीन सर्व्हे नं. १५८/१/२ पैकी भिमा नगर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नगरामधील प्लॉट नं. ४१ पैकी दक्षिण बाजूकडील जागा याचे क्षेत्र १८५.८७ चौ.मी. अथवा २000 चौ.फु. व उताऱ्याप्रमाणे १.८५.८७ आर चौ.मी. इतक्या क्षेत्राची खुली प्लॉट जागा याची चतुःसिमा :- पुर्वेस - प्लॉट नं. ४२, पश्चिमेस - रस्ता, दक्षिणेस - श्री मारुती मदिर व ओपन स्पेस, उत्तरेस - सदर प्लॉट नं. ४१ पैकी अमृतराज सिद्राम हताळे यांची जागा आहे.

सदर वर नमूद खुली प्लॉट जागा ही श्रीकांत विष्णू रापोल रा. सी/२६१८ विणकर सोसायटी, सोलापूर यांच्या मालकीची असून त्यांनी सदरहू खुली प्लॉट जागा ही आमचे अशिलास कायम खुषखरेदीने देण्याचे मान्य व कबूल करुन आमच्या अशिलाच्या नावे इसारापावती लिहून दिली आहे. सदर वर नमूद खुली प्लॉट जागा ही निर्वेध व निजोखमी असल्याबाबत तसेच सदरहू खुली प्लॉट जागा ह्या साठेखत गहाणखत, बक्षीसपत्र, बँक बोजा, जप्ती व इतर कोणत्याही प्रकारे गुंतविलेल्या नसल्याचे व सदरहू खुल्या प्लॉट जागेवर कोणाचेही हक्क व अधिकार नसल्याचे खात्री त्यांनी आमचे अशिलास दिलेली आहे. सबब सदरहू खुली प्लॉट जागेमध्ये कोणाचेही हक्क व अधिकार असलयास वा सदर व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी खालील नमुद पत्त्यावर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून दहा दिवसांच्या आत कागदोपत्रानिशी लेखी स्वरुपात हरकत अगर तक्रार नोंदवावी, अन्यथा आमचे अशिल हे तद्नंतर कोणाचीही हरकत अगर तक्रार नसल्याचे गृहीत धरुन व्यवहार पुर्ण करतील, सबब त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत अगर तक्रार आमचे अशिलावर अथवा प्लॉट जागेवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

ही नोटीस दिली तारीख 0३/0९/२०२६

सही/-
**ॲड. आर.एच. परदेशी**
एम.कॉम., एलएल.बी.(स्पे.)
ऑफिस : २सी, बुधवार पेठ, कस्तुरबा मार्केट,
सोलापूर, मो. ९८२२८0७८७९

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि. अर्ज नं. २५/२६
नि.६

### बार्शी येथील मे.सि.ज.ज्यु.डि. साहेब यांचे कोर्टात
(मा. चव्हाण सो. कोर्ट)

१) **श्री. शरद विठ्ठल उकिरडे**
वय - ५७ वर्षे, धंदा - शेती,
रा. आगळगांव, ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **श्री. सुनिल विठ्ठल उकिरडे**
वय - ५४ वर्षे, धंदा - शेती व नोकरी, रा. सदर
३) **सौ मनिषा नेताजी जगताप**
वय - ६२ वर्षे, धंदा- घरकाम, रा. सदर
४) **श्रीमती मालनबाई विठ्ठल उकिरडे**
वय - ७९ वर्षे धंदा - काही नाही, रा. सदर
— अर्जदार

विरुध्द
**कोणी नाही - सामनेवाला**

ज्याअर्थी, यातील अर्जदार नं. १ ते ३ यांचे वडिल व अर्जदार नं. ४ यांचे पती विठ्ठल दगडू उकिरडे हे ता. १५/0७/२०२६ रोजी सुविधा आय.सी.यु. ॲन्ड कॅथ लॅब सेंटर बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर येथे मयत झालेले आहेत. अर्जदार नं. १ ते ३ यांचे वडिल व अर्जदार नं. ४ यांचे पती विठ्ठल दगडू उकिरडे यांचे सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, शाखा - आगळगांव, ता. बार्शी तसेच सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, शाखा - आगळगांव, ता. बार्शी जि. सोलापूर या बँकेमधील रक्कम जमा आहे. तसेच आय.डी.बी.आय. बँक, शाखा आगळगांव, ता. बार्शी जि. सोलापूर या बँकेमध्ये रक्कम जमा आहे.

तरी सदर वर नमुद संपुर्ण रक्कम मिळणेकरिता अर्जदार नं. १ ते ४ हेच मयत विठ्ठल दगडू उकिरडे यांचे कायदेशीर वारस असल्याने सदर रक्कम वारस या नात्याने त्यांना मिळणेसाठी अर्जदार नं. १ ते ४ यांनी या मे. कोर्टात सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी, वर नमुद अर्जदार नं. १ ते ४ यांचे शिवाय मयत विठ्ठल दगडू उकिरडे यांना इतर कोणी वारस असल्यास अगर कोणाचा कसल्याही प्रकारे वारस हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ३0 दिवसांचे आत अगर नेमलेली तारीख २७/१0/२०२६ रोजी या कामी मे. कोर्टात सकाळी ११.00 वा हजर राहुन कागदपत्रानिशी आपले म्हणणे अगर हरकत द्यावी मुदतीत कोणाचेही काही म्हणणे /हरकत न आल्यास सदरील अर्जदार नं. १ ते ४ यांचे मागणी प्रमाणे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. कळावे.

हे जाहीर प्रसिध्दीकरण दिले ता. ३१/0८/२०२६

सही/- क. लिपिक | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा. अधिक्षक

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे बार्शी शहर, बार्शी तालुका व पंचक्रोशीतील तसेच आसपासचे लोकांना आमचे अशिलाने दिलेल्या माहितीवरुन, दाखविलेल्या कागदपत्रावरुन व सदरची जाहीर नोटीस देणेस सांगितलेवरुन त्यांचे तर्फे या खरेदीपूर्व जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी बार्शी म्यु.पल हद्दीतील प्लॉट जागा गट नं. ८६४/३/पे/१/१५ बिनशेती प्लॉट नं. १/१५ याचे क्षेत्रफळ १0७.४२0 चौ.मी. याचे चौ. फुट ११५५.८३ आहे. याचे मोजमाप पुर्व बाजू मी. ९.५४, दक्षिण बाजू मी. ११.२५, पश्चिम बाजू मी. ९.५६ व उत्तर बाजू मी. ११.२५ यामध्ये आरसीसी स्वरुपाचे स्वरुपाचे तळमजला व पहिला मजला मिळून वरती स्लॅब असलेले ८३.५१ चौ. मी. बांधकाम, तसेच लाईट कनेक्शन, पाण्याचे बोअरवेल, वॉलकंपौंड वगैरे आतील तदंगभूत वस्तूसह. यासी चतुःसिमा पुर्वेस - स.ग.नं. पैकी प्लॉट नं.६, दक्षिणेस - स.ग. नं. पैकी क्षेत्र, पश्चिमेस ९ मी. रुंदीचा रस्ता, उत्तरेस स.ग.नं. पैकी प्लॉट नं. १४ आहे. याचे पाणी व वागणूक पश्चिम बाजूचे रस्त्याने जाते व आहे.

वर वर्णन केलेली मिळकत ही गिरीश सुर्यकांत वायकुळे, रा. उपळाई रोड, बार्शी यांचे मालकी कब्जेवहिवाटीची होती व आहे. सदर मिळकत गिरीश सुर्यकांत वायकुळे यांनी आमचे अशिलास विक्री करणेचा ठराव करुन सदर व्यवहारापोटी आमचे अशिलाने त्यांना इसारापोटी रक्कम ही दिलेली आहे व उर्वरीत रक्कम खरेदीखतावेळी देणेची आहे. सदरची मिळकत निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असल्याचे मिळकत मालकांनी आमचे अशिलास खात्री व ग्वाही दिलेली आहे.

तरी या खरेदीपूर्व जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, वरील नमूद मिळकतीबाबत कोणाचे काही कायदेशीर हक्क, हितसंबंध, खरेदीखत, साठेखत, गहाण, दान, लिज, बोजा, चोळी-बांगडी, पोटगी, मृत्यूपत्र, दानपत्र, बँक बोजा इ. कसल्याही प्रकारे हस्तांतरणाबाबतचे कायदेशीर हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून 0८ (आठ) दिवसांचे आत खालील पत्त्यावर स्वतः, अथवा विधिज्ञांमार्फत लेखी पुराव्यासह कळवावे. वेळेत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल वरील मिळकतीबद्दलचा खरेदी खताचा दस्त लिहून नोंदवून घेतील व खरेदी व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कसलीही हरकत चालणार नाही. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली. ता. 0३/0९/२०२६

सही/-
**ॲड. गुरूनाथ शिवाजी तांबारे**
बी.ए., एलएल.बी.
अति. जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी
ता. बार्शी, जि. सोलापूर, मो. ९८३४३५२१९१
श्री. सतीश हरीभाऊ सलगर,
रा. बार्शी तर्फे ॲडव्होकेट

## खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः शहर बार्शी व बार्शी तालुक्यातील लोकांना आमचे अशलांनी तोंडी माहिती दिल्यावरुन व जाहीर नोटीस देण्यास सांगितलेवरुन या जाहीर नोटगाने कळविणेत येते की, **मिळकतीचे वर्णन -** डि. सोलापूर सब डि व ता. बार्शी पैकी शहर बार्शी म्यु.पल हद्दीतील जमिन गट नंबर १२0६/२/७ पैकी खुला प्लॉट नंबर ७ याची मोजमापे - पुर्व बाजू मि. ३५.४६ दक्षिण बाजू मिटर १५.४६ पश्चिम बाजू मिटर २४.९८ व उत्तर बाजू मिटर १८.२३ आहे याचे क्षेत्रफळ चौ.मि. ४.५७.६९ आहे. यासी चतुःसिमा :- पुर्वेस - प्लॉट नं. ६ व ८ दक्षिणेस - 0९ मिटर रुंदीचा जाणे-येणेचा रस्ता, पश्चिमेस - गट नंबर १२0७ ची जमिन, व उत्तरेस कुर्डूवाडी लातूर बायपास रस्ता याचे पाणी व वागणूक दक्षिण व उत्तर बाजुचे रस्त्याने जाते व आहे. येणे प्रमाणे चतुःसिमापुर्वक खुला प्लॉट आतील सर्व तदंगभुत वस्तुसह.

वरील वर्णनाची प्लॉट जागा ही १) योजना अशोक घोलप, २) सय्यद अजम तउल्लाह सय्यद रजाउल्लाह इनामदार, ३) ईस्माईल जलालुद्दीन सौदागर, ४) साहेब आमेर म. शफीक नाईकवाडी, ५) सय्यद सनाऊल्लाह सय्यद रजाउल्लाह इनामदार सर्व रा. बार्शी यांचे मालकीची असून मालकी हक्कपत्रकी गावचे ७/१२ चे उतारेवर मालक म्हणून त्यांचे नावावर दाखल आहे. व त्यांचे कब्जात आहे. वर नमुद प्लॉट जागा वर नमुद मालकांनी आमचे आशिल १) शाम नरसिंह गायकवाड, २) विश्वजित भाऊनारायण गायकवाड ३) सौ. संगिता सुर्यकांत गायकवाड सर्व रा. १५५0 सुभाष नगर ताडसौंदणे नाक्याचे पाठीमागे, बार्शी यांना कायम स्वरुपी विक्री करणेचे ठरविले असून तशी जागा खरेदीबाबत बोलणी झालेली आहे. सदर जागेचे आजपासुन आठ दिवसांत आमचे आशिलाचे नावाने रजिस्टर खरेदीखत करुन देणेचे ठरलेले आहे. वर नमुद जागा ही बिनशेती केलेली असून निर्वेध जोखमी, बिनकर्जी व बिनबोजाची असलेचा भरवसा जागा मालकांनी दिलेला आहे.

तरी वरील वर्णनाच्या जागेबाबत जर कोणाचा काही हक्क, हितसंबंध, कब्जा दान, भालको, टाच. पोटगी. जप्ती, बोजा, भाडेपट्टा, बक्षीस, साठेखत, बँक लोन अन्य कोणताही कायदेशीर हक्क, हितसंबध असल्यास त्याबाबतची लेखी माहिती आमचे आशिलांना खालील पत्त्यावर सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन आठ दिवसांत कळवावी, मुदतीत कोणाची काही हरकत वा तक्रार न आल्यास सदर जागेचा खरेदीखताचा व्यवहार आमचे आशिल पुर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही. व आमचे आशिलाचे खरेदीखतावर त्याचा कसलाही कायदेशीर परिणाम होणार नाही. याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली दिनांक 0३/0९/२०२६

सही/-
**ॲड. श्री. मोहन जाधव** रा. बार्शी
रा. घ.नं. २, कसबा पेठ, बार्शी जि. सोलापूर
मोबाईल नं. ९४२२६५२३३६
अशिल १) शाम नरसिंह गायकवाड,
२) विश्वजित भाऊनारायण गायकवाड
३) सौ. संगिता सुर्यकांत गायकवाड
यांचे तर्फे ॲडव्होकेट बार्शी,
मो. ७६६६८४९८९७

## तेल्हारा नगर परिषद जि. अकोला
### ई-निविदा सूचना

जा.क्र.नपते/साप्रवि/१५४७/२०२६
जा.क्र.नपते/साप्रवि/१५४८/२०२६ दिनांक ०२/०९/२०२६

नगर परिषद तेल्हारा जि. अकोला कार्यालयातील विविध विभागातील कामे १ वर्षे कालावधीकरिता कुशल, अकुशल कंत्राटी कामगार यांचेकडून करुन घेण्याकरिता बाह्ययंत्रणेमार्फत मनुष्यबळ पुरविणाऱ्या संस्थेकडून ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

सदरची जाहीरात संक्षिप्त स्वरुपाची असून, सदर निविदेचा सविस्तर तपशील दिनांक ०३/०९/२०२६ पासून **https://mahatender.gov.in** संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सदर निविदेचा कालावधी **दिनांक ०३/०९/२०२६ ते दिनांक १०/०९/२०२६ पर्यंत** राहील व **दिनांक ११/०९/२०२६ ला** निविदा उघडण्यात येतील .

Tender ID 2026_DMA_1334648_1

स्वा/–
मुख्याधिकारी
नगर परिषद तेल्हारा

## जाहीर नोटीस

**निशाणी क्र. १७**
**एम.ए.सी.पी. नं. १०००/२०२३**
**मे. एम.आर.ए. शेख सो. (तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१, नाशिक)**
नाशिक येथील मो.मोटार अपघात दावा प्राधिकरण सो., नाशिक यांचे कोर्टात...
**दावल आण्णा सुर्यवंशी** - अर्जदार
विरुध्द
**हनुमंत शंकर गिड्डे,** पत्ता : सर्व्हे नं. ३६/१के २/२, फ्लॅट नं. ३०३, ३रा मजला, भिकोबा हाईटस्, मंजिरी बु., नॅशनल हायवेजवळ, संभाजीनगर, ता. म्हाडा, जि. सोलापुर- ४१३३०१ - सा.वाले

ज्याअर्थी वरील सर्व अर्जदार यांनी सा.वाले नं. १ याचे विरुध्द नाशिक येथील मे.मोटार अपघात दावा प्राधिकरण सो., नाशिक यांचे न्यायालयात मोटार अपघात नुकसान भरपाई मिळणेकामी अर्ज दाखल केलेले आहे. त्या सदंर्भात सा.वाले नं. १ यांचे दिलेल्या पत्त्यावर सा.वाले नं. १ यांना नोटीस न बजावता परत आलेली आहे. त्यामुळे सा.वाले नं. १ यास या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, तुम्ही म्हणजेच सा.वाले नं. १ यांनी वर दिलेल्या **न्यायालयात तारीख २१ महिना ०९ सन २०२६ रोजी सकाळी ठिक १०.३० वाजता स्वत:** अगर वकिलामार्फत हजर होवुन आपला जवाब अगर बचाव आवश्यक कागदपत्रांसह सादर करावा.

तुम्ही म्हणजेच सा.वाले नं. १ जर हजर राहीले नाही तर सदर क्लेमचे कामकाज आपल्या गैरहजेरीत एकतर्फा चालविले जाईल.

ही जाहीर नोटीस, आज तारीख ०२ महीना ०९ सन २०२६. आमच्या सहीनिशी अथवा या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली असे.

सही/- **लिपिक** जिल्हा व सत्र न्यायालय, नाशिक. | कोर्टाचा शिक्का | सही/- **अधिक्षक** जिल्हा व सत्र न्यायालय, नाशिक.

## मोहोळ नगरपरिषद, ता. मोहोळ, जि. सोलापूर

जा.क्र.मोनप/बांध/२०२६/३२९ — दिनांक- ०२/०९/२०२६

### ई-निविदा क्र. MCMO/06/2026

मुख्याधिकारी, मोहोळ नगरपरिषद, मोहोळ यांचेकडून सर्वसाधारण रस्ता अनुदान योजनेअंतर्गत खालील अ.क्र. १ आणि नगरपरिषद फंड मोहोळ नगरपरिषद मधून अ. क्र. ०२ या विकास कामांच्या नोंदणीकृत अनुभवी ठेकेदार / अर्हताप्राप्त निविदाधारकाकडून तांत्रिक लिफाफा नमुन्यात स्पर्धात्मक निविदाद्वारे मागविण्यात येत आहे.

| अ. न. | कामाचे नाव | अंदाजपत्रकी व रक्कम | बयाणा रक्कम | सुरक्षा ठेव रक्कम | कामाची मुदत | DLP कालावधी | ठेकेदाराचा वर्ग | निविदा संचाची किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मोहोळ नगरपरिषद हद्दीतील नरखेड रोड ते नागनाथ मंदिर, घाटणे रोड ते कचरा डेपो रस्ता दुरुस्त करणे | ९,८४,८९३/- | ९,८४९/- | करारावेळी २% व बिलातून ७ | ३ महिने | १ वर्ष | १ ते ५ | १,000/- |
| १ | मोहोळ शहरात काकडे पार ते नागनाथ भक्तनिवास ओढापर्यंत सिमेंट पाईप टाकून रस्ता करणे. | ५,८0,५२२/- | ५,८0५/- | करारावेळी २% व बिलातून ७ | ३ महिने | १ वर्ष | १ ते ५ | ५00/- |

१. निविदा फॉर्म ऑफलाईन उपलब्ध दि. 0३/0९/२०२६ ते दि. ११/0९/२०२६ सायं. 0५.00 वाजेपर्यंत.
२. निविदा फॉर्म ऑफलाईन स्वीकृतीचा दि. ११/0९/२०२६ दुपारी 0५.00 वाजेपर्यंत.
३. लिफाफा-१ उघडण्याचा दि. १६/0९/२०२६ व लिफाफा-२ उघडण्याचा दि. १८/0९/२०२६ (शक्य झाल्यास) निविदा फॉर्म विक्री व स्वीकृतीची कार्यवाही वरील कालावधीत नगरपरिषद कार्यालय बांधकाम विभागात उपलब्ध आहे. तसेच वरील कामांच्या निविदेसंदर्भातील शर्ती व अटी कोऱ्यानिविदा अर्जासोबत उपलब्ध आहेत.
१) प्राप्त निविदापैकी कोणतीही एक अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नामंजूर करण्याचा अधिकार मुख्याधिकारी यांनी राखून ठेवला आहे.
२) निविदा मंजूर झालेवर मूळ कागदपत्रे कार्यालयामध्ये सादर करावी. त्यामध्ये व सादर केलेल्या कागदपत्रामध्ये काही तफावत आढळून आल्यास निविदा बयाणा रक्कम जप्त करणेत येईल व निविदा स्वीकारली जाणार नाही.
३) निविदा मंजूर झालेनंतर कामाच्या कोणत्याही स्तरावर निविदा सादर करतेवेळी सादर करण्यात आलेली कागदपत्रे चुकीची / खोटी / बनावट फसवणूक करणारी आढळल्यास निविदा / कार्यादेश रद्द समजण्यात येईल होणाऱ्या नुकसानीस निविदाधारक जबाबदार राहील.
४) नगरपरिषदेने दिलेल्या सूचनेप्रमाणे कामकाज करणे बंधनकारक राहील व तसेच इतर हक्क न.प.कडे राखून ठेवण्यात आले आहेत.

सही/-
(श्री. योगेश डोके)
मुख्याधिकारी
मोहोळ नगरपरिषद, मोहोळ

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### टेबल टेनिस संघात सौम्यदीपचे पुनरागमन

**नवी दिल्ली :** टोकियो ऑलिम्पिकमध्ये एका मोठ्या वादात सापडल्यानंतर पाच वर्षांनी, भारताचा माजी आंतरराष्ट्रीय खेळाडू व आता प्रशिक्षक असलेला सौम्यदीप रॉय जपानमध्ये होणाऱ्या आगामी आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी राष्ट्रीय टेबल टेनिस संघात परतला आहे, मात्र तो वैयक्तिक प्रशिक्षक म्हणून काम पाहणार आहे. रॉय या स्पर्धेसाठी पायस जैन, सुतीर्थ मुखर्जी व सिंड्रेला दास यांचा वैयक्तिक प्रशिक्षक म्हणून प्रवास करणार आहे. बुधवारी क्रीडा मंत्रालयाने सहाय्यक कर्मचारी यादीत त्याच्या नावाला मंजुरी दिली. इटालियन मॅसिमो कॉन्स्टँटिनी यांच्या नेतृत्वाखालील समर्पित सहाय्यक कर्मचाऱ्यांमध्ये त्याचा समावेश नसल्यामुळे, त्याला खेळाच्या मैदानावर प्रवेश मिळण्याची शक्यता कमी आहे. टोकियो ऑलिम्पिकमध्ये राष्ट्रीय प्रशिक्षक राहिलेला रॉय, उन्हाळी ऑलिम्पिकमधील सामन्यांदरम्यान स्टार खेळाडू मनिका बत्राने त्याच्याकडून प्रशिक्षण घेण्यास नकार दिल्यानंतर वादाच्या भोवऱ्यात सापडला होता. रॉयने तिला ऑलिम्पिकच्या आधी एक सामना निश्चित करण्यास सांगितले होते, जेणेकरून त्यांची शिष्या या मोठ्या स्पर्धेसाठी पात्र ठरू शकेल, असा आरोप मनिकाने केला होता. मी केवळ आपल्या तीन खेळाडूंनाच नव्हे, तर भारतीय पथकाला शक्य त्या सर्व प्रकारे मदत करण्याचा प्रयत्न करेल., असे रॉय म्हणाला.

### 'तेच' पाकिस्तान संघावर टीका करताय् : नक्वी

**कराची :** ज्यांनी आपल्या आयुष्यात काहीच साध्य केलेले नाही, असे लोकच पाकिस्तान संघावर कठोर टीका करीत आहेत, असे पीसीबी अध्यक्ष मोहसिन नक्वी म्हणाले. इंग्लंडविरुद्धच्या कसोटी सामन्यांमधील दारुण पराभवानंतर पाकिस्तानच्या क्रिकेट संघावर होत असलेल्या टीकेमुळे ते संतप्त झालेले. लंडनमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलताना नक्वी यांनी इतर संघांच्या कमकुवत प्रतिस्पर्ध्यांविरुद्धच्या पराभवांचा दाखला दिला. यात आयर्लंडकडून भारताचा अलीकडील टी-२० पराभवाचाही समावेश आहे. काही पराभवांवरून संपूर्ण संघाचे मूल्यमापन करता येत नाही, असे त्यांनी ठामपणे सांगितले. इंग्लंड दौऱ्यावर असलेल्या संघातून सात खेळाडूंना वगळून त्याजागी प्रामुख्याने युवा खेळाडूंचा समावेश करण्याचा निर्णय घेतल्यामुळे नक्वी आणि पाकिस्तान क्रिकेट बोर्डावर टीकेची झोड उठली होती. तीन सामन्यांच्या मालिकेत पाकिस्तान सध्या ०-२ ने पिछाडीवर आहे. सर्व बाजूंनी होणाऱ्या टीकेमुळे स्पष्टपणे अस्वस्थ झालेले नक्वी, हे पाकिस्तानचे गृहमंत्रीही आहेत. देशाचे क्रिकेट सध्या सर्वात वाईट स्थितीत आहे, असा दावा करणे अन्यायकारक आहे. आमचा यशाचा दर २४ टक्क्यांवरून ७३ टक्क्यांपर्यंत वाढला आहे, असेही ते म्हणाले. त्यांनी टीकाकार आणि चाहत्यांना खेळाडूंचे मनोधैर्य खच्ची करणे थांबवण्याचे आवाहन केले. शाहिद आफ्रिदी, मोहम्मद युसूफ आणि रशीद लतीफ यांसारख्या माजी खेळाडूंनीही पाकिस्तान संघावर टीका केली आहे.

### पहिली युथ हॉकी५ एस विश्वचषक इजिप्तमध्ये

**लॉसेन :** आंतरराष्ट्रीय हॉकी महासंघाने (एफआयएच) 'एफआयएच युथ हॉकी५एस विश्वचषक' स्पर्धा सुरू करण्याची घोषणा केली आहे. या स्पर्धेची पहिली आवृत्ती ७ ते १२ डिसेंबर २०२६ या कालावधीत इजिप्तमधील इस्माईलिया येथे आयोजित केली जाणार आहे. युथ ऑलिम्पिक स्पर्धेमधून हॉकीचा समावेश वगळल्यानंतर, युवा खेळाडूंना हॉकीच्या या संक्षिप्त स्वरूपात हॉकी फाईव्ह ए साईड खेळण्याची संधी देण्यासाठी ही स्पर्धा सुरू करण्यात आली आहे. कोरोनामुळे २०२२ मधील युथ ऑलिम्पिक गेम्स पुढे ढकलण्यात आले आणि त्यानंतर 'डकार २०२६' युथ ऑलिम्पिक गेम्समध्ये हॉकीचा समावेश केवळ 'नॉन-मेडल एंगेजमेंट स्पोर्ट' म्हणून करण्याचा निर्णय घेण्यात आला. या पृष्ठभूमीवर, जगातील अत्यंत गुणवान युवा खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रगतीची अर्थपूर्ण संधी मिळत राहावी, यासाठी एफआयएचने ही नवीन जागतिक स्पर्धा सुरू केली आहे.

# व्हिक्टरला नमवून श्रीकांतची आगेकूच

**चायना मास्टर्स बॅडमिंटन**



किदाम्बी श्रीकांत

**शेन्झेन, ३ सप्टेंबर**

येथे सुरू असलेल्या चायना मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या किदाम्बी श्रीकांतने नवव्या विश्वमानांकित कॅनडाच्या व्हिक्टर लाईला सरळ गेम्समध्ये पराभवाचा धक्का देत स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली.

या बीडब्ल्यूएफ सुपर ७५० स्पर्धेत माजी प्रथम विश्वमानांकित श्रीकांतने संयमी खेळ करत लाईचा २१-१८, २१-१९ असा पराभव केला. हा सामना एका तासापेक्षा कमी वेळात संपला. आता त्याची लढत हाँगकाँगच्या ली चुक यिऊशी होईल. ली चुक यिऊने उप-उपांत्यपूर्व फेरीत जागतिक क्रमवारीत नवव्या स्थानावर असलेल्या टोमा पोपोव्हचा पराभव केला होता.

सुरुवातीला ३-३ अशी बरोबरी झाल्यानंतर श्रीकांत ३-७ असा पिछाडीवर पडला होता; मात्र श्रीकांतने जोरदार 'जंप स्मॅश' मारून पुन्हा बरोबरी केली. लाईने 'नेट'वर चूक केल्यामुळे श्रीकांतला फायदा झाला व त्याने दुसऱ्या 'गेम पॉइंट'वर पहिला गेम जिंकला. दुसऱ्या गेमच्या प्रारंभी श्रीकांत ५-९ असा पिछाडीवर होता, पण त्याने गुणांमधील अंतर कमी करीत १३-१४ अशी स्थिती गाठली. त्यानंतर त्याने 'मॅच पॉइंट' मिळविला व लाईचा फटका कोर्टच्या बाहेर गेल्यामुळे श्रीकांतचा विजय निश्चित झाला. या कॅनेडियन खेळाडूने सुरुवातीच्या फेरीत भारताच्या लक्ष्य सेनचा पराभव केला होता.

स्पर्धेत आत्मविश्वासाने सुरुवात केल्यानंतर श्रीकांतने चीनमधील आपली दमदार कामगिरी कायम ठेवली. त्याने सुरुवातीच्या फेरीत चायनीज तैपेईच्या ची यू-जेनचा अवघ्या ३५ मिनिटांत २१-१६, २१-१५ असा पराभव केला होता. आता आणखी एका मानांकित प्रतिस्पर्ध्याचे आव्हान संपुष्टात आल्यामुळे श्रीकांत स्पर्धेत आगेकूच करण्याचा प्रयत्न करेल. (वृत्तसंस्था)

### तन्वी शर्माचा टोमोका मियाझाकीकडून पराभव



महिला एकेरीच्या उप-उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात भारताच्या तन्वी शर्माला जागतिक क्रमवारीत नवव्या स्थानावर असलेल्या टोमोका मियाझाकीकडून पराभव पत्करावा लागला. ६६ मिनिटे चाललेल्या रोमांचक लढतीत तन्वीला १७-२१, २१-१८, १६-२१ असा पराभव पत्करावा लागला आणि स्पर्धेतून बाहेर पडावे लागले. तन्वीने पहिल्या फेरीत डेन्मार्कच्या अमाली शुल्झचा २१-१६, २१-१७ असा पराभव करून अंतिम १६ खेळाडूंमध्ये आपले स्थान निश्चित केले होते.

### सात्त्विक-चिराग उपांत्यपूर्व फेरीत

भारताची जोडी सात्त्विकसाईराज रन्कीरेड्डी व चिराग शेट्टीने दमदार कामगिरी करत फ्रान्सच्या ख्रिस्टो पोपोव्ह आणि टोमा ज्युनियर पोपोव्ह या पोपोव्ह बंधूंचा २१-१७, २२-२४, २१-९ असा पराभव केला आणि 'चायना मास्टर्स' स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत आपले स्थान निश्चित केले. स्पर्धेत चौथ्या मानांकित असलेल्या या भारतीय जोडीने दुसरा गेम गमावल्यानंतर खेळ चांगला सावरला व निर्णायक गेममध्ये वर्चस्व गाजवत फ्रेंच बंधूंवर सहज विजय मिळविला.

# अश्मिताचे आव्हान कायम

**इंडोनेशिया मास्टर्स बॅडमिंटन, प्रणॉय पराभूत**




**जकार्ता, ३ सप्टेंबर**

येथील सेनायनमधील 'इस्टोरा गेलोरा बुंग कार्नो' येथे आयोजित इंडोनेशिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत गुरुवारी झालेल्या पुरुष एकेरीच्या अंतिम-१६ च्या फेरीतील सामन्यात अव्वल मानांकित भारताच्या एच.एस. प्रणॉयला चीनच्या शुआन चेन झूकडून पराभव पत्करावा लागला, मात्र महिला एकेरीत अव्वल मानांकित अश्मिता चालिहाने मलेशियाच्या गोह जिन वेई हिचा पराभव करून पुढील फेरीत धडक मारली व स्पर्धेतील आपले आव्हान कायम राखले.महिला एकेरीच्या गटात, अव्वल मानांकित अश्मिता चालिहाने मलेशियाच्या गोह जिन वेई हिचा १०-२१, २१-१०, २१-१७ असा पराभव करून पुढील फेरीत धडक मारली. केवळ गेल्या महिन्यातच, आसान येथे झालेल्या कोरिया मास्टर्स सुपर ३०० बॅडमिंटन स्पर्धेच्या महिला एकेरीच्या अंतिम सामन्यात, चीनच्या चौथ्या मानांकित हान कियान शी हिचा संघर्षपूर्ण पराभव करून चालिहाने आपले पहिले 'बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूर' विजेतेपद पटकावले होते.

जागतिक क्रमवारीत ३८ व्या स्थानावर असलेली ही खेळाडू गुवाहाटी येथील 'नॅशनल सेंटर ऑफ एक्सलन्स'मध्ये पार्क ते-सांग यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करते.

तिसरी मानांकित अनमोल खरब हिनेही आपली सहकारी इलीशा पाल हिचा २१-१५, २१-११ असा पराभव करून स्पर्धेची पुढील फेरी गाठली.

पुरुष एकेरीचा पहिला गेम अत्यंत चुरशीचा झाला व कोणत्याही खेळाडूला स्पष्ट आघाडी घेता आली नाही. जेव्हा चिनी खेळाडूने दोन किंवा तीन गुणांची आघाडी घेतली, तेव्हा प्रणॉयने त्याला चोख प्रत्युत्तर दिले आणि ती आघाडी फार मोठी होऊ दिली नाही. १६-१८ अशा पिछाडीनंतर प्रणॉयने जोरदार पुनरागमन करीत १९-१८ अशी आघाडी घेतली, परंतु चेन झूने १९-१९ अशी बरोबरी साधली. त्यानंतर झूने आघाडी घेत तो गेम २२-२० अशा फरकाने जिंकला. त्यानंतर मात्र सामन्याचे चित्र पूर्णपणे बदलले; झूने दुसऱ्या गेमवर वर्चस्व गाजवले आणि २१-१५ अशा फरकाने तो गेम जिंकत ४५ मिनिटांत सामना आपल्या नावे केला.

याआधी जागतिक क्रमवारीत ३९ व्या स्थानावर असलेल्या प्रणॉयने १ तास ४ मिनिटांच्या लढतीत १८-२१, २१-१५, २१-१९ असा विजय मिळवून अंतिम सोळाच्या फेरीत स्थान निश्चित केले होते. (वृत्तसंस्था)

# रोहित यादववर दोन वर्षांची बंदी

**वयाबाबतची फसवणूक**

**नवी दिल्ली, ३ सप्टेंबर**

राष्ट्रीय कनिष्ठ गट क्रिकेट संघात स्थान मिळवल्यानंतर अवघ्या काही महिन्यांतच, वयाशी संबंधित नोंदींमधील विसंगतीमुळे बंगालचा क्रिकेटपटू आणि भारताच्या १९-वर्षांखालील संघातील खेळाडू रोहित यादववर 'बीसीसीआय'ने दोन वर्षांची बंदी घातली आहे.

रोहित भारताच्या १९-वर्षांखालील संघासोबत श्रीलंकेच्या दौऱ्यावर गेला होता आणि त्यानंतर या महिन्याच्या अखेरीस राजकोटमध्ये होणाऱ्या ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेसाठी त्याची निवड करण्यात आली होती. वयाची पडताळणी करताना त्याच्या आधार कार्डावरील नोंदींमध्ये विसंगती आढळल्याने, त्याच्या या जलद प्रगतीला आता गालबोट लागले आहे. त्याच्या आधार कार्डावरील नोंदींवरून असे दिसून येते की, गेल्या काही वर्षांत त्याच्या जन्मतारखेत अनेकदा बदल करण्यात आले आहेत. बीसीसीआयने रोहितवर 'तात्काळ प्रभावाने' दोन वर्षांची बंदी घालण्याचा निर्णय घेतला असून, सर्व संलग्न राज्य संघटनांना याबद्दल सूचित करण्यात आले आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

२०१४ मध्ये जेव्हा रोहितने 'क्रिकेट असोसिएशन ऑफ बंगाल'कडे नोंदणी केली, तेव्हा त्याची जन्मतारीख ७ जुलै २००७ अशी आणि पत्ता उत्तर प्रदेशातील असल्याचे नोंदविले गेले होते. २०१७ मध्ये आधार कार्डावरील माहिती अद्ययावत करताना त्याचे जन्माचे वर्ष बदलून २००६ करण्यात आले आणि २०२० मधील अद्ययावतीकरणातही ते २००६ असेच कायम राहिले.

मात्र, २०२१ मध्ये त्याच्या जन्माच्या वर्षात पुन्हा बदल करण्यात आला. यावेळी ते २००९ असे करण्यात आले. त्यानंतर २०२२, २०२३ आणि २०२४ मध्ये आधार कार्डावरील माहिती अद्ययावत करतानाही २००९ हेच वर्ष कायम राहिले. दरम्यान, त्याचा पत्ताही उत्तर प्रदेशवरून बदलून हावडा असा झाला . (वृत्तसंस्था)

# स्मृती मंधानाचे शानदार शतक

**आशिया चषक महिला टी-२० क्रिकेट**

**हाँगकाँगसमोर १९४ धावांचे लक्ष्य**




**दुबई, ३ सप्टेंबर**

येथील दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर सुरू असलेल्या आशिया चषक महिला टी-२० क्रिकेट स्पर्धेत आज हाँगकाँगविरुद्धच्या सामन्यात भारताच्या स्मृती मंधानाने बहारदार फलंदाजीचे प्रदर्शन करीत शतक झळकावले. भारताने २० षटकांत ५ बाद १९३ धावा उभारल्या आणि हाँगकाँगसमोर विजयासाठी १९४ धावा काढण्याचे लक्ष्य ठेवले. स्मृती मंधानाने ६४ चेंडूंत १४ चौकारव ७ षट्कारासह १२४ धावा केल्या.हे तिचे दुसरे टी-२० शतक ठरले.

हाँगकाँग संघाची कर्णधार नताशा माईल्सने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. स्मृती मंधाना व शेफाली वर्माने भारताच्या डावाची झकास सुरुवात केली. या दोघींनी पहिल्या गड्यासाठी ७४ धावांची भागीदारी केली. रूचिता वेंकटेशने शेफालीला (२८) लॅमप्लॉगकडून झेलबाद केले. मंधाना एक टोक सांभाळत असताना प्रतिका रावल (१०) मात्र लवकरच बाद झाली, परंतु त्यानंतर तिला ऋचा घोषची उत्तम साथ मिळाली. ऋचाच्या मदतीनेच स्मृती मंधानाने आपले अर्धशतक साजरे केले. स्मृतीने ४० चेंडूंत ८ चौकार व एका षट्काराच्या मदतीने ५० धावा पूर्ण केल्या. दरम्यान, मंधाना अर्धशतकाला शतकामध्ये रुपांतर करण्याचा प्रयत्न करीत होती. ९५ धावांवर असताना स्मृतीला जीवदान मिळाले. ॲलिसन सियूच्या गोलंदाजीवर मंधानाने षटकार मारण्याचा प्रयत्न केला, पण तिचे 'टायमिंग' चुकले. क्षेत्ररक्षकाने धावत येऊन व पुढे झेप घेऊन झेल घेण्याचा प्रयत्न केला, परंतु चेंडू तिच्या हातातून निसटला. याचदरम्यान ऋचाला (११) लॅमप्लॉगने आपल्याच गोलंदाजीत झेलबाद केले, त्यावेळी भारताच्या १६.२ षटकांत ३ बाद १५१ धावा झाल्या होत्या. त्यानंतर स्मृती मंधानाने मारियानाला चौकार हाणत आपले शतक पूर्ण केले. (वृत्तसंस्था)




### 'अहिल्याबाई'च्या वेदिका श्रीचिप्पाला राज्य युनिफाईट स्पर्धेत सुवर्ण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ सप्टेंबर-**

युनिफाईड असोसिएशन ऑफ महाराष्ट्र व सातारा जिल्हा युनिफाईट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्य युनिफाईट स्पर्धेमध्ये अहिल्याबाई कनिष्ठ महाविद्यालय सोलापूर येथील वेदिका श्रीचिप्पा (इ.११ वी) हिने १९ वर्षाखालील ४२ किलो वजन गटात सुवर्णपदक पटकाविले. तिच्या या यशाबद्दल प्राचार्य इस्माईल शेख, संस्थेचे संस्थापक सचिव हाजी बंदेनवाज शेख, प्रा. महेंद्र ढवाण यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तिला क्रीडाशिक्षक प्रा.धनाजी धेंडे, सतीश हेगडे, युनिफाईड असोसिएशनचे प्रशिक्षक मनोज बाळगे व इक्बाल शेख आदींचे मार्गदर्शन लाभले.

### सोलापूरच्या तीन तलवारबाजांची 'साई'च्या राष्ट्रीय केंद्रात निवड



**सोलापूर, दि. ३ सप्टेंबर -**

जिल्हा तलवारबाजी संघटनेच्या ज्ञानदा शिरवाळ, प्रांजली कोरे आणि अथर्व बारसे या तीन खेळाडूंची भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या (साई) वाराणसी (उत्तर प्रदेश) येथील केंद्रात विशेष प्रशिक्षणासाठी निवड झाली आहे.भारतातून २५० खेळाडूंच्या सहभागासह झालेल्या देशव्यापी निवड चाचणीत अथर्व आणि प्रांजली यांनी उत्कृष्ट कामगिरी करत स्थान मिळवले, तर ज्ञानदा हिची राष्ट्रीय स्पर्धेतील कामगिरीवर निवड झाली. हे तिघे ऑल स्टार फेन्सिंग क्लबचे असून त्यांना प्रशिक्षक पवन भोसले व सोहम साठे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे राज्य तलवारबाजी संघटनेचे उपाध्यक्ष प्रा. प्रकाश काटुळे, जिल्हा तलवारबाजी संघटनेचे सचिव दीपक शिंदे, राजेंद्र गोटे व अनिल पाटील यांनी अभिनंदन केले आहे.



### रुक्माई स्पोर्ट्र्स क्लबच्या खो-खो खेळाडूंचा सत्कार

**सोलापूर, दि. ३ सप्टेंबर-**

मुंबई येथे पार पडलेल्या 'ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी खो-खो स्पर्धेमध्ये एसएनडीटी विद्यापीठाच्या संघाने रौप्य पदक पटकावले. या यशामध्ये रुक्माई स्पोर्ट्र्स क्लबच्या अर्चना व्हनमाने, सृष्टी रुपनवर, सपना बंडे आणि गौरी कासवीद या चार खेळाडूंचा समावेश होता. या राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत त्यांनी अत्यंत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करून विद्यापीठाला हे यश मिळवून देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.खेळाडूंच्या या उल्लेखनीय यशाबद्दल रुक्माई स्पोर्ट्र्स क्लबचे अध्यक्ष तथा जागृती शाळेचे प्राचार्य विजयरत्न चव्हाण यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यांचे मागास समाजसेवा मंडळाचे अध्यक्ष सुभाष चव्हाण, उपाध्यक्ष विवेक चव्हाण आणि जय जवान जय किसान सैनिकी शाळेचे प्राचार्य रवींद्र चव्हाण यांनी सर्व खेळाडूंचे अभिनंदन केले. या खेळाडूंना सदानंद गुजले, महेश चव्हाण, रवींद्र चव्हाण, जितेश चव्हाण आणि क्रीडा शिक्षक संतोष जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

# राज्यस्तरीय युनिफाईट स्पर्धेत सोलापूरला ४२ पदके

## १५ सुवर्ण, १६ रौप्य व ११ कांस्य पदकांचा समावेश



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ सप्टेंबर -**

राज्यस्तरीय युनिफाईट अजिंक्यपद स्पर्धेत विविध वजनी व वयोगटातून सोलापूरच्या खेळाडूंनी १५ सुवर्ण, १६ रौप्य व ११ कांस्य पदकासह ४२ पदकांची कमाई केली. भारतीय शालेय क्रीडा महासंघ मान्यताप्राप्त भारतीय युनिफाईट वेल्फेअर महासंघाच्या मान्यतेने महाराष्ट्र युनिफाईट वेल्फेअर असोसिएशन व सातारा जिल्हा युनिफाईट वेल्फेअर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने वाई (सातारा) येथे पार पडल्या. पदक प्राप्त खेळाडूंना मुख्य प्रशिक्षक भीमराव बाळगे, इकबाल शेख, सहाय्यक प्रशिक्षक अमोल घोडके, मनोज बाळगे, प्रचिता जोगदांडे, पौर्णिमा पुजारी यांचे मार्गदर्शन लाभले.

विजेते खेळाडूंचे जिल्हा ॲमेचूअर स्पोर्ट्र्स कराटे असोसिएशनचे अध्यक्ष महादेव चाकोते, जिल्हा युनिफाईट असोसिएशनचे अध्यक्ष महेश इंगळे, राज्य किकबॉक्सिंग संघटनेचे अध्यक्ष मनिष सुरवसे, जिल्हा सिकई असोसिएशनचे अध्यक्ष मुकुंदराव जाधव, राज्य सदस्य शिवकुमार पाटील आर्दीनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

**पदक विजेते खेळाडू**

**सुवर्ण (१५)** : नैतिक संजय कोल्हापुरे, अर्चिता नितीन चाकुपल्ली, चिरंतना नवनीत पुकाळे, अद्वैत अमितकुमार व्याळे, श्रावणी बसवराज लाबजणे, अमुल्या मल्लिकार्जुन बिरादार, मणाल महेश लटकर, समर्थ दत्तात्रय कोळी, सम्राट संघपाल वाघमारे, सूची निलप्पा बापोले, श्रावणी दत्तात्रय डांगे, वेदिका अमरनाथ श्रीछिप्या, संस्कृती दीपक अंजीखाने, अनुष्का अरविंद किंगणे, दक्षतन्या नवनीत पुकाळे.

**रौप्य (१६)** : ऋतुजा वीरेंद्र वेदपाठक, हिरकणी संजय कोल्हापुरे, आराध्या साहेबगौडा पाटील, वरद वासुदेव कामळापूरकर, हरी अमित शालगर, आरुष गोपाळ रेंकेकर, गौरी नितुल लोडे,आकाश सुरेश पुरीगोस्वामी, लक्ष्मी साहेबगौडा पाटील, यशोविर्ची छगन राठोड, दिव्या आनंद लखोटिया, म्युरेश शिवानन्द हुमनाबादकर, जुनेद सिराजकादर खान, श्रेया नृसिंह कोटा, श्रुती कृष्णा स्वामी, वंशिका केबलराम माळी.

**कांस्य (११)** : तन्वी विवेक इंगळे, शौर्य रोहित दुरगुंडी, श्रुतिका सचिन गायकवाड, अथर्व गोविंद मच्छा, वीरा केदारनाथ गोगानकर, प्रगती अजितसिंग पवार, मानसी नवीन टाक्याळी, श्रद्धा नृसिंह कोटा, अक्षरा विनोद पिसाळ, समीक्षा संग्राम दवेवाळे,आर्या संतोष मोटे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/


## महत्वाचे...

## विवाहासाठी मुलींची स्थळ दाखवते म्हणून फसवणुक; महिलेवर गुन्हा

**मोहोळ, दि. ३ सप्टेंबर -**

विवाहासाठी मुलींची स्थळ दाखवते असे म्हणून मोहोळ तालुक्यातील पाच जणांची फसवणूक केल्याने धाराशिव जिल्ह्यातील महिलेवर गुन्हा दाखल केला आहे. याबाबत मोहोळ पोलिस ठाण्यात सागर ताकमोगे (वय ३३, रा.अनगर) यांनी फिर्याद दाखल केली आहे. ज्योती राहुल बनसोडे (वय ५०) हिची फिर्यादीसोबत ओळख झाली. मुलींची स्थळ दाखवते असे सांगून तिने ताकमोगे यांना तीन-चार मुलींचे फोटो बायोडाटा पाठवले. सव्वा लाख रुपयांची मागणी केली. ताकमोगे यांनी ते फोन पेद्वारे व एकदा रोखीने पाठवले. स्थळ दाखवण्याबाबत मात्र आज दाखवते, उद्या दाखवते असे म्हणत वेळ मारून नेली. फिर्यादीने स्थळ दाखवत नसाल तर पैसे माघारी द्या म्हणून सांगितले असता फोन कट केला. त्यानंतर फिर्यादीस मोहोळ तालुक्यातील कांता मोठे, आरती रणशूर, सागर जाधव, अमोल भोंग यांच्याकडूनही अशाच पद्धतीने सव्वा लाख रुपये घेतल्याचे समजले. यावरून फसवणूक केली म्हणून मोहोळ पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. प्रकरणाचा तपास पोलिस सब इन्स्पेक्टर आकाश शेळके हे करीत आहेत.

## श्री गणेशोत्सवानिमित्त बार्शीत उद्या शांतता कमिटीची बैठक

**बार्शी दि. ३ सप्टेंबर-**

श्री गणेशोत्सवाच्या अनुषंगाने गणेशोत्सव शांततेत पार पाडण्यासाठी पोलिस उपविभाग बार्शी व बार्शी शहर पोलिस ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने शांतता कमिटी बैठकीचे आयोजन शनिवार, दि. ५ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता, कै. यशवंतराव चव्हाण सभागृह, पांडे चौक, बार्शी येथे होत आहे. बैठकीस विजय कबाडे, अपर पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण पोलीस, सुहास जगताप, उपविभागीय पोलीस अधिकारी, बार्शी तसेच एफ.आर. शेख तहसीलदार बार्शी, सार्वजनिक बांधकाम विभाग, पंचायत समिती, बार्शी नगरपरिषद व महावितरण विभाग, ग्रामीण रुग्णालय बार्शीचे वैद्यकीय अधिकारी असे संबंधित अधिकारी उपस्थित राहणार आहेत. शांतता कमिटी बैठकीत बार्शी शहर पालिस ठाणे, बार्शी तालुका पोलिस ठाणे, वैराग पोलिस ठाणे, पांगरी पोलीस ठाणे, माढा पोलीस ठाणे हद्दीतील गणेश मंडळाचे अध्यक्ष / पदाधिकारी, नागरीक यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन पोलीस प्रशासनाच्यावतीने करण्यात येत आहे. गणेशोत्सवाच्या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्था, वाहतूक नियोजन, गणेश मंडळांचे नियोजन, मंडप व्यवस्था, ध्वनिक्षेपकाचा वापर, विद्युत सुरक्षितता, मिरवणूक मार्ग, नागरिकांची सुरक्षितता तसेच विविध शासकीय नियमांचे पालन याबाबत सदर बैठकीत चर्चा व मार्गदर्शन करण्यात येणार आहे.



## ऊसाला ५,५०० रुपयांचा हमीभाव द्या : अ.भा. किसान सभा

**सोलापूर, दि. ३ सप्टेंबर-**

जिल्ह्यात यंदा अत्यल्प पर्जन्यमान झाल्यामुळे गंभीर दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. शासनाने तातडीने जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर करावा आणि चालू गळीत हंगामात ऊस उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिटन ५ हजार ५०० रुपये हमीभाव द्यावा, अशी मागणी अखिल भारतीय किसान सभेने केली आहे. मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांना दिले आहे. ऊस दर निश्चित होत नाही, तोपर्यंत कारखान्यांना गाळप परवाना देऊ नये, अशी मागणीही केली आहे. शासनाने सन २०२५ च्या पिक विम्यातून अक्कलकोट तालुक्याला वगळल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. ज्या शेतकऱ्यांनी पिक विमा भरला आहे, त्यांना तातडीने विम्याची रक्कम अदा करावी, अशी मागणीही निवेदनात आहे. शेतकरी हितासाठी तीव्र आंदोलनाचा इशाराही दिला आहे.यावेळी सुलेमान शेख, राजेंद्र स्वामी, दत्ता चव्हाण, जावेद आवटे, तात्यासाहेब व्हनमाने, दयानंद फताटे, भिमाशंकर झळके आदी उपस्थित होते.

# एसटीच्या सवलत कार्ड योजनेचा पहिल्याच दिवशी फज्जा

- ज्येष्ठ नागरिक, महिलांना मनस्ताप
- मशीन आणि कार्ड मधील सॉफ्टवेअरचा ताळमेळ नसल्याने वादावादी
- कार्ड सक्ती तातडीने रद्द करण्याची ग्राहक पंचायतीची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३ सप्टेंबर -**

ज्येष्ठ नागरिक, महिला आणि इतर सवलतीच्या प्रवाशांना तिकिटात सवलतीसाठी एसटी महामंडळाने सुरू केलेल्या एसटीकार्ड योजनेचा पहिल्याच दिवशी फज्जा उडाला. कार्ड आणि एसटी महामंडळाच्या तिकीट मशीनमधील सॉफ्टवेअरचा ताळमेळ बसत नसल्याने प्रवासी आणि एसटी कर्मचाऱ्यांमध्ये वादावादी झाली. महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना मोठ्या मनस्तापाला सामोरे जावे लागले.

एसटी महामंडळाने १ सप्टेंबरपासून सवलतीच्या प्रवाशांसाठी एसटीचे स्मार्ट कार्ड अनिवार्य केले आहे. हे कार्ड असेल तरच संबंधित प्रवाशांना तिकिटात सवलत मिळणार आहे. सवलतीचा लाभ घेण्यासाठी नागरिकांनी मोठ्या प्रमाणात कार्ड काढले. मात्र, प्रत्यक्ष प्रवास करताना कार्डचा मशीनमध्ये स्वीकार होत नसल्याने अनेक प्रवाशांची गैरसोय झाली.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे महामंडळाकडून लाखो कार्ड वितरित केले असताना अनेक बसस्थानकांवर कार्डमध्ये बॅलन्स टाकण्यासाठी किंवा त्याची प्रक्रिया करण्यासाठी मोजकीच मशीन उपलब्ध असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे कार्ड घेण्यासाठी आणि त्यामध्ये बॅलन्स भरण्यासाठी प्रवाशांच्या रांगा लागल्या. यामुळे बसस्थानकांवर गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. तांत्रिक अडचणी दूर होईपर्यंत जुन्या पद्धतीने सवलतीची तिकिटे देण्याची व्यवस्था कायम ठेवावी, अशी मागणी प्रवाशांमधून होत आहे.

### परिवहन मंत्र्यांनी लक्ष घालावे

एसटीच्या कार्डसाठी अतिरिक्त शुल्क, त्यामध्ये बॅलन्स भरण्याची प्रक्रिया आणि त्यावर आकारला जाणारा जीएसटी यामुळे सर्वसामान्य प्रवाशांवर आर्थिक भार पडत असल्याचेही ग्राहक पंचायतीने म्हटले आहे. एसटी महामंडळाने तातडीने या तांत्रिक अडचणी दूर कराव्यात, पुरेशा प्रमाणात मशीन उपलब्ध करून द्याव्यात आणि तोपर्यंत सवलतीसाठी कार्डची सक्ती करू नये आदी मागण्यांबरोबरच परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्वत: या प्रकरणात तातडीने लक्ष घालून प्रवाशांची होणारी गैरसोय थांबवावी, अशीही मागणीकेली आहे.

कार्ड, तिकीट मशीन आणि संबंधित सॉफ्टवेअर यांचा ताळमेळ आहे की नाही, याची प्रत्यक्ष चाचणी न करता थेट योजना लागू केल्याने पहिल्याच दिवशी प्रवाशांना त्रास सहन करावा लागला. एकीकडे एसटी महामंडळाकडून प्रवाशी वाढविण्यासाठी प्रयत्न होत असल्याचे सांगण्यात येते. मात्र अशा भोंगळ कारभारामुळे एसटीचे प्रवासी कसे वाढणार?

**- शशिकांत हरिसाद, सोलापूर जिल्हाध्यक्ष, ग्राहकपंचायत.**



## बार्शीत मराठा सेवा संघाचा ३६ वा वर्धापनदिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि. ३ सप्टेंबर -**

मराठा सेवा संघाचा ३६ वा वर्धापनदिन आणि विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या यशवंतांचा सत्कार समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. हा कार्यक्रम बार्शी येथील मराठा सेवा संघाच्या कार्यालयात झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जयकुमार शितोळे होते. व्यासपीठावर मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष संतोष मोळवणे, जिल्हा उपाध्यक्ष किरण गाढवे, नगरसेवक प्रकाश माने, ॲड.अनिल पाटील, अशोक सावळे, शिवाजी घोरपडे, सुवर्णा शिवपुरे, रावसाहेब यादव, प्रकाश दहीहांडे, महेश देशमुख, विजय राऊत, माधव देशमुख, गणेश पाटील, राहुल तावरे, गणेश गोडसे आदी उपस्थित होते.

मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष संतोष मोळवणे यांना दलित महासंघाचा प्रतिष्ठित पुरस्कार मिळाल्याबद्दल शहर व तालुका यांच्यावतीने त्यांचा विशेष सत्कार केला. प्रा. किरण गाढवे यांनी प्रास्ताविकात मराठा सेवा संघाच्या वाटचालीचा आढावा घेतला. राहुल शिंदे, अशोक सावळे आणि शिवाजी घोरपडे यांनी मराठा समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक प्रगतीसाठी संघाचे योगदान सांगितले.

शितोळे यांनी सर्व घटकांना सोबत घेऊन काम करण्याची संघाची भूमिका आदर्श असल्याचे सांगितले. कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्ते नाना नाईकनवरे यांनी वाचनालयास एक लाख रुपयांची देणगी जाहीर केली.

# आमदार मुक्कामी अभियानास उत्स्फूर्त प्रतिसाद

### आ. समाधान आवताडे यांच्याकडून प्रत्यक्ष कामांची पाहणी; पाठखळ गावातील सुविधांचा घेतला आढावा



**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि. ३ सप्टेंबर -**

सोलापूर जिल्हा प्रशासनाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत राबवित येणाऱ्या 'सुराज्य ग्राम मुक्काम मोहिमेअंतर्गत मंगळवेढा तालुक्यातील पाठखळ येथे आमदार समाधान आवताडे यांनी भेट देऊन गावातील विविध शासकीय सुविधा आणि कामांची प्रत्यक्ष पाहणी केली. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून प्रश्नांची मांडणी केली.

आमदार आवताडे यांनी सरकारी दवाखाना, अंगणवाडी, तलाठी कार्यालय, नवीन ग्रामपंचायत कार्यालय, जिल्हा परिषद शाळा, अभ्यासिका तसेच पशुवैद्यकीय दवाखान्याला भेट देऊन तेथील सुविधा, उपलब्ध व्यवस्था आणि आवश्यक सुधारणांबाबत माहिती घेतली

यावेळी सहाय्यक उपायुक्त जगन्नाथ सुरवसे, डॉ. तानाजी भोसले, डॉ. बोर्डे, डॉ. विशाल कुंभार, डॉ. प्रमोद आदलिंगे, डॉ. सत्यजित लामकाने, डॉ. समाधान साळुंखे, डॉ. मुमताज आतार, डॉ. नेमाणे, डॉ. समाधान माळी, डॉ. अनिल बळछत्रे, डॉ. कोरे उपस्थित होते. उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. शिवपुजे, प्रांताधिकारी बी. आर. माळी, तहसीलदार मदन जाधव, सरपंच ऋतुराज बिले यांच्यासह जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य उपस्थित होते.

सर्व संबंधित शासकीय अधिकारी, पदाधिकारी आणि ग्रामस्थांसोबत आढावा बैठक घेतली. नागरिकांनी मांडलेल्या अडचणी समजून घेत विभागनिहाय अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. प्रलंबित प्रश्नांना गती मिळावी, शासकीय योजनांचा लाभ पात्र नागरिकांपर्यंत पोहोचावा आदीसाठी संबंधित विभागांशी समन्वय ठेवून पुढील पाठपुरावा करण्यात येईल. पाठखळच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे आमदार आवताडे यांनी सांगितले.

पाठखळ ग्रामस्थांनी आरोग्य, शिक्षण, पाणीपुरवठा, रस्ते, महसूल, पशुसंवर्धन, ग्राम विकास आदी विषयांवर अडचणी मांडल्या. आमदार आवताडे यांनी प्रत्येक प्रश्नावर लक्ष देऊन संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ कार्यवाहीच्या सूचना दिल्या.



## भ्रष्ट कारभाराविरोधात शिवसैनिकांचा 'थाळीनाद'

### उपोषणाचा तिसरा दिवस, प्रशासन अजूनही सुस्त

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. ३ सप्टेंबर -**

मंगळवेढा तालुक्यातील विविध शासकीय कार्यालयांमध्ये वाढलेला भ्रष्टाचार आणि अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभाराविरोधात शिवसेना आणि युवासेना (उबाठा) पक्षाच्या वतीने सुरू असलेल्या बेमुदत धरणे व आमरण उपोषणाचा गुरुवारी (३ सप्टेंबर) तिसरा दिवस होता. प्रशासनाकडून अद्यापही मागण्यांची ठोस दखल न घेतल्याने आंदोलकांनी गुरुवारी मंगळवेढा प्रांत कार्यालयासमोर जोरदार थाळीनाद आंदोलन करून परिसर दणाणून सोडला.

अनोख्या आंदोलनामुळे प्रांत कार्यालय परिसरात नागरिकांची गर्दी जमली होती. आंदोलकांनी नगर रचना विभागाच्या संशयास्पद झोन दाखल्याची चौकशी करणे, महसूल सहाय्यक शिवाजी भोसले यांचे निलंबन, शिपाइ नागेश महामुनी यांची बदली, आणि मंडल अधिकारी धनंजय इंगोले यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्याची मागणी लावून धरली आहे. तसेच, न्यायालयाच्या निर्णयानुसार महादेव कोळी जात प्रमाणपत्र तात्काळ मंजूर करण्याची मागणीही केली आहे.

सलग तीन दिवस उपोषण सुरू असल्याने आंदोलकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होऊ लागला आहे. तरीही प्रशासन लेखी आश्वासन देण्यास टाळाटाळ करत असल्याने आंदोलक आपल्या मागण्यांवर ठाम आहेत. शुक्रवारी (४ सप्टेंबर) उपोषणाच्या चौथ्या दिवशी पक्ष संघटनेच्या वतीने आणखी तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडले जाईल, असा थेट इशारा दिला आहे

## 'सह्याद्री'त बी व एम.फार्मसी प्रथम फेरीसाठीचे ऑपशन फॉर्म चालू

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.३ सप्टेंबर-**

सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी, मेथवडे (ता.सांगोला) येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठीची बी.फार्मसी व एम.फार्मसी प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रियेत आतापर्यंत विद्यार्थी नोंदणी प्रक्रिया झाली आहे. प्रवेशसाठीची पहिल्या फेरीची प्रक्रिया ५ सप्टेंबरपासून चालू होणार असून त्याचे ऑपशन फॉर्म ५ ते ७ सप्टेंबर या दरम्यान भरायचे आहेत.

द्वितीय, तृतीय, चौथी फेरी व इन्स्टिट्यूट लेव्हल प्रवेश फेरी यांचे वेळापत्रक शासनाने जाहीर केले आहे. तरी बी व एम.फार्मसी प्रथम वर्ष प्रवेशप्रक्रिया नोंदणीकृत विद्यार्थ्यांनी वेळापत्रकानुसार प्रवेश प्रक्रियेत भाग घ्यावा असे आवाहन संस्थेच्या अध्यक्षा अनिता दिलीपकुमार इंगवले, विश्वस्त विश्वजीत दिलीपकुमार इंगवले यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी डॉ.एन.ए.तांबोळी (९४२२६४४८७६), प्रा.एस. एस.काळे (९८२२०४७२३६), प्रकाश पाटील (९८८१४३३६५८), पी.एस.लोखंडे (९८२३१०७३७१) यांना संपर्क करावा असे आवाहन प्राचार्य डॉ.मनोजकुमार पाटील यांनी केले आहे.

### प्रवेश प्रक्रिया संक्षिप्त वेळापत्रक

प्रथम प्रवेश फेरीसाठी ऑपशन फॉर्म भरणे- ५ ते ७ सप्टेंबर, प्रथम प्रवेश फेरी लिस्ट- १० सप्टेंबर, फेरीत नंबर लागलेल्या अर्जदार विद्यार्थ्यांनी कॉलेजच्या प्रवेशासाठी करावयाची प्रक्रिया- ११ ते १५ सप्टेंबर, द्वितीय प्रवेश फेरीसाठी ऑपशन फॉर्म भरणे- १७ ते १९ सप्टेंबर, तृतीय प्रवेश फेरीसाठी ऑपशन फॉर्म भरणे- २७ ते २९ सप्टेंबर, चौथ्या प्रवेश फेरीसाठी ऑपशन फॉर्म भरणे- ७ ते ९ ऑक्टोबर, इन्स्टिट्यूट लेव्हल ऑप्शन फॉर्म भरणे- ११ सप्टेंबर ते १४ ऑक्टोबर

## टेंभूर्णीत अण्णाभाऊ साठेंची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. ३ सप्टेंबर -**

टेंभुर्णीत मध्यवर्ती जयंती उत्सव मंडळ व सकल मातंग समाजातर्फे डॉ.अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त ३१ रोजी शहरातून प्रतिमेची सवाद्य मिरवणक काढली. अण्णाभाऊंच्या प्रतिमेस माजी आमदार संजय शिंदे व जिल्हा दुध संघाचे चेअरमन रणजित शिंदे, भाजप तालुकाध्यक्ष योगेश बोबडे, विठ्ठलराव शिंदे कारखान्याचे संचालक राजा थोरात, प्रमोद कुटे, सुरज देशमुख यांचे हस्ते पुष्पहार अर्पण करून मिरणुकीस सुरुवात झाली. मधुकर देशमुख, सुरेश लोंढे, अमोल जगदाळे, परमेश्वर खरात, सिद्राम आरडे, बाळासाहेब देशमुख, बंकट गायकवाड आदी उपस्थित होते.



## शिवाजी पॉलिटेक्निकमध्ये प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.३ सप्टेंबर-**

सांगोल्यातील शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ व इंडक्शन प्रोग्राम चे आयोजन संस्थाध्यक्ष बाबुराव गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष महादेव गायकवाड, सचिव अंकुश गायकवाड व प्राचार्य रणजित देशमुख उपस्थित होते. प्रस्तावनेत डॉ.रणजित देशमुख यांनी कार्यक्रमाचे उद्दिष्ट स्पष्ट करत मागील पंधरा वर्षांतील कॉलेजचा लेखाजोखा मांडला. त्यांनी टेकउत्सव, स्पंदन व कुरुक्षेत्र या वार्षिक उपक्रमांची ओळख करून दिली. विद्यार्थ्यांना शैक्षणिक तसेच सांस्कृतिक क्षेत्रात सक्रिय सहभागाचे आवाहन केले. कॉलेजमधील तक्रार निवारण समिती, अँटी रॅगिंग समिती, इंटरनल कंप्लेंट कमिटी यांची माहिती दिली. यावेळी प्रियांका देवकर, प्रगती वाघ, ऐश्वर्या यादव, सायली वाघमारे व संदीप केदार या नव प्रवेशित विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले.

मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागप्रमुख प्रा.संदीप बावचे यांनी आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ चांगले गुण मिळवणे पुरेसे नसून प्रत्यक्ष काम करताना उपयोगी पडणारे ज्ञान, कौशल्य, समस्या सोडविण्याची क्षमता आणि आत्मविश्वास विकसित करणे आवश्यक आहे असे स्पष्ट केले. महादेव गायकवाड यांनी विद्यार्थ्यांनी आपल्या कर्तृत्वाने पालकांचे, समाजाचे आणि कॉलेजचे नाव उज्ज्वल करावे असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रथम वर्ष विभाग प्रमुख प्रा.पोपट पवार यांनी केले. यावेळी सर्व विभाग प्रमुख, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

## श्री भगवंत मल्टीस्टेटच्या परंडा शाखेचा ९ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि. ३ सप्टेंबर-**

श्री भगवंत मल्टीस्टेट क्रेडिट को-ऑप. सोसायटी लि., बार्शी शाखा-परंडा यांच्यावतीने संस्थेचा ९ वा वर्धापन दिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला.

शासकीय विश्रामगृहासमोर असलेल्या परंडा शाखेच्या कार्यालयात या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रमाची सुरुवात शिवसेना युवा नेते विश्वजीत पाटील यांच्या हस्ते श्री भगवंताच्या प्रतिमेचे पूजन करुन केली. वर्धापन दिनाचे औचित्य साधून सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत सर्व सभासद, ग्राहक आणि हितचिंतकांसाठी चहापान व अल्पोपहाराच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

गेल्या ९ वर्षांच्या यशस्वी वाटचालीत श्री भगवंत मल्टीस्टेटने आपल्या विविध आकर्षक व पारदर्शक आर्थिक सेवांच्या माध्यमातून सभासद व ग्राहकांचा मोठा विश्वास संपादन केला आहे. या प्रगतीत सभासदांचे योगदान मोलाचे असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान उपस्थितांशी संवाद साधून संस्थेच्या आगामी योजना आणि भविष्यातील वाटचालीबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

सोहळ्यास परिसरातील राजकीय, सामाजिक व व्यावसायिक क्षेत्रातील मान्यवरांनी हजेरी लावून संस्थेला शुभेच्छा दिल्या. यामध्ये प्रामुख्याने शिवसेना युवा नेते विश्वजीत पाटील, माजी नगरसेवक रईस मुजावर, नगरसेवक सोमनाथ अलबत्ते, उस्मानाबाद जनता बँकेचे व्यवस्थापक संजय बिराजदार, शिवाजी देशमाने, खातेदार बागवान, इकबाल खलील, लक्ष्मण गायकवाड, संतोष भारती, गणेश पाटील, ॲड. तानाजी वाघमारे, प्रशांत पाटील, महावीर करळे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच संस्थेचे सचिव प्रदीप औसेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी मिलिंद कांबळे, वैराग शाखाधिकारी नवनाथ भोसले, पांगरी शाखाधिकारी अक्षय नलगे, परंडा शाखाधिकारी गणेश गायकवाड यांच्यासह इतर सर्व पदाधिकारी, कर्मचारी, खातेदार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# जि.प.स्थायी समितीच्या सभेत सदस्य आक्रमक; अधिकाऱ्यांना धरले धाऱ्यावर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ सप्टेंबर-**

जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीच्या गुरुवारी पार पडलेल्या सभेत विविध विभागांच्या कारभारावरून सदस्यांनी अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. सभेला अनुपस्थित राहणे, लोकप्रतिनिधींचे फोन न उचलणे आणि भेटीसाठी टाळाटाळ करणे या प्रकारांवर सदस्यांनी तीव्र संताप व्यक्त केला. ''सभेत चर्चा करूनही निर्णयांची अंमलबजावणी होत नसेल, तर दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करा, प्रशासनाने पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेऊन कामकाज करावे असा आक्रमक पवित्रा सदस्यांनी घेतला.




स्थायी समितीची सभा जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, उपाध्यक्ष इंद्रजीत पवार, सभागृह नेत्या रश्मी बागल, शिक्षण समितीच्या सभापती चेतनसिंह केदार-सावंत, कृषी समितीचे सभापती रामप्पा चिवडशेट्टी, महिला व बालकल्याण समिती सभापती अमृता वाघे, समाज कल्याण समितीच्या सभापती संस्कृती सातपुते, सदस्य पृथ्वीराज माने, शांभवी कल्याणशेट्टी, आदिनाथ देशमुख, बालाजी नरूटे, दादासाहेब लवटे, सविता उंबरजे, रमेश भांजे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर, समितीचे सचिव सूर्यकांत भुजबळ उपस्थित होते. सोमवार व गुरुवार अधिकाऱ्यांनी मुख्यालयात उपस्थित राहणे बंधनकारक करण्यात आले आहे असे असताना अधिकारी ठरलेल्या दिवशी मुख्यालयात उपस्थित राहत नाहीत. नियोजित सभेस ही अधिकारी दांडी मारत असतील आणि लोकप्रतिनिधींच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करत असतील तर याची गंभीर दखल घ्यावी. जि.प.सदस्यांना आपल्या मतदारसंघातील नागरी समस्या सोडवण्यासाठी अधिकाऱ्यांशी सातत्याने संपर्क साधावा लागतो. मात्र, काही अधिकारी फोन उचलत नाहीत आणि भेटीसाठी वेळही देत नाहीत, अशी तक्रार करण्यात आली.

## मराठा आंदोलनात शाळकरी मुलींनी दिल्या घोषणा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ सप्टेंबर-**

मराठा समाजाच्या विविध मागण्यांसाठी अंतरवाली सराटी येथे आमरण उपोषणाला बसलेले मनोज जरांगे-पाटील यांच्या समर्थनार्थ सोलापूर जिल्हा सकल मराठा समाजाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय येथे आंदोलन करण्यात आले. यात सहभागी झालेल्या शाळकरी मुलींनी दिलेल्या विविध घोषणांनी जिल्हाधिकारी कार्यालय दणाणून गेले होते.

जरांगे पाटील यांच्या प्रकृतीला काही धोका निर्माण झाल्यास मराठा समाज अधिक तीव्र आंदोलन करेल. शासनाच्या भूमिकेमुळे मराठा समाजामध्ये अस्वस्थता आणि नाराजी वाढत आहे. शासनाने मराठा समाजाच्या मागण्यांवर तातडीने निर्णय घेऊन प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

यावेळी माऊली पवार, ज्ञानेश्वर सपाटे, शिवाजी चापले, शिवाजी भोसले, मारुती सावंत, सुनील शेळके, दिनेश डोंगरे, सचिन तिकटे, अशोक भोसले, चंद्रकांत पात्रे, तानाजी माने, राहुल मन्नापुरे, रोहन हावळे, किरण देशमुख, सुरेश जगताप, जनार्दन चव्हाण आदी उपस्थित होते.

*चौकट.....

-जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांची संवेदनशीलता

शाळकरी मुलींनी निवेदन दिल्यानंतर स्वतः जिल्हाधिकारी उठून उभे राहिले. त्यांनी उपस्थित मुलींची संवाद साधून मी जिल्हाधिकारी या नात्याने तुम्हाला आणखी काय मदत करु शकतो हे आवर्जून सांगा असे सांगितले. त्याचवेळी मुलींना भविष्यात तुम्हाला काय बनायला आवडेल..! तुमची स्वप्न काय यावर विचारणा केली. तेव्हा उपस्थित मुलींनी मला खाकी वर्दी घालायला आवडेल, तर काहींनी नौदलात, आर्मीमध्ये, डॉक्टर, होण्याची इच्छा असल्याचे जिल्हाधिकारी यांना सांगितले.

## बापूजी नगरातील वादग्रस्त समाजमंदिर महापालिकेने घेतले ताब्यात

### 'जीजस गॉस्पेल सोसायटी'ला दिलेल्या नोटिशीनंतर कारवाई



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ सप्टेंबर-**

बापूजी नगर परिसरातील सोलापूर महानगरपालिकेच्या मालकीचे समाजमंदिर धार्मिक कार्यासाठी वापरून त्याचा गैरवापर होत असल्याच्या तक्रारीनंतर महापालिकेने कारवाई करीत संबंधित इमारत ताब्यात घेतली. 'जीजस गॉस्पेल सोसायटी'ला २४ तासांत समाजमंदिराचा ताबा सोडण्याची नोटीस देण्यात आली होती. मात्र, मुदतीत ताबा न दिल्याने भूमी व मालमत्ता विभाग आणि अतिक्रमणविरोधी पथकाने इमारत सील करून महापालिकेच्या ताब्यात घेतली आहे, अशी माहिती महापालिका अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांनी दिली.

हिंदू जनजागृती समितीने ३० जून २०२६ रोजी बापूजी नगर येथील समाजमंदिराचा बेकायदेशीरपणे चर्चसाठी वापर होत असल्याची तसेच धार्मिक तेढ निर्माण होत असल्याची तक्रार महापालिकेकडे केली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने उपलब्ध कागदपत्रे, नस्ती आणि तक्रारदारांची सुनावणी घेण्यात आली. महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांच्याकडे अहवाल सादर केला. या अहवालात समाजमंदिराचा वापर सामाजिक कार्याव्यतिरिक्त धार्मिक कार्यासाठी होत असल्याचे नमूद करण्यात आले.

संस्थेच्या वतीने १७ ऑगस्ट रोजी खुलासा सादर करण्यात आला. मात्र, या खुलाशास आवश्यक आणि योग्य पुरावे जोडलेले नसल्याने तो अमान्य करण्यात आला. याबाबत २५ ऑगस्ट रोजी आयुक्तांसमवेत चर्चा करण्यात आली. महापालिका आयुक्तांच्या मान्यतेने ३१ ऑगस्ट रोजी समाजमंदिर तातडीने ताब्यात घेण्याचे आदेश देण्यात आले. मुदतीत संस्थेकडून समाजमंदिराचा ताबा देण्यात न आल्याने बुधवारी दि. ३ सप्टेंबर रोजी भूमी व मालमत्ता विभागाचे पथक, अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे कर्मचारी आणि पोलिसांच्या उपस्थितीत कारवाई करण्यात आली.

**परस्पर सील तोडल्यास...**

महापालिकेने समाजमंदिराच्या ठिकाणी नोटीस लावून कोणालाही इमारतीचा वापर अथवा गैरवापर करू नये. परस्पर सील तोडून इमारत उघडण्याचा प्रयत्न झाल्यास संबंधितांविरुद्ध कठोर फौजदारी कारवाई करण्यात येईल, असा इशाराही दिला आहे.

**मुदत संपली असली तरी...**

हे समाजमंदिर पूर्वी एकमजली होते. त्यानंतर तत्कालीन आमदार यांच्या निधीतून दुसरा मजला बांधण्यात आला होता. इमारतीचे क्षेत्रफळ सुमारे ४९.९५ चौरस मीटर आहे. २००७ पासून विविध टप्प्यांत करार व मुदतवाढ देऊन 'जीजस गॉस्पेल सोसायटी'ला समाजमंदिर वापरासाठी देण्यात आले होते. २०१७ नंतर कराराची मुदत संपली असली तरी संस्थेकडून वापर सुरु होता आणि त्यासाठी भाडे आकारले जात होते.

## विद्यार्थ्यांच्या महत्त्वाच्या कागदपत्रांच्या सुरक्षिततेबाबत 'अभाविप'चे निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ सप्टेंबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये विद्यार्थ्यांच्या महत्त्वाच्या कागदपत्रांच्या स्वीकार व सुरक्षिततेबाबत अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, सोलापूर महानगरच्या वतीने मा. कुलगुरू प्रा.डॉ. प्रकाश महानवर यांना निवेदन देण्यात आले.

विद्यापीठातील विद्यार्थ्यांकडून विविध शैक्षणिक व प्रशासकीय कामांसाठी आवश्यक असलेली महत्त्वाची कागदपत्रे अधिकृत कार्यालयात जमा न करता शिक्षकांकडे ठेवली जात असल्याचे निदर्शनास आले आहे. विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रमाणपत्रे, गुणपत्रिका व इतर महत्त्वाची कागदपत्रे ही अत्यंत संवेदनशील स्वरूपाची असल्याने त्यांच्या सुरक्षिततेबाबत कोणतीही तडजोड होऊ नये, अशी मागणी करण्यात आली.

विद्यार्थ्यांची कागदपत्रे स्वीकारण्यासाठी विद्यापीठ प्रशासनाने अधिकृत कार्यालयीन व्यवस्था निर्माण करून सर्व कागदपत्रे कार्यालयातच स्वीकारावीत, त्यांची योग्य नोंद ठेवून सुरक्षित जतन करण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांच्या सुरक्षिततेची संपूर्ण जबाबदारी विद्यापीठ प्रशासनाने घ्यावी, अशीही मागणी यावेळी करण्यात आली.

यावेळी अभाविप सोलापूर महानगर मंत्री रविकांत चांभार, पश्चिम भाग नगर मंत्री राहुल बोरगाव, विद्यापीठ अध्यक्ष ओम गुरव तसेच अभाविपचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## सांगली बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या पुर्ननेमणूकीस रिझर्व्ह बँकेची मान्यता

**तभा वृत्तसेवा,**
**सांगली, दि.३ सप्टेंबर-**

सांगली अर्बन को-ऑप. बँक लि., सांगलीचे विद्यमान मुख्य कार्यकारी अधिकारी उल्हास वि. नायक हे गेली ११ वर्षापासून या पदावर कार्यरत आहेत. त्यांची मुदत माहे नोव्हेंबर २०२६ अखेर आहे. रिझर्व्ह बँकेच्या परिपत्रकाप्रमाणे बँकींग रेग्युलेशन ॲक्ट व रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया परिपत्रकास अनुसरुन मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या नेमणूकीसाठी रिझर्व्ह बँकेची मान्यता असणे आवश्यक आहे. याकरिता रिझर्व्ह बँकेने या पदासाठी निकष लागू केले आहेत.



या निकषाप्रमाणे पात्र असलेस तसेच बँकेकडील व बँकेचा पाहून रिझर्व्ह बँक याबाबत निर्णय घेत असते. नायक यांची यापूर्वी माहे नोव्हेंबर २०२६ अखेर ५ वर्षासाठी पुर्ननेमणूक केली होती. ती मुदत संपत असल्याने बँकेने त्यांच्या पुर्ननेमणूकीचा प्रस्ताव रिझर्व्ह बँकेस पाठविला होता. त्यास रिझर्व्ह बँकेने दिनांक १४/०८/२०२६ रोजीच्या पत्रान्वये माहे नोव्हेंबर २०३० अखेर पुर्ननेमणूकीस मान्यता दिली आहे.

रिझर्व्ह बँकेने नायक यांच्या पुर्ननेमणूकीसाठी दिलेली मंजूरी केवळ एका व्यक्तीचा सन्मान नसून बँकेने गणेशराव गाडगीळ यांच्या नेतृत्वाखाली संपुर्ण संचालक मंडळाने राबविलेले धोरण व गेले ११ वर्षात केलेली यशस्वी वाटचाल तसेच वित्तीय शिस्तीला मिळालेली एक प्रकारची पोहोच पावती आहे.

नायक यांना बँकींग मधील असलेल्या ४० वर्षाच्या प्रदिर्घ अनुभवामुळे आणि संचालक मंडळ व कर्मचारी वर्गाच्या समन्वयातून बँकेने जुना संचित तोटा पुर्णपणे निरंक करुन ऑडिटचा अ वर्ग दर्जा प्राप्त केला. त्यांच्या या मुदत वाढीस मान्यता मिळाल्यावर बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत अध्यक्ष श्रीपाद खिरे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.



**बाळकृष्ण...!**


कृष्णाष्टमीच्या अनुषंगाने आदर्श संग्राम निशाणदार या बालकाला भगवान श्रीकृष्णाची वेशभुषा परिधान करण्यात आले होते.


## हिंदवी परिवारातर्फे रविवारी शिव प्रबोधन पर्व

**सोलापूर, दि. ३ सप्टेंबर-**

येथील हिंदवी परिवारातर्फे रविवार, दि. ६ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजता चार हुतात्मा पुतळ्याजवळील खंदक बागेत शिव प्रबोधन पर्व आयोजित केले आहे, अशी माहिती हिंदवी परिवाराचे संस्थापक अध्यक्ष डॉ.शिवरत्न शेटे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

हिंदवी परिवाराच्या वतीने दरवर्षी पन्हाळा ते पावनखिंड पावसाळी पदभ्रमंती मोहीम आणि हिवाळी मोहिमेचे आयोजन करण्यात येते. हिंदवी परिवार सातत्याने व्यसनमुक्ती, राष्ट्रबांधणी, पर्यावरण संवर्धन आणि शिवविचार या विषयांवर कार्यरत आहे. दुर्गभ्रमंती, सामाजिक उपक्रम आणि युवकांमध्ये राष्ट्रप्रेमाची भावना निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम राबविले जातात. त्यापैकीच ''शिव प्रबोधन पर्व'' एक होय. हिंदवी परिवार ही राज्यव्यापी राजकारण विरहित संघटना असून सबंध महाराष्ट्र राज्यामध्ये पुढील ऑक्टोंबर महिन्यापासून छत्रपती शिवाजी महाराजांचे युवकांमध्ये विचार, स्वराज्याची संकल्पना, राष्ट्रभक्ती, शौर्य, सामाजिक बांधिलकी व संस्कार रुजविण्याच्या उद्देशाने शिव प्रबोधन पर्वचे आयोजन करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस सचिव डॉ.संभाजी भोसले, राज्य उपाध्यक्ष गुरुशांत धुत्तरगावकर, शहरप्रमुख तुषार आवताडे, ॲड.महेश जगताप, अभिजीत भडंगे आदी उपस्थित होते.



CMYK

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## मराठा समाजाच्या मागण्यांसाठी शिरूर अनंतपाळ कडकडीत बंद

तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. ३ सप्टेंबर : मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या सर्व मागण्या शासनाने मान्य कराव्यात, या मागणीसाठी गुरुवारी शिरूर अनंतपाळ तालुका व शहर कडकडीत बंद ठेवण्यात आले. या पुकारलेल्या बंदला स्थानिक व्यापाऱ्याकडून अतिशय उत्स्फूर्त असा प्रतिसाद भेटला.

बंदला नागरिक, युवक तसेच विविध कार्यकर्त्यांनी प्रतिसाद दिला. यावेळी तालुक्यातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. शासनाने समाजाच्या मागण्यांबाबत तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी भूमिका आंदोलकांनी मांडली.

दरम्यान, शिष्टमंडळाच्या वतीने तहसीलदार आणि डी.वाय.एस.पी. यांना निवेदन देण्यात आले. मागण्यांची गांभीर्याने दखल घेऊन त्यावर लवकरात लवकर निर्णय घ्यावा, अशी विनंती निवेदनातून करण्यात आली. याप्रसंगी शिरूर अनंतपाळ तालुक्यातील डॉ. प्रशांत पाटील सर, बालाजी जाधव सर, बाळासाहेब पाटील, अमर माझे पाटील, धोंडीराम शिंदे, अशा अनेक मराठा व मराठा हित चिंतक कार्यकर्त्याकडून याप्रसंगी उपस्थिती लावण्यात आली.

आंदोलना दरम्यान कार्यकर्त्यांनी शांततेच्या मार्गाने आपल्या भावना व्यक्त करत शासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा याप्रसंगी सर्वांकडून व्यक्त करण्यात आली.



# विविध वृत्त.....

## एसटी बसमध्ये सवलतीचे मॅन्युअल तिकीट ३० सप्टेंबर पर्यंत ग्राह्य धरणार

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ३ सप्टेंबर : एसटी महामंडळात मे. ईबिक्स कॅश कंपनीमार्फत तिकीट व ई-तिकीट प्रणालीची कार्यवाही करण्यात येत आहे. या प्रणालीमध्ये काही तांत्रिक त्रुटी आणि अडचणी येत असल्याने त्यात आवश्यक सुधारणा करण्याचे काम सध्या वेगाने सुरू आहे. यानुसार, ज्या ज्येष्ठ नागरिक व महिला प्रवाशांनी नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड (एनसीएमसी कार्ड) साठी नोंदणी केली आहे, परंतु त्यांना अद्याप प्रत्यक्ष कार्ड प्राप्त झाले नाही, अशा लाभार्थ्यांकडे एनसीएमसी कार्ड नोंदणीची पावती असल्यास ती ग्राह्य धरली जाणार आहे. अशा पावतीच्या आधारे प्रवाशांना ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत सवलतीच्या मॅन्युअल तिकिटावर प्रवास करण्याची विशेष मुभा देण्यात आली आहे.

याशिवाय, ०१ सप्टेंबर २०२६ पासून एनसीएमसी कार्ड अनिवार्य करण्यात आले होते. त्यामुळे प्रवाशांच्या वाढत्या संख्येमुळे आणि एनसीएमसी कार्ड कार्यप्रणालीच्या सर्व्हरवर अचानक वाढलेल्या 'हिट्स'मुळे ज्येष्ठ नागरिक व महिला प्रवाशांना प्रवासादरम्यान सवलतीचे तिकीट मिळण्यात तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या होत्या. यावर तात्काळ उपाययोजना म्हणून ज्या ज्येष्ठ नागरिक व महिला प्रवाशांकडे एनसीएमसी कार्ड उपलब्ध आहे, त्यांना देखील सर्व्हरच्या समस्येमुळे अडचण येत असल्यास १४ सप्टेंबर २०२६ पर्यंत मॅन्युअल तिकिटावर सवलतीचा प्रवास करण्यास परवानगी देण्यात आली आहे, अशी माहिती महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे विभागीय नियंत्रक यांनी दिली आहे.

## अवैध सावकारीविरोधात उदगीरमध्ये सहकारी विभागाकडून झडती

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ३ सप्टेंबर : लातूर जिल्ह्यातील उदगीर शहर व तालुक्यातील अवैध सावकारीविरोधात सहकार विभागाने आज धडक कारवाई केली. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांच्या मार्गदर्शनाखाली पाच ठिकाणी झडती घेण्यात आली. या कार्यवाहीत आर्थिक व्यवहारांशी संबंधित दस्तऐवज, कागदपत्रे, रोकड, खाती, कोरे धनादेश, कोरे स्टॅम्प, स्थावर मालमत्तेचे खरेदीखत व इसारचिठ्ठ्या आढळून आल्या आहेत. याप्रकरणी पुढील चौकशीची कार्यवाही सुरू करण्यात आली असल्याचे उदगीरचे सहकारी संस्थेचे सहायक निबंधक महेश कच्छवे यांनी कळवले आहे.

जिल्ह्यातील अवैध सावकारीविरोधात नागरिकांनी संबंधित तालुका सहायक निबंधक, सहकारी संस्था किंवा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांच्या कार्यालयाकडे तक्रारी दाखल कराव्यात, असे आवाहनही श्री. कच्छवे यांनी केले आहे.

उदगीर शहर व तालुक्यातील अवैध सावकारी व्यवसायाबाबत सहकार विभागाकडे तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यानुसार महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १६ अंतर्गत २ सप्टेंबर २०२६ रोजी पाच ठिकाणी झडतीची कार्यवाही करण्यात आली आहे. यामध्ये साधू रामचंद्र कांबळे, पप्पू ऊर्फ सतीश पांढरे व राजीव बिरादार, फिरोजखान नामुरखान पठाण, अमोल अशोक कोल्हेकर आणि विक्रम माने यांच्या ठिकाणांचा समावेश आहे. संबंधित ठिकाणे उदगीर शहर तसेच तालुक्यातील विविध भागातील आहेत. कारवाईसाठी सहकार विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे पथक नियुक्त करण्यात आले होते. झडती पथकांना संरक्षणासाठी उदगीर शहर व ग्रामीण पोलिस ठाण्यांतील पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांची मदत घेण्यात आली. ही कार्यवाही जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, जिल्हा पोलिस अधीक्षक अमोल तांबे, सहकारी संस्थेचे लातूर विभागीय सहनिबंधक नानासाहेब चव्हाण, जिल्हा निबंधक (सावकारी) व्ही.एल. पोतंगले, उदगीर तहसीलदार राम बोरगावकरयांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली, असेही त्यांनी कळवले आहे.

# मराठा आरक्षणासाठी लातूर बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद; कडकडीत बंद

## बाजारपेठा, शाळा-महाविद्यालये बंद; मोटारसायकल रॅलीतून आरक्षणासाठी एल्गार

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ३ सप्टेंबर : मराठा आरक्षणासाठी अंतरवली सराटी येथे सुरू असलेल्या मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला समर्थन देण्यासाठी गुरुवारी (दि.३) सकल मराठा समाजाने पुकारलेल्या बंदला लातूर शहरासह जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शहरातील सर्व बाजारपेठा कडकडीत बंद राहिल्याने नेहमी गजबजणारे लातूर अक्षरशः ठप्प झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.






गुरुवारी सकाळी सकल मराठा समाजबांधव छत्रपती शिवाजी महाराज चौकात एकत्र आले. प्रारंभी त्यांनी छत्रपती शिवरायांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले त्यानंतर शिवरायांचा जयजयकार तसेच मनोज जरांगे पाटील आणि मराठा आरक्षणाच्या समर्थनार्थ घोषणांनी परिसर दणाणून सोडला. शहरात मोटारसायकल रॅली काढून शहरातील नागरिक, व्यापारी आणि व्यावसायिकांना बंदमध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले.

अत्यावश्यक सेवा वगळता शाळा, महाविद्यालये, शिकवणी वर्ग, आणि खासगी आस्थापनांनीही बंदला प्रतिसाद दिला. बंदची पूर्वकल्पना असल्याने शहरातील शाळा भरल्या नव्हत्या. रस्त्यांवर स्कूल बसही दिसल्या नाहीत. महाविद्यालयांमध्येही शुकशुकाट होता. एरवी गजबजणाऱ्या आडत बाजारातही सामसूम होती. बाजार समितीत सौदे निघू शकले नाहीत.

दरम्यान दुपारी समाजबांधव मोठ्या संख्येत छत्रपती शिवाजी महाराज चौकात पुन्हा एकत्र आले व त्यांनी तेथे बैठक देत आपल्या भावनांना वाट करुन दिली. मराठा समाजाची परिस्थिती अत्यंत बिकट झाली असून अनेकांना संसाराचा गाडा चालवणे कठीण झाले आहे. पाल्यांचे शिक्षण, मुलींची लग्ने, वाढते कर्ज, नापिकी आणि व्यवस्थेकडून होणारी अडवणूक यामुळे समाज खचला आहे. हे चित्र बदलण्यासाठी आणि सन्मानाने जगण्यासाठी आरक्षणाशिवाय पर्याय नाही. त्यामुळे सरकारने मराठा समाजाला आरक्षण द्यावे अशी मागणी केली.

मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती खालावत चालली आहे. आता शासनाने अंत पाहू नये, अन्यथा समाजाचा संयम सुटेल व यापुढे मंत्री,लोकप्रतिनीधींच्या घरासमोरही आंदोलने होतील, असा इशाराही यावेळी त्यांनी दिला.

दरम्यान बंद शांततेत पार पडावा यासाठी सकल मराठा समाजाच्या वतीने योग्य नियोजन करण्यात आले होते. पोलिस प्रशासनानेही शहरभर मोठा बंदोबस्त तैनात केला होता. अपर पोलिस अधीक्षक मंगेश चव्हाण आणि शहर उपविभागीय पोलिस अधिकारी समीरसिंह साळवे, पोलीस निरीक्षक संतोष पाटील, पीएसआय नागरगोजे हे छत्रपती शिवाजी महाराज चौकात उपस्थित होते.

सर्वांच्या सहकार्याबद्दल मानली कृतज्ञता शहरासह जिल्ह्यात सर्व स्तरांतून मिळालेल्या प्रतिसादामुळे बंद शंभर टक्के यशस्वी झाल्याचा दावा सकल मराठा समाजाने केला. बंदला सहकार्य करणाऱ्या व्यापारी, व्यावसायिक, शैक्षणिक संस्था नागरिक अशा सर्वांप्रति समाजबांधवांनी कृतज्ञता व्यक्त केली.

## लातूर विभागात ग्राहकांच्या तक्रारी निवारणासाठी आता दरमहा 'डाक अदालत'

तभा वृत्तसेवा

लातूर, दि.३ सप्टेंबर : भारतीय डाक विभागामार्फत ग्राहकांच्या तक्रारी व समस्या अधिक प्रभावीपणे आणि वेगाने सोडविण्यासाठी सप्टेंबर २०२६ पासून दरमहा 'डाक अदालत' आयोजित करण्यात येणार आहे. ग्राहकांचा अधिकाधिक सहभाग सुनिश्र्चित करण्यासाठी ही डाक अदालत विभागीय, प्रादेशिक व मंडळ (सर्कल) स्तरावर अनुक्रमे दर महिन्याच्या पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या आठवड्यात आयोजित करण्यात येईल.

या उपक्रमांतर्गत ग्राहकांना आवश्यकतेनुसार व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारेही डाक अदालतीत सहभागी होता येणार आहे. ग्राहकांना आपली तक्रार अथवा गाऱ्हाणी टपालाद्वारे, प्रत्यक्ष भेटून किंवा ीश्रिर्ीी.ीरहसारळश्र.ले या ई-मेल आयडीवर सादर करता येतील. प्राप्त तक्रारींची संबंधित कार्यालयाकडून सविस्तर तपासणी करण्यात येईल आणि शक्य असल्यास डाक अदालतीच्या वेळीच तक्रारींचे निराकरण केले जाईल, तसेच डाक अदालतीत प्राप्त सर्व तक्रारींचे १४ दिवसांच्या आत अनिवार्यपणे निराकरण करण्यात येईल.

विभागीय स्तरावरील डाक अदालत प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी आयोजित केली जाणार असून, पहिल्या सोमवारी शासकीय सुट्टी असल्यास त्यानंतरच्या पुढील कामकाजाच्या दिवशी सकाळी ११ ते १२ वाजेपर्यंत डाक अधीक्षक कार्यालय, लातूर विभाग, लातूर प्रधान डाकघर इमारत, दुसरा मजला, महात्मा गांधी चौक, लातूर-४१३५१२ येथे ही अदालत पार पडेल. डाक अदालतीच्या दिवशी ग्राहकांना आवश्यक ते सर्व सहकार्य मिळावे, तसेच व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे होणाऱ्या कार्यवाहीचे योग्य समन्वय साधण्यासाठी लातूर मुख्य डाकघर येथे जनसंपर्क अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

## जात पडताळणी इमारतीवर चढून मराठा आंदोलकांचे आंदोलन

### जात वैधता , एसईबीसी प्रमाणपत्रे तातडीने देण्याची मागणी; चार तासांनंतर लेखी हमीने आंदोलन समाप्त

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ३ सप्टेंबर : येथील जात पडताळणी कार्यालयात कुणबी तसेच एसईबीसी प्रमाणपत्रासाठी मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांची अडवणूक व आर्थिक पिळवणूक होत असल्याचा आरोप करीत हे प्रकार बंद करावेत व मराठा विद्यार्थ्यांना विनाव्यत्यय प्रमाणपत्र दयावेत, या मागणीसाठी चार मराठा आंदोलकांनी चक्क येथील मार्केड यार्ड परिसरात असलेल्या समाजिक न्याय भवनाच्या इमारतीवर चढून



बुधवारी (दि.२) लक्षवेधी आंदोलन केले. तब्बल चार तास सुरू असलेले हे आंदोलन संबधीत विभागाने मागण्यांची पुर्तता करण्याची लेखी हमी दिल्यानंतर मागे घेण्यात आले.

बुधवारी कोणालाही कल्पना न देता बालाजी जाधव, खंडू लोखंडे, आदित्य जगदाळे व वैशाली लोंढे हे चार आंदोलक मार्केट यार्ड परिसरातील सामाजिक न्याय भवनाच्या इमारतीवर चढले. त्यांनी मराठा आरक्षणाच्या समर्थनार्थ जोरदार घोषणाबाजी करीत मराठा विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र मिळविताना होत असलेल्या अडचणींचा निषेध केला. अचानक झालेल्या

या आंदोलनामुळे परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.गांधी चौक पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक रेजीतवाड व त्यांचे सहकारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी आंदोलकांना खाली उतरण्याची विनंती केली. चर्चेतून प्रश्र्न मार्गी लागतील, असे पोलिसांनी सांगितले. मात्र, मागण्या मान्य होईपर्यंत खाली उतरणार नसल्याची भूमिका आंदोलकांनी घेतली. मराठा समाजातील विद्यार्थ्यांच्या कुणबी प्रमाणपत्रांच्या जात वैधता प्रमाणपत्रांचा निपटारा लवकरात लवकर करावा, कोणताही आर्थिक व्यवहार न करता पारदर्शकपणे जात वैधता प्रमाणपत्रे द्यावीत, विद्यार्थ्यांना प्राव्हिजनल (तात्पुरती) कागदपत्रे तातडीने उपलब्ध करून द्यावीत तसेच एसईबीसी जात वैधता प्रमाणपत्रे तत्काळ देण्यात यावीत, अशा प्रमुख मागण्या आंदोलकांनी केल्या.दरम्यान, मराठा समाजाचे वैजनाथ जाधव, ड. उदय गवारे यांच्यासह अन्य पदाधिकारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी आंदोलकांशी चर्चा करून

संबंधित अधिकारी मागण्यांबाबत लेखी पत्र देतील, असे सांगितले. त्यानंतर समितीने सकारात्मक भूमिका घेत वरील चारही मागण्यांच्या अनुषंगाने नियमानुसार तात्काळ योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, अशी लेखी हमी दिली.

त्यानंतर आंदोलक इमारतीवरून खाली उतरले.

## श्री श्री रविशंकर विद्यालयात 'विश्व संस्कृत दिन' उत्साहात

### तीन दिवसांत संस्कृत गायन, श्लोक पठण, सुभाषिते आणि भाषण स्पर्धा; २३५ विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ३ सप्टेंबर : भारतीय संस्कृती, तत्त्वज्ञान आणि ज्ञानपरंपरेचा अमूल्य ठेवा असलेल्या संस्कृत भाषेप्रती विद्यार्थ्यांमध्ये रुची निर्माण व्हावी, संस्कृतचे शास्त्रीय व सांस्कृतिक महत्त्व नव्या पिढीपर्यंत पोहोचावे आणि या समृद्ध भाषेच्या जतनासाठी विद्यार्थ्यांनी पुढे यावे, या उद्देशाने श्री श्री रविशंकर प्राथमिक इंग्लिश स्कूल आणि संस्कृत विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने श्री श्री रविशंकर विद्यालयात विश्र्व संस्कृत दिनानिमित्त तीन दिवस विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांमध्ये तब्बल २३५ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.




या निमित्ताने विद्यालयात संस्कृत गायन, भाषण, श्र्लोक वाचन, अध्ययन, सुभाषिते, अष्टके आणि संस्कृत गीत अशा विविध उपक्रम व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी संस्कृत भाषेतील श्र्लोक, सुभाषिते आणि गीतांचे प्रभावी सादरीकरण करून भारतीय संस्कृतीतील संस्कृतचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमाचे उद्घाटन राजर्षी शाहू महाविद्यालयातील संस्कृत विभागाचे प्रमुख प्रा. विनय गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे कार्यकारी समन्वयक आशिष कोळगे होते. यावेळी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका विनया मराठे, उपमुख्याध्यापिका विशाखा पाटील, संस्कृत विभागप्रमुख आचार्य शेरसिंह शास्त्री आणि संस्कृत अध्यापक अभिजीत भड यांची प्रमुख उपस्थिती होती.

स्पर्धा दोन गटांमध्ये घेण्यात आल्या. पहिल्या गटातील संस्कृत गायन स्पर्धेत श्रावणी संतोष कदम हिने प्रथम, अर्जुन लालासाहेब कदम आणि कुमारी दिव्यश्री शेखर मुठे यांनी द्वितीय, तर कुमारी तनुश्री मुंडे, कुमारी श्रेया कदम आणि कुमारी गौरवी अजित कदम यांनी तृतीय क्रमांक पटकावला. उत्तेजनार्थ योग्यश्री गुट्टे आणि स्वरांजली डोळस यांना पारितोषिक देण्यात आले.

भाषण स्पर्धेत गौरवी अजित कदम हिने प्रथम, ईश्र्वरी भीमराव यादव हिने द्वितीय, तर प्रांजली कैलास गायकवाड हिने तृतीय क्रमांक मिळविला. पार्थ लक्ष्मीकांत कुलकर्णी याला उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले.

दुसऱ्या गटातील स्पर्धांमध्ये आरवी रामगोडी हिने प्रथम, रचना जांभळे हिने द्वितीय आणि आयुष भारती याने तृतीय क्रमांक पटकावला. उत्कृष्ट सादरीकरणाबद्दल अंकिता कांबळे, समृद्धी चव्हाण, कुमारी आराध्या वाकडे, अंकिता काळे, आनंदी पाटील, समर्थ गोडी आणि नवीन अकबर शेख यांना विशेष पारितोषिकांनी गौरविण्यात आले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करताना संस्कृत ही केवळ एक प्राचीन भाषा नसून भारताच्या ज्ञान, विज्ञान, तत्त्वज्ञान, साहित्य आणि संस्कृतीचा मूलभूत आधार असल्याचे नमूद केले. वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत, भगवद्गीता, आयुर्वेद, योग आणि विविध शास्त्रग्रंथांच्या माध्यमातून संस्कृतने जगाला समृद्ध ज्ञानपरंपरा दिली आहे. संस्कृत भाषेतील व्याकरणशुद्धता, शब्दसंपदा आणि विचारांची सुसूत्र मांडणी यामुळे आधुनिक काळातही या भाषेच्या अभ्यासाचे महत्त्व कायम असल्याचे मान्यवरांनी सांगितले.

विश्र्व संस्कृत दिनासारखे उपक्रम विद्यार्थ्यांना संस्कृत भाषेची ओळख करून देण्याबरोबरच तिच्याबद्दलची भीती दूर करून भाषेप्रती प्रेम आणि जिव्हाळा निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करतात. संस्कृतचे अध्ययन केवळ गुण मिळविण्यासाठी नव्हे, तर भारतीय संस्कृती आणि ज्ञानपरंपरेचे मूळ समजून घेण्यासाठी आवश्यक आहे, असेही यावेळी सांगण्यात आले.

स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी दाखविलेल्या उत्साहाचे आणि उत्कृष्ट सादरीकरणाचे उपस्थित मान्यवरांनी विशेष कौतुक केले. संस्कृत भाषा ही भूतकाळाचा केवळ वारसा नसून वर्तमानाला समृद्ध करणारी आणि भविष्याला दिशा देणारी ज्ञानभाषा आहे, असा संदेश या तीन दिवसीय कार्यक्रमातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थाचालक, मुख्याध्यापिका, उपमुख्याध्यापिका, संस्कृत विभाग, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## दत्तक विधान सूचना सादर करण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ३ सप्टेंबर : महिला व बाल विकास मंत्रालयांतर्गत कार्यरत असलेल्या 'सेंट्रल अडॉप्शन रिसोर्स ऑथॉरिटी' (सीएआरए - उ-ठ-) कडून दत्तक विधान प्रक्रियेचे नियमन करणाऱ्या कायदेशीर चौकटीला अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने आणि त्यासंबंधी उद्भवणाऱ्या विविध कायदेशीर, प्रक्रियात्मक तसेच अंमलबजावणीविषयक मुद्द्यांचे योग्य निराकरण करण्यासाठी 'दत्तक विधान नियमन, २०२२' (-वेींळेप ठशसीश्रींळेपी, २०२२) चा आढावा घेतला जात आहे.

या पार्श्र्वभूमीवर 'दत्तक विधान नियमन, २०२२' मधील ज्या तरतुदींमध्ये सुधारणा करणे, नवीन तरतूद समाविष्ट करणे, विद्यमान नियमांत बदल करणे किंवा एखादी तरतूद वगळणे आवश्यक वाटत असेल, त्याबाबत सकारण अभिप्राय व सूचना सर्वसामान्य जनता, संबंधित संस्था आणि भागधारकांकडून मागविण्यात येत आहेत.

## जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ औसा ,उजनीत कडकडीत बंद




तभा वृत्तसेवा

औसा दि.३ सप्टेंबर : महाराष्ट्रातील मराठा समाजाच्या आरक्षणासाठी प्रलंबित असलेल्या मागण्या तातडीने मान्य कराव्यात यासाठी संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांनी गेल्या सहा दिवसांपासून अंतरवाली सराटी येथे आमरण उपोषण आंदोलन सुरू केले आहे. औसा येथे जवळपास दोन तास व तालुक्यातील उजनी येथील व्यापाऱ्यांनी व्यवसाय जवळपास दिवसभर तर शाळा, विद्यालयांनी बंद ठेवून गुरूवार दि.३ रोजी या आंदोलनास समर्थन दिले.

मराठा समाजाच्या प्रलंबित मागण्यांसाठी संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील गेल्या सहा दिवसांपासून अंतरवाली सराटी येथे आमरण उपोषणास करीत आहेत.मराठा समाजाच्या न्याय्य व प्रलंबित मागण्यांसाठी सुरू असलेल्या या आंदोलनामुळे संपूर्ण महाराष्ट्रातील मराठा समाजामध्ये तीव्र चिंता निर्माण झाली आहे. शासनाने या आंदोलनाची गांभीर्याने दखल घेऊन मराठा समाजाच्या प्रलंबित मागण्या लवकरात लवकर पूर्ण कराव्यात. तसेच मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती लक्षात घेऊन त्यांचे आमरण उपोषण तातडीने सोडविण्यासाठी सकारात्मक निर्णय घ्यावा.असे यावेळी दिलेल्या निवेदनातून म्हटले आहे.

संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाच्या समर्थनार्थ आज लातूर जिल्हा बंदची हाक समाजाच्या वतीने देण्यात आली होती.या हाकेला साद घालून औसा शहरातील व्यावसायिकांनी दोन तासांहून अधिक काळ व्यवसाय बंद करून समर्थन दिले. उजनी येथील समर्थकांनी सकाळी बंदची हाक दिली.त्यामुळे किराणा ,कापड, पान टपरी व इतर व्यापाऱ्यांनी आज सकाळपासून व्यवसाय कडकडीत बंद ठेवून या आंदोलनास पाठिंबा दिला. सकाळच्या सत्रात शाळा, विद्यालय सुरू झाली. मात्र दुपारी १२ वा. सुमारास सुट्टी देऊन शाळा विद्यार्थ्यांनी या आंदोलनात सहभाग घेतला.उजनीत नामदेव जाधव यांच्या नेतृत्वाखाली व दीपक वळके यांच्या मार्गदर्शनाखाली आंदोलन करण्यात आले.औसा, उजनी येथील आंदोलनात मराठा समाज बांधवांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता.या आंदोलनात वैद्यकीय दवाखाने, मेडिकल वगळण्यात आले होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## संक्षिप्त...

### वलांडी येथे भांडण सोडविणाऱ्या तरुणास लोखंडी रॉडने मारहाण

तभा वृत्तसेवा

वलांडी दि. ३ सप्टेंबर : वलांडी येथील सरकारी दवाखान्यासमोर सुरू असलेले पती-पत्नीचे भांडण सोडविण्याचा प्रयत्न करणाऱ्या तरुणास शिवीगाळ करून लोखंडी रॉडने मारहाण केल्याची घटना सोमवारी (दि. ३१ ऑगस्ट) दुपारी घडली. याप्रकरणी देवणी पोलिस ठाण्यात मंगळवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गोपाळ राम चव्हाण (वय २७, रा. वलांडी, हल्ली धनेगाव) हे वलांडी येथील सरकारी दवाखान्यासमोरून जात असताना बबन लक्ष्मण साळुंके यांचे त्यांच्या पत्नीसोबत भांडण सुरू असल्याचे दिसले. भांडण का करता, असे म्हणत गोपाळ चव्हाण यांनी त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला.

याचा राग आल्याने आरोपीने, 'तू आम्हाला सांगणारा कोण आहेस?' असे म्हणत गोपाळ चव्हाण यांना शिवीगाळ केली. त्यानंतर घरासमोर पडलेल्या लोखंडी रॉडने त्यांच्या पाठीवर, उजव्या हाताच्या बुब्यावर, डोक्यावर, डाव्या डोळ्याजवळ तसेच डाव्या कानशिलावर मारून दुखापत केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

घटनेनंतर जखमी गोपाळ चव्हाण यांच्या फिर्यादी जबाबावरून देवणी पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक २९४/२०२६, भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ११८ (१) व ३५२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा मंगळवारी रात्री ८.१५ वाजता दाखल करण्यात आला.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार मोहन केंद्रे करीत आहेत.

### शासनाकडून परिषदेला आठ दिवसांत अहवाल सादर करण्याचे आदेश

# आ. अभिमन्यू पवार यांचा टेबल टू टेबल पाठपुरावा वंचित विशेष शिक्षकांच्या वेतनश्रेणीचा विषय लागणार मार्गी



तभा वृत्तसेवा

औसा दि. ३ सप्टेंबर :राज्यातील ३१०५विशेष शिक्षकांना शासन सेवेत कायम करण्यासाठी औसा तालुक्याचे आमदार अभिमन्यू पवार यांनी अत्यंत मोलाची भुमिका बजावली होती.मात्र यांतील लातूर,वर्धा, गडचिरोली, हिंगोली,बीड या जिल्ह्यातील कांहीं शिक्षकांची शिक्षण अर्हता उत्ताठ,उक्रुड आणि एसेस असल्याने या शिक्षकांना इतर शिक्षकांप्रमाणे लाभ मिळाला नाही.अथक परिश्रमांनंतर पुन्हा एकदा आ.पवार यांनी टेबल टू टेबल पाठपुरावा केला.त्यामुळे शासनाने राज्य शिक्षण परिषदेला ८दिवसात अहवाल सादर करण्याचे आदेश दिले.असून पाच जिल्ह्यांतील वंचित विशेष शिक्षकांना उशीराने का होईना न्याय मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

राज्यातील ३१०५ विशेष शिक्षकांना शासन सेवेत कायम करण्यासाठी औसा तालुक्याचे आमदार अभिमन्यू पवार यांनी विशेष प्रयत्नातून अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्यांच्या प्रयत्नातून गेल्या वर्षापासून या विशेष शिक्षकांना नियमित वेतनश्रेणी लागू होऊन वेतन सुरू झाले होते.मात्र याच ३१०५ विशेष शिक्षकांमधील लातूर, वर्धा, गडचिरोली, हिंगोली आणि बीड जिल्ह्यातील काही विशेष शिक्षकांची व्यावसायिक अर्हता उत्ताठ, उक्रुड आणि एउएडए असल्याने त्यांना इतरांप्रमाणे वेतनश्रेणीचा लाभ मिळाला नव्हता.यासाठी वंचित विशेष शिक्षक मागील दीड वर्षांपासून विविध माध्यमातून प्रयत्न करीत होते परंतु याबाबत त्यांना कुठेच आशेचा किरण दिसत नव्हता. त्यामुळे या वंचित विशेष शिक्षकांना आणि त्यांच्या कुटुंबीयाना नैराश्य आले होते.

हा विषय औसा तालुक्यातील विशेष शिक्षक सचिन वळके पाटील यांना लक्षात आल्यानंतर त्यांनी आमदार अभिमन्यू पवार यांची भेट घेऊन त्यांच्यासमोर प्रश्र्न मांडला. त्यानंतर आमदार पवार यांनी याची तात्काळ दखल घेत शिक्षण संचालक कार्यालय, पुणे व मंत्रालय, मुंबई येथील शालेय शिक्षण विभागात पत्र व्यवहार करून प्रत्यक्ष टेबल टू टेबल पाठपुरावा सुरू केला.

गेल्या महिन्यात आमदार पवार यांनी विशेष शिक्षक संघटनेचे नेते सचिन वळके यांच्यासह शालेय शिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांची भेट घेऊन अन्यायग्रस्त शिक्षकांना न्याय मिळवून देण्याची पत्राद्वारे मागणी केली होती. त्यावेळी प्रधान सचिवांनी लवकरच विषय निकाली काढण्याचे आश्र्वासन त्यांना दिले होते.

मंगळवार दि.१रोजी विशेष शिक्षक संघटनेचे सचिन वळके व मारूती महाराज साखर कारखान्याचे संचालक रमेश वळके पाटील यांनी मुंबई येथे आमदार पवार यांची भेट घेऊन या विषयाची सद्यस्थिती अवगत केली. त्यानंतर आमदार पवार यांनी क्षणाचाही विलंब न करता संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करून आग्रही मागणी लावून धरली.

या पाठपुराव्यानंतर प्रशासकीय पातळीवर महत्त्वपूर्ण हालचाली झाल्या असून शासनाने महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परिषदेकडे ८ दिवसात अभिप्राय सादर करण्याचे आदेश दिले आहेत.त्यानंतर संबंधित जिल्हा परिषदांना याबाबत सकारात्मक पत्र निर्गमित होणार असून वंचित विशेष शिक्षकांनाही अखेर न्याय मिळणार आहे. शासनाच्या या निर्णयामुळे विशेष शिक्षक वर्गात समाधान व्यक्त होत असून वंचित असलेल्याना फार मोठा आशेचा किरण मिळाला असल्याचे मत संघटनेचे नेते सचिन वळके पाटील यांनी व्यक्त केले आहे.

## तरुणांनी रिल स्टार होण्याऐवजी रियल स्टार व्हावे : प्रा. तरंगे



तभा वृत्तसेवा

निलंगा दि. ३ सप्टेंबर : विद्यार्थ्यांनी शालेय व महाविद्यालयीन जीवनात विविध विषयाचा सखोल अभ्यास करून ज्ञान कौशल्याच्या जोरावर रिल स्टार होण्याऐवजी रियल स्टार होवून आपल्या भावी जीवनाचा पाया भक्कम करावा असे आवाहन श्री कोचींग क्लासेसचे संचालक प्रा डॉ गजेंद्र तरंगे यांनी केले.

निलंगा येथील महाराष्ट्र महाविद्यालयाच्या स्पर्धा परीक्षा व करियर मार्गदर्शन कक्ष आणि रसायनशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्पर्धा परीक्षा व करिअर मार्गदर्शन कार्यशाळेत ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा डॉ भास्कर गायकवाड होते तर प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष प्रा डॉ. गजेंद्र तरंगे हे उपस्थित होते.*

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ गजेंद्र तरंगे म्हणाले की, सध्याच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी तयारी करून उतरणे आवश्यक आहे. ही तयारी शालेय व महाविद्यालयीन जीवनातच केली पाहिजे. पदवीचे शिक्षण घेत असतानाच स्पर्धा परीक्षेची मुलभूत तयारी केली पाहिजे.भाषाविषय, गणित, बुध्दिमत्ता चाचणी हे प्रमुख विषय स्पर्धा परीक्षेचा महत्त्वाचा भाग आहेत. शालेय अभ्यासक्रम व पदवीच्या विषयांचा अभ्यास व्यवस्थित केल्यास स्पर्धा परीक्षेचा पाया भक्कम होतो.

म्हणून सध्याच्या युगात तरुणांनी *रिल स्टार होण्याऐवजी रियल स्टार होण्याचा* प्रयत्न केला पाहिजे. त्यासाठी इंग्रजी बाराखडीतील उ अक्षरा पासून तयार होणारे उेपषळवशपलश, उेपीळीेंशपलू, उेर्ाािपळलरींळेप, उीळींळलरश्र ींहळपज्ञळपस, उेीरसश, उहरीरलींशी हे शब्द खऱ्या अर्थाने यशाचे मार्ग दाखवणारे आहेत. विद्यार्थ्यांनी याचे अनुकरण करून सकारात्मक बाबी लक्षात घ्याव्यात असे मत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप करताना उपप्राचार्य डॉ. भास्कर गायकवाड म्हणाले की, विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाने उपलब्ध करून दिलेल्या अभ्यास पुरक वातावरणाचा फायदा भविष्यासाठी करून घ्यावा असे आवाहन याप्रसंगी केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्पर्धा परीक्षा व करिअर मार्गदर्शन कक्षाचे समन्वयक डॉ सुभाष बेंजलवार यांनी केले. तर आभार रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ रामेश हिरेमठ यांनी केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थीनी अंकिता मुळे, प्रिती रांजणे, अंकिता आगलावे यांनी केले. या कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी स्पर्धा परीक्षा व करिअर मार्गदर्शन कक्षाचे सदस्य डॉ. शेषराव देवनाळकर, डॉ. नरेश पिनमकर, प्रा. एस. एस. बदनाळे, प्रा.सुदर्शन पाटील रसायनशास्त्र विभागाचे प्रा. धनराज बिराजदार, प्रा अजीत सगरे, वाणिज्य विभागाचे प्रा. संदिप सुर्यवंशी इत्यादींनी परिश्रम घेतले. या कार्यशाळेत मोठ्या संख्येने विद्यार्थी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### निलंगा कडकडीत बंद....

# मराठा समाजातर्फे प्रशासनाला विविध मागण्यांचे निवेदन सादर



तभा वृत्तसेवा

निलंगा दि. ३ सप्टेंबर : मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांनी आंतरवली सराटी येथे सुरू केलेल्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी

मराठा समाजाच्या वतीने पुकारण्यात आलेल्या निलंगा बंदला शहरासह तालुक्यात मोठा प्रतिसाद मिळाला असून निलंगा शहरासह पूर्ण तालुक्यातील सर्व आस्थापने कडकडीत बंद ठेवण्यात आले होते. व्यापाऱ्यांनीही आपली दुकाने उत्स्फूर्तपणे कडकडीत बंद ठेवून बंदला पाठिंबा दिला. यावेळी निलंगा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे सकल मराठा समाज निलंगा तालुक्याच्या वतीने मुख्य चौकात रास्ता रोको आंदोलन करण्यात आले व मनोजदादा जरांगे पाटील यांच्या मागण्या तात्काळ मान्य करा अशा घोषणा देण्यात आले या घोषणांनी शहर परिसर दुमदुमला त्यानंतर उपविभागीय अधिकारी यांना विविध मागण्यांचे निवेदन सकल मराठा समाजाच्या वतीने देण्यात आले. निलंगा शहरासह तालुक्यामध्ये अत्यावश्यक सुविधा वगळता सर्व आस्थापणे कडकडीत बंद ठेवून या बंदमध्ये सहभागी झाले होते. दुपारनंतर सकल मराठा समाजाच्या वतीने उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देऊन सर्व स्थापने चालू ठेवण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. यामध्ये सर्व शासकीय कार्यालय शासकीय व खाजगी रुग्णालय शासकीय व खाजगी वाहने दुचाकी चार चाकी पेट्रोल पंप यासह अत्यावश्यक सुविधा वगळता सर्व आस्थापणे बंद ठेवण्यात आले होते.

जात पडताळणी रद्द करा, हैद्राबाद गॅजेट लागू करा, शिंदे समितीला मुद्दतवाढ द्या, सातारा कोल्हापूर गॅजेट तीन महिन्यात लागू करा, ५८ लाख कुणबी प्रणामपत्र वाटप करा, हैद्राबाद गॅजेटनुसार प्रमाणपत्र वाटप करा, मंत्रालयात स्वातंत्र मराठा कक्षाचे कार्यालय सुरु करा, सर्व मागण्यांचे आता जीअर काढा नंतर अंमलबजावणी करा, मात्र या सर्व गॅजेटनुसार किमान चार प्रमाणपत्र वाटप करा याशिवाय उपोषण सोडणार नाही. मराठा समाजाच्या आरक्षणा संदर्भात विविध प्रलंबित मागण्या मान्य करण्यासाठी मराठा युद्ध मनोजदादा जरांगे पाटील हे अंतरवली सराठी येथे गेल्या सात दिवसापासून आमरण उपोषण करीत आहेत तरी सरकार जाणीवपूर्वक चालढकल करत असून खोटे आश्र्वासने देऊन मनोजदादा जरांगे पाटील यांचे सोडवण्याचा प्रयत्न करत आहे. सरकार कुठलेही ठोस पावले उचलत नसून मुख्य विषयाला बगल देऊन सरकार बेजबाबदारपणे वागत आहे. या उपोषणामध्ये मनोजदादा जरांगे पाटील यांच्या जीवाला जर काही बरे वाईट झाले तर येणाऱ्या काळामध्ये आंदोलन चिघळेल असे बोलले जात आहे. त्यामुळे संघर्ष योद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांच्या मागण्या मान्य करून उपोषण लवकरात लवकर सोडवावे अशा मागणीचे निवेदन उपविभागीय अधिकारी यांना सकल मराठा समाजाच्या वतीने देण्यात आले. यावेळी सकल मराठा समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### १५ सप्टेंबरपर्यंत ऑनलाईन अर्ज करावेत

लातूर, दि.३ सप्टेंबर : राज्य शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती (भटक्या जाती क वगळून) आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी शासनाने सन २०२६-२७ साठी सावित्रीबाई फुले आधार योजना व पंडीत दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना सरू केलेली आहे. प्रति जिल्हा ६०० विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात येणार आहे

## मनरेगा प्रकरणात सरपंच अपात्र ,दहा जणांवर कारवाई करून ३२.३३ लाखांची रक्कम व्याजासह वसुलीचे विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांचे निर्देश

तभा.वृत्तसेवा

चाकूर, दि. ३ सप्टेंबर : चाकूर तालुक्यातील कलकोटी ग्रामपंचायतीच्या मनरेगा कामातील वित्तीय अनियमितता प्रकरणी विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी मोठी कारवाई केली आहे. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम ३९ (१) अन्वये कलकोटीचे सरपंच परमेश्र्वर तुकाराम कांबळे यांना सरपंच पदावरून अपात्र घोषित करण्यात आले असून ३१ ऑगस्ट रोजी हा अंतिम आदेश पारित झाला आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद लातूर यांनी २७ जानेवारी २०२६ रोजी विभागीय आयुक्तांकडे याबाबत प्रस्ताव सादर केला होता. त्यावर चौकशी होऊन २९ एप्रिल २०२६ रोजी चौकशी अहवाल सादर करण्यात आला.

मनरेगा अंतर्गत कलकोटी येथे मंजूर ४१ गायगोठा कामांची कोणतीही खातरजमा न करता, ग्रामपंचायतीच्या खात्यावर जमा झालेली कुशल मजुरीची रक्कम रुपये ३२ लाख ३३ हजार ३७० थेट केदार ट्रेडर्स, अंजनसोंडा (बु.) या पुरवठादाराला देण्यात आल्याचे चौकशीत निष्पन्न झाले. यात वित्तीय अनियमितता व कर्तव्यात कसूर झाल्याचे आयुक्तांनी आदेशात नमूद केले आहे.

या प्रकरणी दयानंद मच्छिंद्र मुर्के आणि सुधाकर राम कोंपले यांनी संबंधित प्रकरणाविषयी तक्रार दाखल केली होती.

सरपंचांच्या वतीने सदर गायगोठ्यांची कामे ग्रामसभेतून प्रस्तावित नसतानाही, ६ मार्च २०२४ रोजी पंचायत समितीकडून रक्कम ग्रामपंचायत खात्यावर जमा झाली आणि वरिष्ठांच्या दबावामुळे ती केदार ट्रेडर्सला द्यावी लागल्याचा युक्तिवाद करण्यात आला. मात्र, अनियमितता आढळल्यास ती वरिष्ठ कार्यालयाच्या निदर्शनास आणणे अपेक्षित असताना तसे न केल्याने कर्तव्य पार पाडण्यात दुर्लक्ष झाल्याचे निरीक्षण विभागीय आयुक्तांनी नोंदवले.

इतर नऊ जणांवरही कारवाईचे आदेश- या प्रकरणात तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी यांना यापूर्वीच निलंबित करण्यात आले असून, संबंधित तांत्रिक सहाय्यकाची सेवा संपुष्टात आणण्यात आली आहे.

याशिवाय गट विकास अधिकारी, पशुधन विकास अधिकारी, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी, कनिष्ठ व सहाय्यक लेखाधिकारी, लिपिक, डाटा एंट्री ऑपरेटर आणि नरेगा कक्षातील वरिष्ठ सहाय्यक यांच्याविरुद्धही मनरेगा नियमानुसार कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

दरम्यान, गैरव्यवहाराची संपूर्ण रक्कम जबाबदार व्यक्तींकडून व्याजासह वसूल करून शासन खाती जमा करण्याचे आणि केलेल्या कारवाईचा अहवाल विभागीय आयुक्त कार्यालयास सादर करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

### कारवाईच्या धास्तीने दुचाकीस्वार झाले शिस्तबद्ध; कासारशिरसी पोलिसांच्या हेल्मेट मोहिमेला यश

# सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रताप गर्जे यांच्या मार्गदर्शनाखाली हेल्मेट वापराबाबत कडक कारवाई



तभा वृत्तसेवा

कासारशिरसी, दि.३ सप्टेंबर : दुचाकी चालविताना हेल्मेट वापरणे हे केवळ वाहतूक नियमांचे पालन नसून स्वतः च्या जीविताच्या सुरक्षेसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. मात्र अनेक दुचाकीस्वारांकडून हेल्मेट वापराबाबत दुर्लक्ष केले जात असल्याचे चित्र दिसून येते. या पार्श्र्वभूमीवर कासारशिरसी पोलिसांनी हेल्मेट वापराबाबत कडक भूमिका घेत कारवाई सुरू केली आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रताप गर्जे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या या मोहिमेमुळे दुचाकीस्वारांमध्ये चांगलीच जागृती निर्माण झाली असून, अनेक चालकांनी हेल्मेट वापरण्यास सुरुवात केली आहे.

कासारशिरसी पोलिस ठाण्याच्या हद्दीत हेल्मेट वापराबाबत पोलिसांकडून सातत्याने जनजागृती तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येत आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रताप गर्जे यांनी हेल्मेट वापराबाबत कडक भूमिका घेतली असून, दुचाकी चालविताना हेल्मेट न वापरणाऱ्या चालकांवर नियमानुसार कारवाई केली जात आहे.

पोलिसांच्या या कारवाईमुळे आतापर्यंत हेल्मेटशिवाय दुचाकी चालविणाऱ्या अनेक चालकांनी आता स्वतःहून हेल्मेटचा वापर सुरू केला आहे. त्यामुळे कासारशिरसी परिसरात वाहतूक नियमांचे पालन करण्याचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येत आहे.

अपघात टाळण्यासाठी हेल्मेट ठरते जीवनरक्षक

दुचाकी अपघाताच्या वेळी डोक्याला गंभीर दुखापत होण्याची शक्यता मोठी असते. अशा वेळी दर्जेदार हेल्मेटचा वापर जीव वाचविण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतो. त्यामुळे पोलिसांची ही कारवाई केवळ दंडात्मक स्वरूपाची न राहता दुचाकीस्वारांच्या सुरक्षिततेसाठी आणि वाहतूक शिस्तीसाठी महत्त्वपूर्ण पाऊल ठरत आहे.

'पोलिसांच्या कारवाईच्या भीतीपेक्षा आपल्या कुटुंबासाठी आणि स्वतःच्या जीवासाठी हेल्मेट वापरा,' असा संदेश या मोहिमेतून दिला जात आहे. नागरिकांनी पोलिसांच्या कारवाईची वाट न पाहता दुचाकीवरून प्रवास करताना नियमितपणे हेल्मेट वापरावे, असे आवाहन सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रताप गर्जे यांनी केले आहे.

कासारशिरसी पोलिसांच्या या मोहिमेमुळे 'हेल्मेट वापरा, सुरक्षित प्रवास करा' हा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचत असून, वाहतूक नियमांच्या पालनाला चालना मिळत आहे. पोलिसांच्या या उपक्रमाचे नागरिकांकडूनही स्वागत होत आहे.

**हेल्मेट घाला, जीवन वाचवा!**

हेल्मेट पोलिसांच्या भीतीने नव्हे,
तर आपल्या कुटुंबाच्या प्रेमासाठी घाला.
रस्त्यावरचा अपघात सांगून होत नाही; पण हेल्मेट आपल्या जीवाचे रक्षण नक्कीच करू शकते.
घरी तुमची वाट पाहणारे आपले माणसे आहेत त्यामुळे दुचाकी चालवताना हेल्मेटचा वापर करा आणि सुरक्षित घरी परत या.
प्रताप गर्जे
सहाय्यक पोलिस निरीक्षक, कासार शिरसी

### हरकती व सूचना सादर करण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि.३ सप्टेंबर : महिला व बाल विकास मंत्रालयांतर्गत कार्यरत असलेल्या 'सेंट्रल अडॉप्शन रिसोर्स ऑथॉरिटी' (सीएआरए - उ-ठ-) कडून दत्तक विधान प्रक्रियेचे नियमन करणाऱ्या कायदेशीर चौकटीला अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने आणि त्यासंबंधी उद्भवणाऱ्या विविध कायदेशीर, प्रक्रियात्मक तसेच अंमलबजावणीविषयक मुद्द्यांचे योग्य निराकरण करण्यासाठी 'दत्तक विधान नियमन, २०२२' (-वेींळेप ठशर्सीश्रींळेपी, २०२२) चा आढावा घेतला जात आहे. या पार्श्र्वभूमीवर 'दत्तक विधान नियमन, २०२२' मधील ज्या तरतुदींमध्ये सुधारणा करणे, नवीन तरतूद समाविष्ट करणे, विद्यमान नियमांत बदल करणे किंवा एखादी तरतूद वगळणे आवश्यक वाटत असेल, त्याबाबत सकारण अभिप्राय व सूचना सर्वसामान्य जनता, संबंधित संस्था आणि भागधारकांकडून मागविण्यात येत आहेत.

## नमो उद्यानाची जागा बदलण्याच्या मागणीसाठी सुरू असलेल्या उपोषणस्थळी तहसीलदार, मुख्याधिकाऱ्यांची भेट




तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. ३ सप्टेंबर : नमो उद्यानाची प्रस्तावित जागा बदलण्यात यावी, या प्रमुख मागणीसाठी बसवेश्र्वर चौक येथे सुरू असलेल्या आमरण उपोषणस्थळी तहसीलदार किशोर यादव,नगरपंचायतीचे मुख्याधिकारी संदेश सालके तसेच संबंधित प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी भेट देऊन उपोषणकर्त्यांशी चर्चा केली.

यावेळी प्रशासनाच्या वतीने उपोषणकर्त्यांच्या मागण्या जाणून घेत त्यावर चर्चा करण्यात आली. नमो उद्यानाच्या जागेबाबत प्रशासनाकडून योग्य तो विचार करण्यात येईल, अशी भूमिका अधिकाऱ्यांनी मांडली. तसेच उपोषणकर्ते जेष्ठ नगरसेवक उमाकांत देवंगरे सुरू केलेले आमरण उपोषण मागे घ्यावे, अशी विनंती तहसीलदार व मुख्याधिकाऱ्यांनी केली.

दरम्यान, नमो उद्यानाची जागा नागरिकांच्या सोयीच्या व सुरक्षित ठिकाणी बदलण्यात यावी, अशी मागणी देवंगरे यांनी ठामपणे मांडली. प्रशासनाने मागण्यांबाबत ठोस निर्णय घ्यावा, अशी भूमिका यावेळी व्यक्त करण्यात आली.

उपोषणस्थळी प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिकांची उपस्थिती होती. प्रशासन व उपोषणकर्त्यांमध्ये झालेल्या चर्चेनंतर पुढील निर्णयाकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## सोन्याचे बिस्कीट देण्याच्या आमिषाने महिलेचे दागिने लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ सप्टेंबर -**

तुळजापूर : सोन्याचे बिस्कीट देण्याचे आमिष दाखवून एका ६० वर्षीय महिलेची ११ ग्रॅम वजनाची सोन्याची दागिने घेऊन तिच्या हातात सोन्यासारखे दिसणारे बनावट बिस्कीट देत फसवणूक केल्याची घटना तुळजापूर शहरात घडली.

धामनगाव (ता. बार्शी, जि. सोलापूर) येथील निलाबाई चंद्रकांत चौगुले या १ सप्टेंबर रोजी सकाळी सव्वाअकराच्या सुमारास तुळजापूर येथील दिपक चौकाजवळ, शिंदे हॉटेलच्या पाठीमागे असताना दोन अनोळखी इसमांनी त्यांच्याशी संपर्क साधला. 'तुम्हाला सोन्याचे बिस्कीट देतो, त्याबदल्यात कानातील दागिने द्या,' असे सांगून त्यांनी चौगुले यांचा विश्वास संपादन केला.

त्यांच्या बोलण्यावर विश्वास ठेवून चौगुले यांनी ११ ग्रॅम वजनाचे सुमारे ६५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने काढून दिले. त्यानंतर दोघांनी त्यांच्या हातात सोन्यासारखे दिसणारे बनावट बिस्कीट देऊन तेथून पसार झाले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर चौगुले यांनी तुळजापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांकडून आरोपींचा शोध सुरू आहे.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

# मेडिकल कॉलेजच्या जागेचा प्रश्न अखेर मार्गी

**उर्वरित ३.०५ हेक्टर जमीन हस्तांतरित करण्याचा निर्णय...** **४३५ कोटींच्या प्रकल्पाला मिळणार गती...**




**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ सप्टेंबर -**

धाराशिव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या उभारणीसाठी आवश्यक असलेल्या जागेचा दीर्घकाळ प्रलंबित असलेला प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. जलसंपदा विभागाच्या ताब्यातील उर्वरित ३.०५ हेक्टर जमीन महसूल खात्याकडे हस्तांतरित करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय महायुती सरकारने ३ सप्टेंबर रोजी घेतला आहे. त्यामुळे धाराशिव येथे अद्ययावत वैद्यकीय शिक्षण संकुल उभारण्याचा मार्ग मोकळा झाला असून, प्रकल्पाच्या प्रत्यक्ष कामाला आता गती मिळण्याची शक्यता आहे, अशी माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली.

धाराशिव-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या एकूण ११.६३ हेक्टर जागेपैकी ५.३० हेक्टर जमीन यापूर्वीच वैद्यकीय शिक्षण विभागाच्या ताब्यात देण्यात आली आहे. त्याचबरोबर जलसंपदा विभागाच्या सिंचन वसाहतीतील जमीनही वैद्यकीय महाविद्यालयासाठी उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया सुरू होती.

२७ ऑक्टोबर २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार जलसंपदा विभागाच्या वसाहतीमधील ६.०५ हेक्टरपैकी तीन हेक्टर जमीन वैद्यकीय महाविद्यालयासाठी देण्याचा निर्णय झाला होता. त्यानंतर ८ ऑगस्ट २०२४ रोजी झालेल्या बैठकीत संबंधित जमीन जिल्हाधिकाऱ्यांकडे हस्तांतरित करून ती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी कायमस्वरूपी देण्याच्या सूचना करण्यात आल्या होत्या. त्यानुसार गट क्रमांक ३६७/१, ३६७/२ आणि ३६७/३ मधील तीन हेक्टर जमीन बांधकामासह यापूर्वीच कायमस्वरूपी हस्तांतरित करण्यात आली आहे.

### ४३५ कोटींच्या निधीची यापूर्वीच मंजुरी

धाराशिव जिल्ह्यातील नागरिकांना आधुनिक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या या प्रकल्पासाठी महायुती सरकारने यापूर्वीच ४३५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. आता जागेचा प्रश्न निकाली निघाल्याने अद्ययावत वैद्यकीय शिक्षण संकुलाच्या उभारणीला गती मिळणार आहे.

मात्र, महाविद्यालयाच्या व्यापक उभारणीसाठी आणखी ३.०५ हेक्टर जागेची आवश्यकता होती. ही उर्वरित जमीन आता शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी कायमस्वरूपी व विनामूल्य हस्तांतरित करण्याच्या प्रक्रियेला मान्यता देण्यात आली आहे. याच शासन निर्णयाद्वारे यापूर्वी हस्तांतरित केलेल्या तीन हेक्टर जमिनीच्या विनामूल्य हस्तांतरणासही मान्यता देण्यात आली आहे.

महसूल व वन विभागाच्या आदेशानंतर प्रत्यक्ष जमीन वाटपासाठी निश्चित भूभागाचे आरेखन गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाच्या सल्ल्याने जिल्हाधिकारी निश्चित करणार आहेत. त्यानंतर मोजणी करून जमीन हस्तांतरणाची पुढील कार्यवाही केली जाणार असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले.

# कळंबमध्ये विद्यापीठस्तरीय युवक महोत्सव उत्साहात; ४४ महाविद्यालयांतील ४५७ युवा कलावंतांचा सहभाग



**तभा वृत्तसेवा**
**खामसवाडी, दि.३ सप्टेंबर -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या धाराशिव जिल्हा युवक महोत्सवाचे आयोजन कळंब येथील शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयात उत्साहात करण्यात आले. महोत्सवाचे उद्घाटन आमदार बसवराज पाटील यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विजय फुलारी होते.

ज्ञान प्रसारक मंडळ, येरमाळा संस्थेच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त तसेच शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर गुरुजी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त महाविद्यालयाने युवक महोत्सवाचे यजमानपद स्वीकारले. जिल्ह्यातील ४४ महाविद्यालयांतील ४५७ युवा कलावंतांनी विविध कला प्रकारांत सहभाग नोंदविला. चार स्वतंत्र रंगमंचांवर विविध स्पर्धा रंगल्या.

'सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर : तरुणाईला दिशा देणारी की दिशाभूल करणारी?' या विषयावरील वैचारिक जुगलबंदीने लक्ष वेधले. तसेच विद्यार्थ्यांनी 'बळीराजाची कृषक गाथा' सादर करत शेतकऱ्यांच्या समस्यांना वाचा फोडली. रांगोळी स्पर्धेतून विद्यार्थ्यांची कल्पकता व सामाजिक जाणीव दिसून आली. दुसऱ्या दिवशी सामूहिक नृत्य, गायन आदी स्पर्धा घेण्यात आल्या.

युवक महोत्सवातून विद्यार्थ्यांच्या कला, संस्कृती व सुप्त गुणांना व्यासपीठ मिळाले. महोत्सवात कळंबमधील विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षक, पत्रकार व नागरिकांनीही सहभाग नोंदविला.

# देणगीच्या नावाखाली संस्थेच्या नावाचा गैरवापर; दोघांविरुद्ध गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ सप्टेंबर -**

सामाजिक संस्थेच्या नावाचा वापर करून सोशल मीडियाच्या माध्यमातून देणगी जमा करताना संस्थेच्या अधिकृत बँक खात्याऐवजी वैयक्तिक बँक खात्यांचा वापर केल्याप्रकरणी दोन जणांविरुद्ध धाराशिव शहर पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अस्लम चांदपाशा शेख (रा. खाजा नगर, धाराशिव) आणि स्टुडंट इस्लामिक ऑर्गनायझेशन (एसआयओ) धाराशिवचे सदस्य निहाल सिकंदर शेख (रा. सुलतानपुरा, येडशी रोड, धाराशिव) यांनी संगनमत करून ८ मार्च २०२५ ते २ सप्टेंबर २०२६ या कालावधीत संस्थेच्या सोशल मीडिया अकाउंटचा वापर केल्याचा आरोप आहे.

संस्थेच्या नावाने देणगी देण्याचे आवाहन करून तसेच जकात देण्याचे आमिष दाखवून नागरिकांचा विश्वास संपादन करण्यात आला. त्यानंतर संस्थेच्या अधिकृत बँक खात्यावर देणगी जमा न करता, विविध मोबाईल क्रमांकांशी संबंधित यूपीआय आयडी, क्यूआर कोड तसेच सोशल मीडियावर प्रसारित केलेल्या संपर्क क्रमांकांच्या माध्यमातून निधी स्वतःच्या वैयक्तिक बँक खात्यांमध्ये जमा केल्याचे तक्रारीत नमूद आहे.




याप्रकरणी दहशतवाद विरोधी पथक, छत्रपती संभाजीनगर युनिटच्या धाराशिव कॅम्पमधील फयाजोद्दीन गयासोद्दीन काझी (वय ४९) यांनी २ सप्टेंबर रोजी धाराशिव शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यावरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# उमरगा शहर कडकडीत बंद; मराठा आरक्षण आंदोलनाला पाठिंबा

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.३ सप्टेंबर -**

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षण आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी सकल मराठा समाजाच्या वतीने गुरुवारी उमरगा शहर कडकडीत बंद ठेवण्यात आले. सकाळी छत्रपती शिवाजी महाराज चौकात समाजबांधव मोठ्या संख्येने जमले. यावेळी जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा देत राष्ट्रीय महामार्गावरून दुचाकी रॅली काढण्यात आली.



बंदला प्रतिसाद देत मुख्य बाजारपेठेसह छत्रपती शिवाजी महाराज चौक, आरोग्यनगर, इंदिरा चौक व राष्ट्रीय महामार्गालगतची दुकाने बंद ठेवण्यात आली. बससेवाही दुपारपर्यंत बंद राहिल्याने लातूर व धाराशिवच्या फेऱ्यांवर परिणाम झाला. पुणे-मुंबईकडे जाणाऱ्या लांब पल्ल्याच्या बस उशिराने सोडण्यात आल्या. शहरातील शाळा-महाविद्यालयेही बंद होती.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करून आंदोलनाला सुरुवात करण्यात आली. आमदार प्रविण स्वामी यांनीही जरांगे पाटील यांच्या उपोषणाला व उमरगा बंदला पाठिंबा दिला. अत्यावश्यक सेवा वगळता संपूर्ण शहर बंद असून आंदोलन शांततेत पार पडले.

### ३.५५ लाखांचा तडजोड शुल्क वसूल

**धाराशिव, दि.३ सप्टेंबर -**

शहर वाहतूक शाखा व संबंधित पोलीस ठाण्यांनी २ सप्टेंबर रोजी मोटार वाहन कायदा व नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात धडक कारवाई केली. या मोहिमेत कारवाया करण्यात आल्या असून ३ लाख ५५ हजार ५०० रुपयांचे तडजोड शुल्क वसूल करण्यात आले.

# नळदुर्गचा गणेशोत्सव डीजेमुक्त साजरा करा : पोलीस अधीक्षक रीतु खोकर




**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३ सप्टेंबर -**

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नळदुर्ग पोलीस ठाण्याच्या वतीने शांतता समितीची बैठक घेण्यात आली. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक रीतु खोकर यांनी गणेश मंडळांनी डीजेला फाटा देऊन पारंपरिक वाद्यांच्या साथीने गणेशोत्सव साजरा करावा, असे आवाहन केले.

गणेश मंडळांनी पोलीस प्रशासनाच्या नियमांचे पालन करावे, रक्तदान शिबिरे, वृक्षलागवड, पाणी बचत तसेच गरजू नागरिकांना मदतीसारखे सामाजिक उपक्रम राबवावेत, असेही त्यांनी सांगितले. यंदापासून 'एक गणपती, एक पोलीस' हा उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

कायदा व सुव्यवस्था बिघडविणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचा इशाराही त्यांनी दिला.

नगराध्यक्ष बसवराज धरणे यांनी गणेश विसर्जन मार्गावरील रस्त्यांची दुरुस्ती व अतिक्रमणे हटविण्याची कार्यवाही करण्यात येईल, असे सांगितले.

बैठकीस उपविभागीय पोलीस अधिकारी मनोहर पाटील, मुख्याधिकारी रामकृष्ण जाधवर, पोलीस निरीक्षक रविंद्र गायकवाड यांच्यासह गणेश मंडळांचे पदाधिकारी, नागरिक व पत्रकार उपस्थित होते.

# पावसाच्या खंडाने खरीप संकटात; आठवडाभरात जिल्हास्तरीय नुकसान अहवाल

### आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या सूचनेची प्रशासनाकडून दखल...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ सप्टेंबर -**

जिल्ह्यात पावसाने मोठा खंड दिल्याने खरीप पिकांवर गंभीर परिणाम झाला असून, नुकसानीची शास्त्रीय व वस्तुनिष्ठ पाहणी करून अहवाल सादर करण्याच्या आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या सूचनेची जिल्हा प्रशासनाने दखल घेतली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी महसूल यंत्रणेला पत्र काढून तातडीने पिकांची पाहणी करून नुकसान अहवाल लवकरात लवकर सादर करण्याचे आदेश दिले आहेत. जिल्हास्तरीय अहवाल आठवडाभरात अपेक्षित आहे.



पावसातील खंडामुळे जिल्ह्यातील खरीप पिकांची सद्यस्थिती, झालेल्या नुकसानीची तीव्रता तसेच संभाव्य उत्पादनातील घट याची प्रत्यक्ष पाहणी करण्यात येणार आहे. या पाहणीतून नुकसानीचे प्रमाण निश्चित केले जाणार असून, नुकसान ३३ टक्क्यांपेक्षा अधिक असल्याचे अहवालातून स्पष्ट झाल्यास केंद्र शासनाच्या राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या निकषांनुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळण्याचा मार्ग मोकळा होण्याची शक्यता आहे.

त्यामुळे प्रशासनाकडून तयार करण्यात येणाऱ्या या वस्तुनिष्ठ अहवालाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या सूचनेनुसार जिल्हाधिकाऱ्यांनी महसूल यंत्रणेला तातडीने कार्यवाहीचे आदेश दिल्याने खरीप नुकसानीचा अहवाल वेळेत शासनाकडे सादर होऊन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळण्याची अपेक्षा आहे. यासाठी आपला सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे.

दरम्यान, पीक कापणी प्रयोगासाठी जिल्ह्यातील प्रत्येक महसूल मंडळात प्रत्येक पिकासाठी १२ प्लॉट निश्चित करण्यात आले आहेत. या प्लॉटची माहिती संबंधित कृषी अधिकाऱ्यांकडे उपलब्ध आहे. नुकसानग्रस्त पिकांची काढणी करताना या निश्चित प्लॉटचा विचार करणे आवश्यक आहे.

निश्चित केलेल्या प्लॉटवरील पीक प्रयोग होण्यापूर्वीच पीक काढून टाकल्यास संबंधित प्लॉटबाबत 'निरंक' अशी नोंद होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रत्यक्षात नुकसान झालेले असतानाही पीक कापणी प्रयोग न झाल्याने नुकसानभरपाईच्या प्रक्रियेत अडथळा निर्माण होऊ शकतो.

त्यामुळे शेतकऱ्यांनी पीक काढण्यापूर्वी गावातील अथवा मंडळातील कृषी अधिकाऱ्यांशी संपर्क साधून पीक कापणी प्रयोगासाठी निश्चित केलेल्या प्लॉटची माहिती घ्यावी आणि प्रयोग होईपर्यंत संबंधित प्लॉटवरील पीक काढू नये, असे आवाहन आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केले आहे.


# महाडीबीटीच्या तांत्रिक अडचणींनी विद्यार्थी त्रस्त

### शिष्यवृत्ती अर्जासाठी पोर्टल सुरळीत करा...

### मुदतवाढीसह जिल्हास्तरीय हेल्पडेस्क सुरू करण्याची डॉ. प्रतापसिंह पाटील यांची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ सप्टेंबर -**

जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना विविध शासकीय शिष्यवृत्ती योजनांचा लाभ मिळण्यासाठी महाडीबीटी २.० पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करावे लागत आहेत. मात्र, सध्या पोर्टलवर वारंवार तांत्रिक अडचणी निर्माण होत असल्याने विद्यार्थ्यांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. या समस्या तातडीने दूर करून पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळावा, अशी मागणी डॉ. प्रतापसिंह वेदप्रकाश पाटील यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.



महाडीबीटी २.० पोर्टलवर अर्ज भरताना सर्व्हर डाऊन होणे, पोर्टल हँग होणे, ओटीपी व पासवर्डसंदर्भातील अडचणी, आवश्यक कागदपत्रे अपलोड न होणे तसेच अर्ज अंतिमरित्या सबमिट करताना तांत्रिक त्रुटी येणे, अशा विविध समस्यांना विद्यार्थ्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे अर्ज वेळेत पूर्ण होत नसून, अंतिम मुदतीपूर्वी अर्ज सादर करता येईल की नाही, याबाबत विद्यार्थ्यांमध्ये चिंता निर्माण झाली आहे.

विशेषतः ग्रामीण भागातील, आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांना या तांत्रिक अडचणींचा मोठा फटका बसत आहे. शिष्यवृत्ती ही विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी महत्त्वाची आर्थिक मदत असल्याने केवळ पोर्टलमधील तांत्रिक त्रुटींमुळे पात्र विद्यार्थी या लाभापासून वंचित राहू नयेत, अशी भूमिका डॉ. पाटील यांनी मांडली.

### मुदतवाढीसह विशेष हेल्पडेस्कची मागणी

जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित विभाग आणि महाडीबीटी प्रशासनाशी तातडीने संपर्क साधून पोर्टलवरील तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी कार्यवाही करावी. तसेच विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी जिल्हास्तरावर विशेष हेल्पडेस्क सुरू करावा, तांत्रिक कारणांमुळे अर्ज भरता न आलेल्या विद्यार्थ्यांना मुदतवाढ द्यावी आणि प्रलंबित अथवा अर्धवट अर्ज पूर्ण करण्यासाठी पुरेसा कालावधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

याशिवाय महाविद्यालयांमध्ये विशेष शिबिरे आयोजित करून विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज पूर्ण करून घेण्यात यावेत. पोर्टलमधील तांत्रिक अडचणींमुळे एकही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहणार नाही, याची प्रशासनाने दक्षता घ्यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य लक्षात घेऊन प्रशासनाने या प्रश्नात तातडीने हस्तक्षेप करून सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा डॉ. प्रतापसिंह वेदप्रकाश पाटील यांनी व्यक्त केली.

# 'माझी बहीण, माझी जबाबदारी' उपक्रमातून कष्टकरी महिलांना नवी दिशा

### अणदूरमध्ये १३० महिलांचा साडी देऊन सन्मान; शिक्षण, व्यवसाय, आरोग्य व कायद्याबाबत मार्गदर्शन...

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.३ सप्टेंबर -**

गोरगरीब, कष्टकरी महिलांच्या जीवनात नवी पहाट निर्माण करण्यासाठी 'माझी बहीण, माझी जबाबदारी' हा उपक्रम महत्त्वपूर्ण आहे. महिलांनी शिक्षण घेऊन स्वतःच्या पायावर उभे राहावे आणि छोटे-छोटे व्यवसाय सुरू करावेत. त्यासाठी शिक्षण विभाग त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहील.

ग्रामीण भागातील रोजगार करणाऱ्या व कष्टकरी अशिक्षित महिलांसाठी रात्रीचे वर्ग सुरू करण्याचा मानस आहे, असे प्रतिपादन धाराशिव जिल्हा परिषद प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी सुधा साळुंके यांनी केले. रक्षाबंधनानिमित्त अणदूर येथील देशमुख कोटा शाळेत लक्ष्मण चौगुले मित्रमंडळाच्या वतीने कष्टकरी माता-भगिनींसाठी 'माझी बहीण, माझी जबाबदारी' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून त्या बोलत होत्या. यावेळी लेबर फेडरेशन सोलापूरचे अध्यक्ष शंकर चौगुले, डॉ. हर्षल थडसरे, डॉ. शशिकांत साबळे, अनिल साळुंके, ॲड. संगीता कोळेकर, वैशाली घुगे, मीरा घुगे, बाबई चव्हाण, चंद्रकला चौगुले आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात १३० कष्टकरी महिलांचा सन्मान करून रक्षाबंधनाची भेट म्हणून १३० साड्या देण्यात आल्या. महिलांनी आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे आणि स्वतःचे छोटे व्यवसाय सुरू करावेत, यासाठी बचत गटांच्या माध्यमातून कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन देण्यात आले. बचत गटाच्या प्रमुख मीरा घुगे, वैशाली घुगे, बाबई चव्हाण आणि उद्योग अधिकारी अनिलकुमार साळुंके यांनी याबाबत मार्गदर्शन केले.



समाजातील व्यसनाधीनता कमी करण्यासोबतच महिलांनी आरोग्याची काळजी घ्यावी, यासाठी डॉ. हर्षल थडसरे व डॉ. शशिकांत साबळे यांनी आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. महिलांना त्यांच्या हक्कांविषयी आणि कायद्याविषयी ॲड. संगीता कोळेकर यांनी माहिती दिली. शंकर चौगुले यांनीही महिलांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमात महिलांसाठी 'खेळ पैठणीचा' हा मनोरंजनात्मक उपक्रमही घेण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रबोध कांबळे यांनी केले.

कार्यक्रमास सरपंच रामचंद्र आलूरे, बालाजी घुगे, डॉ. विवेक बिराजदार, डॉ. हरिदास मुंडे, वाय.बी. मोकाशे, माणिक निर्मले, मधुकर बंदपट्टे, हणमंत देवकर, सुधाकर पवार, अमित चौगुले, तुकाराम पवार, कमलाकर घुगे, संतोष नाईक, तीप्पण्णा कबाडे, सुरेश चव्हाण यांच्यासह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## इटकळमध्ये मराठा आरक्षणासाठी कडकडीत बंद



**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.३ सप्टेंबर -**

मराठा समाजाला आरक्षण मिळावे, या मागणीसाठी गुरुवारी (दि. ३) तुळजापूर तालुक्यातील इटकळ येथे कडकडीत बंद पाळण्यात आला. राष्ट्रीय महामार्गालगतची संपूर्ण बाजारपेठ दिवसभर स्वयंस्फूर्तीने बंद ठेवून मराठा समाजाच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यात आला.

सामाजिक कार्यकर्ते धोंडिबा शिंदे यांच्या पुढाकाराने झालेल्या या बंदमध्ये मराठा समाजातील युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले. आंदोलकांनी इटकळ औटपोस्टच्या सहायक पोलीस निरीक्षकांना मराठा आरक्षणाबाबत निवेदन देऊन शासनाने मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी केली. आंदोलन शांततेत पार पडले असून परिसरात दिवसभर शांतता व सुव्यवस्था कायम होती.

## संक्षिप्त वृत्त...



### हृदयविकाराने त्रस्त चिमुकल्यासाठी नवयुग फाउंडेशनचा मदतीचा हात

**लोहारा, दि.३ सप्टेंबर -**

लोहारा शहरातील चिमुकला हृदय अक्षय दरेकर याच्या उपचारासाठी तब्बल १० कोटी रुपयांची गरज असल्याचे समजल्यानंतर नवयुग फाउंडेशनच्या वतीने नागरिकांना मदतीचे आवाहन करण्यात आले. या आवाहनाला शहरातील व्यापारी, नागरिक तसेच फाउंडेशनच्या सदस्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत आर्थिक मदत केली. सदस्यांनी नागरिकांशी संपर्क साधून जमा केलेली १५ हजार ७३० रुपयांची रक्कम ऑनलाइन पद्धतीने अक्षयच्या उपचारासाठी पाठविण्यात आली. रक्कम छोटी असली तरी त्यामागील माणुसकीची भावना मोठी असल्याचे फाउंडेशनच्या वतीने सांगण्यात आले. या मदतकार्यात प्रेम लांडगे, शेखर पाटील, दादासाहेब अभंगराव, सवि कांबळे, शैलेश कांबळे, अमित महानुर, नितेश कांबळे, आप्पा भोंडगे, बालाजी कसबे, ऋषिकेश तिगाडे, अनिकेत स्वामी, रोहित विरुदे, अनिल बिरुदे, संभाजी जवादे यांच्यासह आदींनी सहभाग घेतला. शहरातील व्यापारी व नागरिकांचे फाउंडेशनच्या वतीने आभार मानण्यात आले.



### खामसवाडीत साथरोग प्रतिबंधासाठी आरोग्य विभागाची मोहीम

**खामसवाडी, दि.३ सप्टेंबर -**

कळंब तालुक्यातील खामसवाडी येथे आरोग्य उपकेंद्राच्या वतीने पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर साथरोग प्रतिबंधात्मक मोहीम राबविण्यात आली. यावेळी घरोघरी जाऊन ताप व कीटकशास्त्रीय सर्वेक्षण करण्यात आले. दूषित पाण्यामुळे होणारे आजार, डेंग्यू, चिकनगुनिया, हिवताप व हत्तीरोगापासून बचावासाठी नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले. डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी आठवड्यातून एक दिवस 'कोरडा दिवस' पाळण्याचे आवाहन करण्यात आले. पाण्याच्या टाक्या व भांड्यांमध्ये आढळलेल्या डासांच्या अळ्या अबेट लिक्विडच्या साहाय्याने नष्ट करण्यात आल्या. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. हरिदास व तालुका आरोग्य अधिकारी डॉ. महेंद्रकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली. यावेळी समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. राहुल आडसूळ, आरोग्य सहाय्यक वाघमारे, आरोग्य सेवक अशोक खुरमूरे, रामहरी चौरे तसेच आशा कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला.

### शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी अमित सुरवसे

**लोहारा, दि.३ सप्टेंबर -**

लोहारा तालुक्यातील हिप्परगा सय्यद येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीच्या



अध्यक्ष व उपाध्यक्षपदाची निवड ३१ ऑगस्ट रोजी पार पडली. मुख्याध्यापक सर्जे यांनी पालकांचे स्वागत केल्यानंतर सर्वानुमते निवड प्रक्रिया पार पडली. यामध्ये अध्यक्षपदी अमित चंद्रकांत सुरवसे, तर उपाध्यक्षपदी अप्पासाहेब सुरेश भोजराव यांची एकमताने निवड करण्यात आली. ग्रामपंचायत सदस्य सुनीता भारती यांची सदस्य, तर पंचायत समिती सदस्य नागनाथ पाटील यांची शिक्षणतज्ज्ञ म्हणून निवड झाली. यावेळी श्रीशैल ओवांडे, काशिनाथ ओवांडे, ज्योतिबा निर्मळे, मुख्याध्यापक सर्जे, सहशिक्षक भूसने, येनगे, गाडेकर यांच्यासह शिक्षक व पालक उपस्थित होते. खेळीमेळीच्या वातावरणात सभा पार पडली.

### मनोज जरांगे-पाटील यांच्या समर्थनार्थ मराठा समाजाचे आंदोलन...

# धाराशिव बंदला प्रतिसाद; मुख्य बाजारपेठा ठप्प

**महामार्गावर ५ किमी वाहनांच्या रांगा...** **बसस्थानकातही काही काळ बससेवा ठप्प...**





**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ सप्टेंबर -**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे-पाटील यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी गुरुवारी (दि. ३ सप्टेंबर) पुकारण्यात आलेल्या धाराशिव जिल्हा बंदला शहरासह जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. व्यापारी महासंघासह विविध सामाजिक संघटनांनी बंदला पाठिंबा दिल्याने धाराशिव शहरातील प्रमुख बाजारपेठा, व्यापारी प्रतिष्ठाने आणि दुकाने दिवसभर बंद ठेवण्यात आली. त्यामुळे नेहमी गजबजलेल्या शहरातील प्रमुख रस्ते आणि बाजारपेठांमध्ये दिवसभर शुकशुकाट दिसून आला.

सकाळपासूनच मध्यवर्ती बाजारपेठ, मुख्य व्यापारी भाग, प्रमुख चौक आणि रस्त्यांवरील बहुतांश दुकाने बंद होती. अत्यावश्यक सेवा वगळता अनेक व्यापाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने आपली प्रतिष्ठाने बंद ठेवून बंदला पाठिंबा दिला. परिणामी शहरातील दैनंदिन व्यवहारावर मोठा परिणाम झाला.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील विविध भागांतून बंदला समर्थन मिळाले. व्यापारी, व्यावसायिक आणि सामाजिक कार्यकर्ते आंदोलनात सहभागी झाले. शासनाने मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागण्यांकडे गांभीर्याने पाहून तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

दरम्यान, बंदच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलिस प्रशासनाने शहरातील प्रमुख चौक, संवेदनशील ठिकाणे आणि बाजारपेठ परिसरात मोठा बंदोबस्त तैनात केला होता. पोलिसांकडून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत होते. बंददरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडला नसून परिस्थिती शांततापूर्ण राहिली.

नेहमी वाहनांची वर्दळ असलेल्या प्रमुख रस्त्यांवरही वाहतूक मोठ्या प्रमाणात कमी झाली होती. काही ठिकाणी नागरिक व आंदोलक एकत्र येत मराठा आरक्षणाच्या मागणीला पाठिंबा देत जोरदार घोषणाबाजी करताना दिसून आले. आंदोलनस्थळी मराठा समाजाच्या मागण्यांच्या समर्थनार्थ जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

जिल्हा बंदच्या माध्यमातून मराठा आरक्षणाच्या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात आला असून, आरक्षणाच्या मागणीवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी भूमिका आंदोलकांनी मांडली. बंदला मिळालेल्या प्रतिसादामुळे धाराशिव जिल्ह्यात मराठा आरक्षणाच्या प्रश्नाबाबतची तीव्र भावना पुन्हा एकदा अधोरेखित झाली.

### बसस्थानकात आंदोलन; काही काळ बससेवा ठप्प

मनोज जरांगे-पाटील यांच्या समर्थनार्थ मराठा आंदोलकांनी धाराशिव बसस्थानकात आंदोलन केले. आंदोलकांनी आगारातून बसेस बाहेर पडू न दिल्याने काही काळ बससेवा ठप्प झाली. त्यामुळे बसस्थानकात प्रवासी अडकून पडले. आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी करत बंदला पाठिंबा दर्शविला. परिस्थिती नियंत्रणात आल्यानंतर बससेवा पूर्ववत करण्यात आली.

### सोलापूर-धुळे महामार्गावर पाच किमी वाहनांच्या रांगा

धाराशिवमध्ये मराठा समाजाच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. आंदोलकांनी सोलापूर-धुळे महामार्ग अडवल्याने महामार्गावरील वाहतूक काही काळ ठप्प झाली. आंदोलनामुळे महामार्गाच्या दोन्ही बाजूंना तब्बल पाच किलोमीटरपर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. परिणामी वाहनचालक आणि प्रवाशांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागला.



## इनोव्हाच्या गुप्त कप्प्यात ७९.४७ लाखांची रोकड!

### साऊंड बॉक्सखाली लपवली होती लाखोंची रोकड; धाराशिव शहर पोलिसांची कारवाई, दोघे ताब्यात




**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ सप्टेंबर -**

सोलापूरहून जालन्याकडे इनोव्हा कारमधून मोठ्या प्रमाणात रोकड घेऊन जात असताना धाराशिव शहर पोलिसांनी सापळा रचून तब्बल ७९ लाख ४७ हजार ३०० रुपयांची रोकड जप्त केली.

एमएच २१ बीक्यू ८८८६ क्रमांकाच्या इनोव्हा वाहनाच्या डिग्गीत साऊंड बॉक्सखाली तयार करण्यात आलेल्या गुप्त कप्प्यात ही रोकड लपवून ठेवण्यात आली होती. या कारवाईमुळे शहरात खळबळ उडाली आहे. पोलीस अधीक्षक रितू खोकर, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुरेशकुमार राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली धाराशिव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक कुमार दराडे यांनी वडगाव सिद्धेश्वर परिसरात सापळा रचला होता. यावेळी संशयित इनोव्हा वाहन पोलिसांच्या निदर्शनास आले. पोलिसांनी वाहन थांबविण्याचा प्रयत्न केला असता चालकाला पोलिसांचा संशय आल्याने त्याने वाहन पळवून नेण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी पाठलाग करून वाहन ताब्यात घेतले.

वाहनाची झडती घेतली असता डिग्गीच्या पाठीमागील बाजूस प्लायवूडची पेटी तयार करून त्यावर साऊंड बॉक्स ठेवल्यासारखी रचना करण्यात आल्याचे आढळून आले. साऊंड बॉक्सखाली तयार करण्यात आलेल्या गुप्त कप्प्यात मोठ्या प्रमाणात रोकड लपवून ठेवण्यात आली होती. पोलिसांनी कप्पा उघडून ७९ लाख ४७ हजार ३०० रुपये रोख जप्त केले. तसेच वाहनातील दोन व्यक्तींनाही ताब्यात घेण्यात आले आहे.



याप्रकरणी तपास सुरू असून जप्त करण्यात आलेली रोकड नेमकी कोणाची आहे, ती कुठून आली आणि सोलापूरहून जालन्याकडे कोणत्या कारणासाठी नेली जात होती, याचा तपास धाराशिव शहर पोलीस करीत आहेत. या प्रकरणाची माहिती आयकर विभागाला देण्यात आली असून पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे. रोकड कोठून आली आणि ती कशासाठी नेली जात होती, याचा तपास सुरू आहे, अशी माहिती पोलीस निरीक्षक कुमार दराडे यांनी दिली.

## तीर्थ बुद्रुक येथे मराठा समाजाचे रास्ता रोको आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.३ सप्टेंबर -**

मनोज जरांगे-पाटील यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी तुळजापूर तालुक्यातील तीर्थ बुद्रुक येथे मराठा समाजाच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. साठे पंचक्रोशीतील मराठा समाजबांधव, महिला व भगिनी मोठ्या संख्येने सहभागी झाल्या. यावेळी आरक्षणाच्या मागणीसाठी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

आंदोलनामुळे तुळजापूर-हैदराबाद महामार्गावरील वाहतूक काही काळ ठप्प होऊन दोन्ही बाजूंना वाहनांच्या रांगा लागल्या. तहसीलदारांनीच आंदोलनस्थळी येऊन निवेदन स्वीकारावे, अशी आंदोलकांची भूमिका होती. त्यानंतर तहसीलदार अरविंद बोळंगे यांनी आंदोलनस्थळी येऊन निवेदन स्वीकारले व मागण्या शासनापर्यंत पोहोचवून योग्य कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.



### पावसाच्या खंडाने सोयाबीन वाळले...

## खा. ओमराजेंकडून नुकसानग्रस्त पिकांची पाहणी



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ सप्टेंबर -**

मराठवाड्यात मागील दीड महिन्यापासून पावसाने मोठा खंड दिल्याने खरीप हंगामातील सोयाबीन पिकांना मोठा फटका बसला आहे. पावसाअभावी अनेक भागांतील सोयाबीन पिके वाळत चालली असून, शेतकऱ्यांसमोर मोठ्या आर्थिक संकटाची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर खा. ओमराजे निंबाळकर यांनी गुरुवारी सलगरा दिवटी व गंधोरा (ता. तुळजापूर) परिसरातील नुकसानग्रस्त सोयाबीन पिकांची प्रत्यक्ष पाहणी केली.

यावेळी खा. निंबाळकर यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून पावसाच्या खंडामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीची माहिती घेतली. अनेक शेतकऱ्यांनी पिकांची वाढ खुंटली असून, पाण्याअभावी सोयाबीन पीक वाळत असल्याची व्यथा मांडली. नुकसानग्रस्त पिकांचे तातडीने पंचनामे करून शासनाच्या नियमानुसार शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्यासाठी कार्यवाही करावी, अशा सूचना खा. निंबाळकर यांनी प्रशासनाला दिल्या. नुकसानग्रस्त क्षेत्राचे वस्तुनिष्ठ पंचनामे करून त्याचा अहवाल शासनाकडे पाठविण्यासाठी आवश्यक पाठपुरावा करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. शेतकऱ्यांचे नुकसान गंभीर आहे. त्यांच्या अडचणीच्या काळात आपण त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहू. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाकडून योग्य ती मदत मिळवून देण्यासाठी आवश्यक तो पाठपुरावा केला जाईल, असे खा. ओमराजे निंबाळकर यांनी सांगितले.

यावेळी ऋषीकेष मगर, गोपाळ सुरवसे, प्रतीक रोचकरी, गणेश रोचकरी, पिनू भोसले, संजय भोसले, प्रभाकर भोसले, मनोज भोसले, मालोजी मुसळे, देविदास राठोड, महेश केदार यांच्यासह परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

## कळंब, परंडा, वाशी तालुक्यात कडकडीत बंद; मराठा समाजाच्या आवाहनाला प्रतिसाद






**तभा वृत्तसेवा**
**कळंब-परंडा-वाशी, दि.३ सप्टेंबर -**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी सकल मराठा समाजाच्या वतीने गुरुवारी (दि. ३ सप्टेंबर) पुकारण्यात आलेल्या जिल्हा बंदला कळंब, परंडा आणि वाशी तालुक्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. व्यापारी, व्यावसायिक आणि नागरिकांनी दुकाने व व्यावसायिक आस्थापने बंद ठेवून आंदोलनाला पाठिंबा दर्शविला. त्यामुळे अनेक ठिकाणी बाजारपेठा बंद राहिल्याने प्रमुख रस्त्यांवर शुकशुकाट दिसून आला.

**कळंब शहरासह तालुक्यात बंदला प्रतिसाद :**

सकल मराठा समाज कळंबच्या आवाहनाला शहरासह तालुक्यातील विविध गावांत चांगला प्रतिसाद मिळाला. बाजारपेठेतील दुकाने, हॉटेल, पानटपऱ्या तसेच अन्य व्यावसायिक आस्थापने बंद होती. मोहा, खामसवाडी, शिराढोण, दहिफळ, ईटकुर आदी गावांतही बंद पाळण्यात आला. दहिफळ येथे काही तरुणांनी पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन केल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. कायदा-सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलिसांनी शहरातील प्रमुख चौक, बाजारपेठ आणि मुख्य रस्त्यांवर चोख बंदोबस्त ठेवला होता. काही शासकीय कार्यालये, शासकीय रुग्णालये व बँका सुरू असल्या तरी नागरिकांची वर्दळ कमी होती. रस्त्यावरील वाहतूक आणि एसटी बससेवाही नेहमीच्या तुलनेत कमी प्रमाणात सुरू होती.

**परंड्यात दोन तास रास्ता रोको :**

परंडा शहरात सकल मराठा समाजाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौकात दोन तास रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. आंदोलनकर्त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करून रस्त्यावर ठिय्या देत मराठा आरक्षणाच्या समर्थनार्थ घोषणाबाजी केली. यावेळी तहसीलदार निलेश काकडे आणि पोलीस निरीक्षक आसाराम चोरमले यांना निवेदन देण्यात आले.

अत्यावश्यक सेवा वगळता परंडा शहरातील बाजारपेठेसह बहुतांश व्यवहार बंद होते. मनोज जरांगे-पाटील यांच्या प्रकृतीची शासनाने तातडीने दखल घेऊन त्यांच्याशी चर्चा करावी, मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण द्यावे, कुणबी प्रमाणपत्राची प्रक्रिया गतिमान करावी आणि प्रलंबित मागण्यांवर तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. शासनाने दखल न घेतल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशाराही देण्यात आला.

**वाशी तालुक्यात गावोगावी बाजारपेठा बंद :**

वाशी तालुक्यातही बंदला व्यापारी, व्यावसायिक आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तालुक्यातील विविध गावांमध्ये दुकाने, बाजारपेठा आणि व्यावसायिक आस्थापने बंद ठेवण्यात आली. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी नागरिकांनी एकजूट दाखवत बंदमध्ये सहभाग घेतला.

दरम्यान, मनोज जरांगे-पाटील यांचे मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी उपोषण सुरू असून, त्यांच्या प्रकृतीची शासनाने गांभीर्याने दखल घ्यावी आणि मराठा आरक्षणाच्या मागणीवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी कळंब, परंडा आणि वाशी तालुक्यातील आंदोलनाला पाठिंबा देणाऱ्या नागरिकांनी केली.